# ३९वा वार्षिक अहवाल २०२३ - २०२४

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

**विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा**

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२
Email: ybchavan100@gmail.com, info@chavancentre.org
Visit us: www.chavancentre.org

**शेवटच्या माणसाचे हित हेच आमचे ब्रीद**

सस्नेह नमस्कार,

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार तथा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी राज्यात कृषी-औद्योगिक समाजाच्या विकासाची पायाभरणी केली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर, राज्याची धुरा सांभाळताना पंचायत राजची त्रिस्तरीय रचना त्यांनी अमलात आणली व त्यातून समाजात राजकीय नेतृत्व घडविण्याची एक कार्यशाळाच निर्माण केली, आणि सामान्य माणसाला केंद्रस्थानी आणले. हाच विचारांचा आणि कृतीचा वारसा यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून चालवण्याचा आमचा प्रयत्न आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरची कार्यप्रणाली सेवाभाव, सर्जनशीलता, उत्तरदायित्व, प्राविण्य आणि विश्वासार्हता या मूल्यांवर आधारित आहे. 'विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा' हे आमचे ब्रीद आहे. 'आधुनिक आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीकरता सर्व घटकांना समान संधी निर्माण करून देणे,' हे ध्येय ठरवून शिक्षण, महिला, आरोग्य, युवा, सांस्कृतिक आणि आदिवासी विकास इत्यादी क्षेत्रामध्ये यशवंतराव चव्हाण सेंटर उत्प्रेरक (catalyst) म्हणून कार्यरत आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेबांची १११ वी जयंती चव्हाण सेंटर येथे साजरी करण्यात आली. चव्हाण साहेबांच्या जयंती दिनी यावर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' वैद्यक क्षेत्रातील ख्यातकीर्त डॉ. सौम्या स्वामीनाथन यांना आदरणीय पवार साहेबांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी वैद्यकीय क्षेत्रात दिलेले योगदान बहुमूल्य आहे. तसेच विविध सामाजिक उपक्रमांना त्या करीत असणारे सहकार्य अतिशय मोलाचे आहे. या बेळी यशवंतराव चव्हाण साहेबांवरील नवीन वेबसाईटचे अनावरण चव्हाण सेंटरचे अध्यक्ष आदरणीय शरद पवार साहेब यांनी केले. या वेबसाईटवर यशवंतराव चव्हाण यांचा संपूर्ण जीवनपट उलगडून दाखविला आहे. एकूणच चव्हाण साहेबांचे कार्य जाणून घेण्यासाठी सामान्य नागरिकांसह, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी यांच्यासाठी ही वेबसाईट महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, अशी मला खात्री आहे. तसेच यावर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांना प्रदान करण्यात आला. त्यांनी केलेल लेखन तसेच सामाजिक कार्य पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.

आदरणीय पवार साहेबांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त चव्हाण सेंटरच्या माध्यमातून कृषी, साहित्य आणि शिक्षण क्षेत्रात नवीन काही करू पाहणाऱ्या तरुण तरुणींसाठी SPIF फेलोशिप सुरू करण्यात आली. त्यालाही यावर्षी ३ पूर्ण झाली. या फेलोशिपच्या माध्यमातून नवीन स्वप्नं घेऊन काम करणारी पिढी घडवायची आहे आणि त्यासाठी आम्हाला ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर, MKCL चे विवेक सावंत व शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे तसेच अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. यावर्षी MKCLच्या सहाय्याने विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या १० महिलांसाठी फेलोशिप सुरू करण्याचा विचार आहे.

आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी पहिले स्वतंत्र धोरण जाहीर झाले. त्या ऐतिहासिक निर्णयास यंदा ३० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने यशस्विनी महिला सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. कृषी, साहित्य, उद्योग, सामाजिक, क्रीडा आणि

पत्रकारिता या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या स्त्रियांना हा सन्मान दिला जातो. यावर्षी ज्यांना हा पुरस्कार मिळाला त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन. तसेच याच सन्मान सोहळ्यात पत्रकार संध्या नरे-पवार संपादित आणि सकाळ प्रकाशन निर्मित 'धोरण कुठवर आलं ग बाई' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. महिला धोरणाचा इतिहास, त्याचे फायदे आणि परिणाम अशा विविध बाबींचा अभ्यासात्मक आढावा या ३७५ पानी पुस्तकात घेतला आहे.

राज्यभरातील सामाजिक, क्रीडा, उद्योजकता, रंगमंचीय कलाविष्कार, साहित्य, पत्रकारिता आणि इनोव्हेशन या क्षेत्रांतील १ ६ गुणवंताना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. या सर्व पुरस्कारप्राप्त युवांचे हार्दिक अभिनंदन! चव्हाण सेंटरच्यावतीने दरवर्षी भरविण्यात येणारा यशवंत आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल उत्साहाच्या वातावरणात पार पडला. या निमित्ताने जगभरातील अनेक देशातील चित्रपटाचा आस्वाद मुंबईकरांना घेता आला. युवा विभागांतर्गत राबवण्यात येणारा 'अभिसरण', हा उपक्रम म्हणजे वैविध्य आणि संपन्नतेने नटलेल्या महाराष्ट्रातील युवांनी, आपापला भूभाग सोडून या मराठी मुलुखाच्या कानाकोपऱ्यात जाऊन तेथील माहितीचेच नव्हे तर तेथील आचार, विचार, भाषा, आवडी-निवडी, सवयी, व्यवहार, संस्कृती यांचे आदान प्रदान करण्याची प्रक्रिया होय. यावर्षी नऊ दिवसीय कालावधीमध्ये मराठवाड्यातील मुला-मुलींना कोकणामध्ये तेथील संस्कृती, खानपान, राहणीमान, शेती, इत्यादि गोष्टी जाणून घेण्यासाठी पाठवण्यात आले होते.

आपला देश संविधानावर चालतो. आजदेखील अनेकांना आपले अधिकार आणि कर्तव्य माहीत नाहीत. आपल्याला समाजातील शेवटच्या घटकापर्यंत संविधानाचा अर्थ पोहोचवायचा आहे. आजच्या काळात संविधान साक्षर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच हेतूने चव्हाण सेंटरच्या माध्यमातून प्रजासत्ताक दिनानिमित्त पुण्यात विविध ठिकाणी असलेल्या संविधान स्तंभास अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी 'भारतीय संविधान' या विषयाची एक छोटी पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात आली. चव्हाण सेंटरच्या वतीने विविध उपक्रम राबवले जातात. आरोग्य विभागाच्या माध्यामातून विविध ठिकाणी "शोध आनंदी जीवनाचा" या मानसिक आरोग्य जनजागृतीपर सत्राचे आयोजन करण्यात आले. भारतीय संविधान आणि शोध आनंदी जीवनाचा या दोन्ही पुस्तिका कालनिर्णयचे श्री. जयराज साळगावकर यांनी छपाई करून दिल्या त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

या वर्षापासून राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार एक शिक्षक आणि एक शिक्षिका यांना देण्यात येणार आहे. पहिला राज्यस्तरीय डॉ. कुमुद बन्सल गुणवंत शिक्षक पुरस्कार दुर्गम भागात अतिशय व्रतस्थपणे काम करणारे बाळासाहेब घोड आणि दीपाली सावंत यांना जाहीर करण्यात आला आहे. बाळासाहेब घोडे जि.प. प्राथमिक शाळा शिवनगर (डोंगरगण), ता. शिरूर, जि. पुणे येथे तर दीपाली सावंत या जि.प.प्राथमिक शाळा शेकापूर (बाई), ता. हिंगणघाट जि.वर्धा येथे शिक्षका म्हणून कार्यरत आहेत. बाळासाहेब घोडे यांनी शिवनगर सारख्या छोट्याश्या वस्तीवरील शाळेला सृजनशील प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावली. दीपाली सावंत या वर्धा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील उपक्रमशील शिक्षिका म्हणून शिक्षणक्षेत्रात परिचित आहेत. राज्यभरातून नामांकन झालेल्या प्रक्रियेतून निवडक

शिक्षकांच्या मुलाखती, प्रत्यक्ष शाळा भेटी यातून या दोन शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड समितीने एकमताने शिफारस केली होती.

महाराष्ट्राला प्रबोधनाची आणि प्रबोधकांची मोठी परंपरा आहे. सेंटरमार्फत विविध समविचारी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाज हितासाठी कार्य केले जाते. अनेक सामाजिक संस्था आणि संघटना आपआपल्या परीने वेगवेगळ्या विषयांवर स्वतंत्रपणे काम करताना दिसतात. विविध प्रश्नांची जाण असणाऱ्या अशा संस्थांची आम्ही एकत्रित सांगड घालण्याचा प्रयत्न मागील वर्षी केला. याकरिता चव्हाण सेंटर येथे सामाजिक संस्था, संघटना तसेच कार्यकर्ते यांच्या दोन बैठका आणि एक परिषद पार पडली. येथून पुढे दरवर्षी विविध सामाजिक संस्था-संघटनांची एक दिवसीय परिषद चव्हाण सेंटर येथे घेण्यात येईल.

या वर्षी स्वर्गीय श्री. शरद काळे साहेबांना जाऊन एक वर्ष पूर्ण झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी डॉ. अभय बंग आले होते. त्यांनी समाजातील वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेवर परखड भाष्य केले.

मागील वर्षी कविवर्य ना. धों. महानोर यांचे निधन झाले. यावर्षी पासून त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. कवी, कादंबरीकार म्हणून महानोर यांनी मराठी साहित्यात जसे स्वत:चे स्थान निर्माण केले, तसेच शेती आणि पाणी ही क्षेत्रे जीवनभर त्यांचा ध्यासविषय होती. महानोरांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे हे पैलू लक्षात घेऊन, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आणि भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रानकवी ना. धों. महानोर यांच्या नावाने या तीनही क्षेत्रांत एकूण सहा पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत. दरवर्षी सहा पुरस्कारांपैकी चार पुरस्कार साहित्यक्षेत्रासाठी तर दोन पुरस्कार शेती व पाणी या क्षेत्रांसाठी असतील. त्यानुसार सन २०२४ च्या कविवर्य ना. धों. महानोर साहित्य, शेती-पाणी पुरस्कारासाठी राज्याच्या सर्व विभागांतून शिफारशी मागविण्यात आल्या आहेत.

या वर्षीचा वार्षिक अहवाल आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. आपली जबाबदारी उत्तरोत्तर वाढतच आहे. अजूनही काही नवीन संकल्पना चव्हाण सेंटरतर्फे राबविण्याचा मनोदय आहे. मला आशा आहे, महाराष्ट्र एक प्रगतिशील राज्य बनवण्यासाठी आपण सर्व वचनबध्द राहू आणि आदरणीय चव्हाण साहेबांचा विचार जनमानसात रुजवू.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

सुप्रिया सुळे

सुप्रिया सुळे
**कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर**

यशवंतराव चव्हाण सेंटर

विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा

## दृष्टी

आधुनिक आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीकरिता
सर्व घटकांना संधी निर्माण करून देणे.

## आमची मूल्ये

सेवेची भावना । विश्वासार्हता । प्राविण्य
सर्जनशीलता । उत्तरदायित्व

## कार्यक्षेत्रे

शिक्षण । आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक । महिला
युवा । सांस्कृतिक

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

## वार्षिक अहवाल २०२३-२४

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, चव्हाण सेंटरच्यी जिल्हा केद्राचे मा. अध्यक्ष, चव्हाण सेंटरचे विभाग प्रमुख व व्यवस्थापन | ८-११ |
| २ | यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम | ११ |
| ३ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम | १६ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम | २१ |
| ५ | विशेष कार्यक्रम /उपक्रम | २२ |
| ६ | यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) | २५ |
| ७ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम | २७ |
| ८ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला मिळालेले अनुदान | २८ |
| ९ | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम | २८ |
| १० | यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईची जिल्हा केंद्रे | ६१ |
| ११ | यशवंतराव चव्हाण सेंटरची प्रकाशने व व्हिडीओ कॅसेटस् | १०२ |
| १२ | यशवंतराव चव्हाण सेंटरची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | १०५ |
| १३ | कार्यक्रमांची क्षणचित्रे | i-xvi |

# यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. / बी. ओ. एम. - ५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८४९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢विश्वस्त मंडळ सदस्य➢**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. फ. मुं. शिंदे | |
| ७. | मा. श्री. द. म. सुकथनकर | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १०. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| ११. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री विवेक सावंत | |
| १३. | मा. श्री. समीर दलवाई | |
| १४. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१७. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

१८. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
विधी व न्याय विभाग

**➢कार्यकारिणी मंडळ सदस्य➢**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. हेमंत टकले
५. मा. श्री. जयंत पाटील
६. मा. श्री. राम ताकवले
७. मा. श्री. ना. धों. महानोर
८. मा. श्री. लक्ष्मण माने
९. मा. श्री. प्रकाश आवाडे
१०. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
११. मा. श्री. जीवनराव गोरे
१२. मा. श्री. विजय शिर्के
१३. मा. श्री. जयराज साळगांवकर
१४. मा. श्री. सचिन मुळे
१५. मा. श्री. राजेश टोपे
१६. मा. श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पा. पाटील
१७. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
१८. मा. श्री विवेक सावंत
१९. मा. श्रीम. अदिती नलावडे
२०. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२१. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव,
सचिव, (पदनिहाय)
नगर विकास विभाग

**➢ कार्यकारी समिती➢**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरद पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. हेमंत टकले | सरचिटणीस |
| ५. | मा. श्रीम. अदिती नलावडे | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |

## यशवंतराव चव्हाण सेंटर च्या जिल्हा केंद्रांचे अध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| २) | जिल्हा केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. महेश बंग |
| ३) | जिल्हा केंद्र, नाशिक | अध्यक्ष | अॅड. नितीन ठाकरे |
| ४) | जिल्हा केंद्र, छत्रपती शंभाजीनगर | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| ५) | जिल्हा केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| ६) | जिल्हा केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| ७) | जिल्हा केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| ८) | जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. चंद्रशेखर घुले पाटील |
| ९) | जिल्हा केंद्र, अंबाजोगाई | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| १०) | जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. धर्मण्णा सादूल |
| ११) | जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| १२) | जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रविंद्र पाटील |
| १३) | जिल्हा केंद्र, नवी मुंबई | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| १४) | जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | श्री. कांतारावजी देशमुख |
| १५) | जिल्हा केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |
| १६) | जिल्हा केंद्र, धाराशिव | अध्यक्ष | श्री. जीवनराव गोरे |
| १७) | जिल्हा केंद्र, गडचिरोली | अध्यक्ष | श्री. धर्मरावबाबा आत्राम |
| २८) | जिल्हा केंद्र, जालना | अध्यक्ष | श्री. राजेश टोपे |
| १९) | जिल्हा केंद्र, बुलढाणा | अध्यक्ष | श्री. राजेंद्र शिंगणे |
| २०) | जिल्हा केंद्र, हिंगोली | अध्यक्ष | श्री. चंद्रकांत नवघरे |
| २१) | जिल्हा केंद्र, भंडारा | अध्यक्ष | श्री. धनंजय माधवराव दलाल |
| २२) | जिल्हा केंद्र, यवतमाळ | अध्यक्ष | अॅड. आशिष देशमुख |
| २३) | जिल्हा केंद्र, कोल्हापूर | अध्यक्ष | श्री. विश्वास बाजीराव पाटील |
| २४) | जिल्हा केंद्र, सिंधुदुर्ग | अध्यक्ष | श्री. उमेश सुंदर गाळवणकर |
| २६) | जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | - |
| २५) | जिल्हा केंद्र, धुळे | अध्यक्ष | श्री. श्री रमेश दाणे |
| २७) | केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २८) | देवराष्ट्रे (जन्म घर) | | |

........................

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. असोसिएटस्, मुंबई |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. एस. एस. पटवर्धन अँड कंपनी |

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

| | | |
|---|---|---|
| ● **यशवंत संवाद** | **मानद संपादक** | **सौ. सुप्रिया सुळे** |
| | कार्यकारी संपादक | प्रा. योगेश कुदळे |
| | | डॉ. अनिल पाझारे |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | मुख्य कार्यकारी अधिकारी | श्रीम. दिप्ती नाखले |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | मानद कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ● यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई | राज्य समन्वयक | श्री. नीलेश राऊत |

## चव्हाण सेंटर विभाग

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| | सृजन समन्वयक | श्री. विद्याधर खंडे |
| २. कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | कोर्स कोऑर्डिनेटर | श्रीम. प्रज्ञा कनोजिया |
| ५. महिला विभाग | संयोजिका | श्रीम. तेजस्विनी अधिकारी |
| | समन्वयक | श्रीम. पल्लवी वाघ |
| ६. युवा विभाग | संयोजक | श्री. नीलेश राऊत |
| | विभाग प्रमुख | श्री. संतोष मेकाले |
| ७. आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभाग | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| | समन्वयक | श्री.अभिजीत राऊत |
| | विभाग प्रमुख | श्रीम. दीपिका शेरखाने |
| ८. शिक्षण विभाग | मुख्य संयोजक | डॉ. श्री. वसंत काळपांडे |
| | मुख्य समन्वयक | डॉ. माधव सूर्यवंशी |
| | विभाग प्रमुख | प्रा. योगेश कुदळे |
| - यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | डॉ. अनिल पाझारे |
| - यशवंतराव चव्हाण रिसर्च सेंटर ऑफ सोशल सायन्स (मुंबई विद्यापीठाशी संलग्नित) | संचालक | प्रा. योगेश कुदळे |
| - कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | ॲड. जयमंगल धनराज |
| ९. आदिवासी विकास केंद्र | सुकाणू समिती (मान्यवर कार्यकर्ते) | |
| १०. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | साहाय्यक-सभागृहे व्यवस्थापक | श्री. विप्लव वागदे |
| ११. लेखा विभाग | लेखापाल | श्री. महेश चौधरी |

## चव्हाण सेंटर मधील सहकारी

श्री. सुरेश पाटील, श्री. मनोज पोतदार, श्री. निवृत्ती भोर, श्रीम. मिनल सावंत-पाडावे, श्री. यतीन घोडेकर, श्री. राजेंद्र रुपवते, श्री. अनिल चिंदरकर, श्रीम.संजना पवार, श्रीम. सुकेशनी मर्चंडे-शेवडे, श्रीम. मनीषा खिल्लारे, श्रीम. भक्ती जांभवडेकर, श्रीम. पल्लवी वाघ, श्री. प्रशांत इखार, श्री. अशोक जाधव, श्री. जयेश गुजराथी, श्री. विजय नागरे, श्री. विश्वदत्त मुळे, श्री. मंगेश शिंदे, श्री. सूरज पवार, श्री. शशांक आंबेरकर, श्री. विलास परदेशी, श्री. महेश साळवी, श्रीम. वंदना वाळिंजकर, श्री. संदीप दुर्गोली, श्रीम. तृप्ती वरवडेकर, श्रीम. माधुरी रामाणे, श्री. धनसिंग लाड, श्री. निलेश धुरी, श्री. प्रशांत कोटकर, श्रीम. सुरभी ओटावणेकर, श्री. मयूर गोलतकर, श्री. श्रीकांत गमरे, श्री. दीपक खरटमल, श्री. जितु जाधव, श्रीम. नर्मदा देवेंदर, श्री. अतुल तांडेल, श्री. विकास कळंबे, श्री. हुजेर खुरेशी, श्री. विनायक सुतार, सुरक्षा रक्षक, बागकाम कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्यबद्दल आभार.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण सेंटरचे व्यवस्थापन :-

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी चव्हाण सेंटरतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबवण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या या वर्षी १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यकारी समिती बैठकांच्या तारखा ५ एप्रिल २०२३, ३ मे २०२३, ९ जून २०२३, ५ जुलै २०२३, ११ ऑगस्ट २०२३, ६ सप्टेंबर २०२३, ४ ऑक्टोबर २०२३, १ नोव्हेंबर २०२३, ६ डिसेंबर २०२३, १ जानेवारी २०२४, ३ फेब्रुवारी २०२४, ७ मार्च २०२४. तसेच या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या पुढीलप्रमाणे प्रत्येकी ३ बैठका झाल्या १७ सप्टेंबर २०२३, २५ नोव्हेंबर २०२३, १२ मार्च २०२४ आणि वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी घेण्यात आली.

चव्हाण सेंटरच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मे एस. एस. पटवर्धन अँड कंपनी, यांच्यामार्फत करण्यात आली. वार्षिक हिशेब तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी. व्ही. के. ॲन्ड असोसिएटस् चार्टर्ड अकाऊटंट याच्याकडून केली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाच्या अधीन राहून प्रत्येक जिल्हा केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करून घेण्यात आली. चव्हाण सेंटरची वेबसाईट www.chavancentre.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच सेंटरचा ई-मेल ybchavan100@gmail.com; info@chavancentere.org ही आहे.

सभासद संख्या : यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईची निरनिराळ्या प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

(१) विश्वस्त सदस्य - १७ (२) कार्यकारिणी सदस्य २१ (३) संस्थापक सदस्य- २३

(४) संस्था सदस्य - २८ (५) आजीव सदस्य ३१६

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत.

## २. यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत राबवण्यात येणारे उपक्रम :-

### २.१ सभागृहे

- **मुख्य सभागृह :-** यशवंतराव चव्हाण सेंटर मधील सभागृहाचा वापर चव्हाण सेंटरने आयोजित केलेले विविध कार्यक्रम तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदी कार्यक्रमही झाले.

- **सांस्कृतिक, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह :** सांस्कृतिक सभागृह, रंगस्वर व ऋणानुबंध सभागृह या तिन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. वरील तिन्ही सभागृहे आवश्यक त्या सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत. पुस्तक प्रकाशन, संगीत कार्यक्रम, एकांकिका, नाट्यस्पर्धा, वार्षिक सर्वसाधारण सभा. इ. या ठिकाणी कार्यक्रम संपन्न होतात.

- **विरंगुळा :** येथे पिकलबॉल, सृजन, प्रायोगिक नाटकांची तालीम, तसेच शनिवारी शेतकरी बाजार, पुस्तक प्रकाशन, विविध प्रकारचे प्रदर्शन आदी कार्यक्रम हेतात.

२.२ **'सृजन'**

- **'सृजन' अंतर्गत साऊंड स्पेस ऑन व्हिल्स**

'द साऊंड स्पेस फाउंडेशन' यांच्यावतीने व यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सहकार्याने सृजन अंतर्गत 'साऊंड स्पेस ऑन व्हिल्स' या फिरत्या संगीत प्रशिक्षण वाहनाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण सेंटर येथे करण्यात आले.

द साऊंड स्पेस फाउंडेशनच्या संस्थापक कामाक्षी खुराना आणि विशाल खुराना यांनी या माध्यमातून गरजू मुलांना संगीत शिकविण्याचे सुरू केलेले हे कार्य कौतुकास्पद आहे. या फिरत्या बसमधे संगीत प्रशिक्षणाची सोय केली आहे.

- **'वैज्ञानिक अनुभूती'**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ६ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांकरिता 'वैज्ञानिक अनुभूती' ही कार्यशाळा सृजन अंतर्गत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत मूलभूत कृतिशील विज्ञान आणि सौरऊर्जा शिक्षण केंद्र, या बद्दल (BASSE) डोंबिवलीचे संचालक अभय यावलकर यांनी विज्ञानाशी संबंधित खेळणी कशी तयार करायची या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस परिसरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

- **'मातीतून कलाकृती"**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या सृजन या उपक्रमात क्लेपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

ही कार्यशाळा देवदत्त मालपे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत इको फ्रेंडली बाप्पा तयार करण्यात आले. परिसरातील ६५ मुलांनी यामध्ये सहभाग घेतला.

- **जिल्हास्तरीय क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई - सुळे यांच्या संकल्पनेतून पाच ते सोळा वयोगटाच्या मुलांना स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत म्हणून उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मोफत कराटे प्रशिक्षण आयोजित केले होते. त्याचाच भाग म्हणजे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ९३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या प्रसंगी चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ, दीपिका शेरखाने, माय अचिव्हर्स शुटोकोन कराटे - डू असोसिएशनचे सचिन शेरखाने, डॉ. चैतन्य मंत्री आणि डॉ. जुईली मंत्री आदी मान्यवर उपस्थित होते.

- **शेतकरी आठवडी बाजार**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उत्पादित उच्च दर्जाच्या शेतमालासाठी जागतिक बाजारपेठा उपलब्ध व्हाव्यात, शेतकर्यांच्या मालाला चांगला बाजारभाव मिळावा, शेतकऱ्यांना बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळावे, शेतकरी थेट शहरी बाजारपेठांशी जोडला जावा ही माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांची सदैव अग्रही भूमिका राहिली आहे. २००६ साली राज्यामध्ये सर्वप्रथम ऍक्टच्या माध्यमातून बाजारपेठ स्वातंत्र्य आणि बाजारपेठांच्या विस्ताराची मुहूर्तमेढ रोवण्यात आली यातूनच पुढील काळात शेतमालाच्या विस्तीर्ण बाजारव्यवस्थांचा विकास महाराष्ट्रात घडत राहिला.

बांधावरचा शेतकरी थेट मुंबईसारख्या शहरात आपला माल थेट ग्राहकांना विकण्यास समर्थ झाला. हाच विचारांचा वारसा पुढे चालवत माननीय खासदार सुप्रियाताई सुळे यांनी शेतकरी आठवडी बाजारसारख्या थेट विक्री व्यवस्थेला बळ देऊन मुंबई शहरातील अतिमुख्य लोकवस्तीत शेतकऱ्यांना आपला माल विक्री करण्याची व्यवस्था उभी करण्याच्या दृष्टीने दिनांक २ ऑक्टोबर २०२१ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर च्या आवारातील विरंगुळा या ठिकाणी शेतकरी आठवडी बाजार ही संकल्पना श्री स्वामी समर्थ शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सुरू केली. उभ्या महाराष्ट्रातील कोणत्याही शेतकऱ्याला आपला शेतमाल विकण्यासाठी हक्काची जागा म्हणून यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आवारातील शेतकरी बाजार सदैव उपयोगात यावा ही समग्र भूमिका या माध्यमातून आदरणीय ताईंनी मांडली. अतिशय उच्चभ्रू असलेल्या परिसरातील नागरिकांनी या संकल्पनेच तेवढ्याच उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या प्रकल्पाला शुभेच्छा देण्याबरोबरच इथे येणारे शेतकऱ्यांनाही या नागरीकांनी लवकरच स्वीकारल आणि शेतकरी ग्राहक थेट संपर्काची ही संकल्पना अतिशय यशस्वीपणे मूर्त स्वरूपात आली. ऑक्टोबर २०२४ला शेतकरी आठवडी बाजाराला ३ वर्ष पूर्ण होत आहेत. मागिल तीन वर्षा पासून हा शेतकरी आठवडा बाजार दर शनिवारी सकाळी ७:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत अविरत सुरू आहे.

दर शनिवारी २५-३० शेतकरी गटाच्या माध्यमातून २५० ते ३०० शेतकरी सभासदांचा २० ते २५ मेट्रिक टन शेतमाल या ठिकाणी दाखल होतो. आणि साधारण पणे २००० ग्राहकांच्या माध्यमातून हा शेतमाल पाच ते सहा तासात हातोहात विकला जातो. रास्त दरात अतिशय गुणवत्तापूर्ण शेतमाल उपलब्ध तर होतोच परंतु भागातून आलेल्या शेतकरी मुलांचे ग्राहकांशी अदबीचे वागणे, प्रमाणिकपणा व निरागसता यांचा प्रत्यय येऊन गावाशी जोडल्याचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर अगदी सहजरीत्या दिसतो. साधारण ८ ते १० लाखांची उलाढाल या पाच ते सहा तासात होऊन थेट ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याचे योगदान या माध्यमातून लाभत आहे.

## २.३ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना दि. २५ नोव्हेंबर, १९९६ रोजी झाली. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. या ग्रंथालयाचे प्रमुख डॉ. अनिल पाझारे, ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक म्हणून काम पाहतात व भक्ती जांभवडेकर, साहाय्यक ग्रंथपाल म्हणून काम करतात. ग्रंथालय संदर्भ ग्रंथासोबत इतर माहितीचे स्रोत अशा सुविधांनी परिपूर्ण आहे. सभासदांना कमी वेळात हवी ती माहिती देणे, त्यांना आवश्यक असलेले ग्रंथ वा इतर साहित्य उपलब्ध करून देणे, यामध्ये चालू घडामोडी

(CAS) वैशिष्ट्यपूर्ण माहिती (SDS), ऑनलाईन माहिती सेवा, इतर महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. उदा. ग्रंथालयात विविध नियतकालिके, MPSC, UPSC या स्पर्धा परीक्षांकरिता नियतकालिकांची बांधणी करून ते संदर्भाकरिता सभासदांना उपलब्ध करून दिले जातात. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र, प्रशासन, व्यवस्थापन, शिक्षण, महिला, औद्योगिक, इतिहास, भूगोल,शेती, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके आहेत. चरित्र, आत्मचरित्र, धर्मकोश, विश्वकोश, गॅझिटीयर, ॲटलास, इअरबुक, इन्सायक्लोपीडीया (Encyclopedia), ई. संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यास ते विकत घेणे शक्य होत नाही म्हणून ही सर्व पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध केल्याने सर्व गरजू विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मदत होते. हे सर्व कार्य करत असताना वेळेची बचत करून जास्तीत जास्त ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम करावयाचे असते. त्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीचा (Library Information Management Software) या उपयोग होतो.

- **ग्रंथालयाचे सभासद**

'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय' हे संदर्भ ग्रंथालय असून तेथे ग्रंथ वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु. १०००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदांना एका वेळी दोन पुस्तके/ग्रंथ देण्यात येतात. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक असते. संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करावयाचा असतो. संदर्भ ग्रंथ घरी नेता येत नाही. अनामत रकमेपेक्षा पुस्तकाची किंमत जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येते. महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु. ५००/- या सभासदांना ग्रंथ किंवा नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात. ते ग्रंथालयाबाहेर नेता येत नाहीत. संदर्भाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहा महिन्यांची फी रु. ६००/- एवढी आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकृत करण्यात आले आहे.

**दि. ३१.०३.२०२४ रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदाची एकूण संख्या पुढीलप्रमाणे :**

- संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership)

कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. ५ वर्षांसाठी एका वेळची वर्गणी रु. ५०,०००/- आहे. सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही, परंतु एखाद्या दुर्मीळ व किमती पुस्तकासाठी चव्हाण सेंटर निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल. एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात

- संस्था सभासदत्व (Institutional Membership)

यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी, आय. सी. एस. एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय. सी. एच. आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

संस्था सभासदत्व: ना परतावा प्रवेश फी रु. १,०००/- वार्षिक वर्गणी रु. ५,०००/-

● **दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासदत्व**

५ वर्षांसाठी एका वेळी वर्गणी रु. २०,०००/- एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात. संयुक्त संस्था सभासदत्व व संस्था सभासदत्व.

सभासदत्व संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येते. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येते. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास, तसेच परत करण्यास नामनिर्देशित करू शकतात. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागते. मात्र, पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे, ही जबाबदारी संस्थाप्रमुखाची असते. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार चव्हाण सेंटरला राहील.

महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु. ५००/-, सर्वसामान्य सभासद फी रु. १०००/- अनामत रक्कम रु. ५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु. ५००/-, ६ महिन्यांकरिता फी रु. ६००/- आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी संशोधन / सभासद, सर्वसामान्य यांची एकूण संख्या **३५४३** एकूण वर्गणी रु. १,४२,३००/- व अनामत रक्कम रु. ८०००/- इतकी रक्कम जमा झाली आहे, तसेच सन २०२३-२०२४ या वर्षामध्ये चव्हाण सेंटरने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची विक्री करून एकूण रु. ७७,६६३/- इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

सन २०२३- २०२४ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु. १,८८,७२७/- इतके अनुदान मिळाले. यशवंतराव चव्हाण सेंटरने सन २०२३-२०२४ वर्षाकरिता रु. ५,००,०००/- इतकी रक्कम मंजूर केली होती व ग्रंथ खरेदीचा प्रत्यक्ष खर्च रु. २,१९,४४१/- इतका झाला आहे . या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, संदर्भ खरेदी करण्यात आले आहेत.

त्यामध्ये १४३ पुस्तकांच्या खरेदीचा समावेश आहे व इतर खर्च उदा. DELNET Renewal Subscription, AIR Law Database AMC, SLIM – Library Information Management Software AMC, Online Magazine EPW (Economic Political Weekly) Renewal Subscription यांचा एकूण खर्च रु.८३,३०९/- इतका झाला आहे.

**ग्रंथालयामार्फत राबवण्यात आलेले उपक्रम**

● **पुस्तकदूत**:

महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात यशवंतराव चव्हाण सेंटरचे मोलाचे योगदान आहे. संस्था स्थापनेपासून चव्हाण सेंटर साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात नियमित आणि नेटाने सहभागी होत आहे; वाचन संस्कृती जोपासत आहे. तसेच वाचणारा आणि विचार करणारा समाज घडावा यासाठी प्रयत्नशील आहे. आपले कार्यक्रम आणि उपक्रम केवळ समारंभी न राहता त्यातून महाराष्ट्राच्या एकंदर सांस्कृतिक व्यवहारात एक सकारात्मक बदल घडावा असा चव्हाण सेंटरचा कटाक्ष असतो. यशवंतराव चव्हाण सेंटरची पुस्तकदूत योजना हे त्याचेच एक उदाहरण आहे. मा. कार्याध्यक्ष यांना भेटायला येताना पुष्पगुच्छ अथवा भेटवस्तू आणू नये, आणि आणायचीच असतील तर भेट म्हणून पुस्तकं आणावीत, अस सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांनी जाहीर

केलं. त्यामुळे त्यांच्याकडे भेट स्वरूपात पुस्तकांचा ओघ सुरू झाला. ही पुस्तके योग्य वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी चव्हाण सेंटरने 'पुस्तकदूत' ही योजना सुरू केली. मा. सुप्रिया सुळे आणि आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांना भेट म्हणून मिळालेली पुस्तके इच्छुक वाचकांपर्यंत विनामूल्य पोहोचवणं हे या योजनेचे मूळ स्वरूप आहे. आलेली पुस्तके वाचून आणि पाहून झाल्यावर ती पुस्तके चव्हाण सेंटरच्या ग्रंथालयाकडे येतात. त्यांची छाननी आणि वर्गवारी करून वाचकांना देण्यायोग्य पुस्तकांची यादी तयार केली जाते. ही पुस्तकदूत योजना अधिकाधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी चव्हाण सेंटरच्या माध्यमातून https://pustakdoot.chavancentre.org/ ही वेबसाईट सुरू करण्यात आली आहे.
या वेबसाईटवर पुस्तकांची नावे पाहून ती पटकन बुक करून केवळ पोस्टेज खर्च रु. ४५/- योजनेच्या अकाउंट वर ऑनलाइन पैसे भरले जाते. पैसे भरल्यावर सात ते दहा दिवसात पोस्टाने पुस्तक घरपोच पोहोचवले जाते.

- **National Conference on System for Library Information and Management (SLIM) Users Building, the Smart Libraries:**

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय व **Algorhythms Consultants, Pune** यांच्या संयुक्त विद्यमाने दि.. १ ३ जानेवारी २ ० २ ४ रोजी **"National Conference on System for Library Information and Management (SLIM) Users Building, the Smart Libraries"** आयोजित केली होती.

या नॅशनल कॉन्फरस चे प्रमुख पाहुणे **डॉ. माधवी टिकम, संचालक, नॉलेज रिसोर्स सेंटर ऑफ एच.एन.एस.सी. विद्यापीठ व प्रमुख वक्ते श्री. प्रल्हाद जाधव, (Assoc. Director-Library-Khetan & Company) आणि श्रीम. वासुमती श्रीगणेश (Founder-QMD Knowledge Foundation) होते. तसेच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून व राज्यांमधून (मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, कर्नाटक ) एकूण १ ० ५ - A NAAC Colleges, Institutes, Agricultural Universities, Public Libraries मधील हेड ऑफ नॉलेज रिसोर्स सेंटर लायब्ररीयन, नॉलेज मॅनेजर, टेक्निकल ऑफिसर, महाविद्यालयीन लायब्रेरीयन, प्राध्यापक यांचा सहभाग होता.** Library Management मधील Digital modules iARCH, iPROX, RFID यावर PPT चे सादरीकरण करण्यात आले.

## ३. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे घेण्यात आलेले महत्त्वाचे कार्यक्रम :-

- **मा. चव्हाण साहेबांची पुण्यतिथी**

मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ३ ९ व्या पुण्यतिथीनिमित्त दि. २५ नोव्हेंबर २ ० २ ३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास चव्हाण सेंटरचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २ ० २ ३', ज्येष्ठ साहित्यिक 'मा. डॉ. यशवंत मनोहर' यांना प्रदान करण्यात आले होते तसेच 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २ ० २ ३', ज्येष्ठ संशोधक 'मा. डॉ. सौम्या स्वामीनाथन' यांना जाहीर करण्यात आला.

- **मा. चव्हाण साहेबांची जयंती**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १ १ १ व्या जयंतीचा समारंभ दि. १ २ मार्च २ ० २ ४ रोजी चव्हाण सेंटरच्या

मुख्य सभागृहात झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी सेंटरचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार होते. पाहुण्यांचे स्वागत सेंटरचे उपाध्यक्ष, मा. अरुण गुजराथी व प्रास्ताविक सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन दिप्ती नाखले यांनी केले. राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अनिल काकोडकर यांनी पुरस्कारासंबंधी मनोगत व्यक्त केले. 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२३' ज्येष्ठ संशोधक 'मा. डॉ. सौम्या स्वामीनाथन" यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे साहित्य व जीवनपट उलगडणाऱ्या नवीन परिपूर्ण संकेतस्थळाचे www.yashwantraochavan.in लोकार्पण श्री. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

- **यशवंतराव चव्हाण परिपूर्ण वेबसाईटचे अनावरण**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या यशवंतराव चव्हाण साहेबांवरील वेबसाईटचे अनावरण चव्हाण सेंटरचे अध्यक्ष शरद पवार यांनी मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंती दिनी केले. या वेबसाईटवर यशवंतराव चव्हाण यांचा संपूर्ण जीवनपट आहे तसेच त्यांनी लिहिलेली पुस्तके, त्यांच्यावर लिहिलेली पुस्तके, त्यांनी केलेली विविध भाषणे, विधीमंडळातील भाषणे, संसदेतील भाषणे त्याचबरोबर त्यांची दुर्मिळ छायाचित्रे आणि मुलाखती देखील उपलब्ध आहेत. त्या सोबत चव्हाण साहेबांनी जपलेली एकूण १.७० लाख मूळ कागदपत्रे तसेच चव्हाण, साहेबांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीत घेतलेले निर्णय महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य' या मासिकात प्रसिद्ध झाले होते. ते निर्णय देखील डिजिटल स्वरुपात वेबसाईटवर लवकरच उपलब्ध होणार आहेत. एकूणच चव्हाण साहेबांचे कार्य जाणून घेण्यासाठी सामान्य नागरिकांसह, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी यांच्यासाठी ही वेबसाईट महत्वपूर्ण भूमिका बजावेल.

- **मोफत उन्हाळी शिबिराचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पुढाकाराने १ मे २०२३ रोजी होतकरू तरुण मुलामुलीं करिता आपले कलागुण विकसित करण्यासाठी मोफत उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी मुलामुलींनी विविध क्रीडा प्रकारांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या शिबिरात कराटे प्रशिक्षण, स्किल डेव्हलपमेंट, झुंबा व कराटे लाठी प्रशिक्षण, नृत्य प्रशिक्षण, हुला हुप्पा, पिकल बॉल यासह विविध कला व क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या शिबिरासाठी माय अचिव्हर्स ट्रस्ट, अभिनिर्मित आर्ट, क्रिएटिव्ह डान्स, द बॉम्बे हुपर या संस्थांचे सहकार्य लाभत आहे. या प्रसंगी चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे, कोषाध्यक्ष मा. हेमंत टकले, शिबिरातील प्रशिक्षणार्थी, तसेच यशवंतराव चव्हाण सेंटरचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

- **काला-घोडा आर्ट फेस्टिवल**

सन २०२२-२३ पासून काला-घोडा आर्ट फेस्टिवलमध्ये यशवंतराव चव्हाण सेंटर सहभागी होत आहे. हे फेस्टिवल दि. २० जानेवारी ते २८ जानेवारी २०२४ यादरम्यान सर्वांसाठी खुले होते. या फेस्टिवलमुळे अनेकांना संधी मिळाली. तसेच यशस्विनीच्या महिलांना यशस्विनी महिला सबलीकरण प्रकल्पांतर्गत स्टॉल लावण्याची संधी मिळाली.

- **यशवंत इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल वर्ष १४ वे**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई आणि पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन मुख्य सभागृह आणि रंगस्वर सभागृहात करण्यात आले होते. चित्रपट महोत्सव दि. १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२४ दरम्यान पार पडला. चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक मा. श्रीराम राघवन, श्री. गणेश मतकरी, चव्हाण सेंटरचे सरचिटणीस मा. हेमंत टकले, सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, दिप्ती नाखले तसेच ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्वासात एकूण २३ चित्रपट प्रदर्शित करण्यात आले होते. महोत्सवाची सुरुवात 'अंडर थेरपी' या चित्रपटाने झाली. तसेच महोत्सवाची सांगता 'एव्हिल डझ नॉट एक्झिस्ट' या चित्रपटाने झाली. या चित्रपट महोत्सवात 'स्मिता पाटील स्मृतिव्याख्यान' आयोजित करण्यात आले होते आणि ज्येष्ठ कलाकार मा. रोहिणी हट्टंगडी प्रमुख वक्त्या म्हणून लाभल्या होत्या.

- **सिंहासन चित्रपटाच्या ४४ वर्षपुर्ती निमित्ताने विशेष संवाद**

मंगळवार, दि. ११ एप्रिल २०२३ रोजी, सिंहासन चित्रपटाच्या ४४ वर्ष पुर्ण झाल्याच्या निमित्ताने 'विशेष संवाद दिग्दर्शकाशी' चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सिंहासन चित्रपटाचे प्रसिद्ध दिग्दर्शक मा. डॉ. जब्बार पटेल यांचा सत्कार चव्हाण सेंटरचे अध्यक्ष, मा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी संवादक म्हणून मा. अंबरीश मिश्र आणि मा. राजीव खांडेकर यांची साथ लाभली. तसेच मा. डॉ. मोहन आगाशे आणि मा. श्री. नाना पाटेकर यांचा विशेष सहभाग लाभला.

आणीबाणीनंतर 'सिंहासन' हा चित्रपट पुलोदच्या राजवटीत आला. या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी राज्याच्या मुख्य सचिवांचा अभिप्राय डावलून मंत्रालयाची वास्तू चित्रीकरणासाठी उपलब्ध करून दिली होती, असे डॉ. जब्बार पटेल यांनी सांगितले.

- **जिल्हा केंद्रांची राज्यस्तरीय आढावा बैठक**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सर्व जिल्हा केंद्रांची राज्यस्तरीय आढावा बैठक गुरुवार दि. ४ मे रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे पार पडली. या बैठकीमध्ये चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थित राहून जिल्हा केंद्रांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी घालून दिलेला समाजकारणाचा वस्तुपाठ पुढे कायम चालू ठेवण्यासाठी चव्हाण सेंटरचा प्रत्येक सदस्य अतिशय काटेकोरपणे प्रयत्न करीत आहे. चव्हाण साहेबांचे विचार आणि त्यांनी तळागाळांतील लोकांसाठी पाहिलेले स्वप्न पुढे घेऊन जाण्यासाठी आणि नवा महाराष्ट्र घडविण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत कार्यरत असणारी चव्हाण सेंटरची जिल्हा केंद्रे अतिशय उत्कृष्टपणे काम करीत आहेत. अशा शब्दात सुप्रियाताईंनी सर्व जिल्हा केंद्रांच्या कामाचे कौतुक केले.

राज्यभरामध्ये चव्हाण सेंटरच्या माध्यमातून उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा केंद्रांचा तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या स्वयंसेवकांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दीप्ती नाखले यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याचा आढावा घेत आगामी काळात घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. कोषाध्यक्ष हेमंत टकले आणि कार्यकारी समिती सदस्य अजित निंबाळकर यांनी देखील विविध विषयांवर प्रतिनिधींशी संवाद

साधला. सर्व जिल्हा केंद्रांच्या प्रतिनिधींनी प्रत्येक जिल्ह्यामध्ये चव्हाण सेंटर राबवत असलेले उपक्रम आणि आगामी काळातील नियोजन यावर उत्तम असे सादरीकरण केले. त्याचबरोबर दत्ता बाळसराफ यांनी चव्हाण सेंटरच्या माध्यमातून विविध संस्थांच्या सहयोगाने सामाजिक उपक्रम राबवण्याबाबत सेंटरच्या कार्याचा आढावा मांडला. याचबरोबर सतिश पवार यांनी चव्हाण सेंटरच्या कामकाजामधील माहिती तंत्रज्ञान व सोशल मीडियाचा वापर यावर सादरीकरण केले. अनिल पाझारे आणि महेश चौधरी यांनी जिल्हा केंद्रांशी संबधित महत्त्वपूर्ण बाबींचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश राऊत यांनी केले.

जीवनराव गोरे, विजय कान्हेकर यांच्यासह सर्व जिल्हा केंद्रांचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी, चव्हाण सेंटरचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी आदी या बैठकीला उपस्थित होते. सर्व जिल्हा केंद्रांचे प्रतिनिधी आवर्जून वेळ काढून बैठकीसाठी उपस्थित राहिले, याबद्दल चव्हाण सेंटरच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

- **सामाजिक संस्थांची सहविचार सभा**

दि. २४ मे २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने सामाजिक संस्थांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला चव्हाण सेंटरचे अध्यक्ष - मा. शरदराव पवार, कार्याध्यक्ष – मा. सुप्रियाताई सुळे, सरचिटणीस – मा. हेमंत टकले, मा. तुषारजी गांधी, मा. सुधींद्र कुलकर्णी, माजी खासदार मा. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे आदी मान्यवर उपस्थित होते. चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, दिप्ती नाखले यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर मा. कार्याध्यक्षांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री. दत्ता बाळसराफ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

- **यशवंत समाज संवाद**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्यावतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था प्रतिनिधींची दि. १२ ऑगस्ट २०२३ रोजी 'यशवंत समाज संवाद' या एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रियाताई सुळे यांनी परिषदेसाठी उपस्थित असलेल्या प्रतिनिधींसोबत संवाद साधला. या परिषदेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यांतून प्रतिनिधींनी उपस्थिती लावली होती. या वेळी तुषार गांधी, अन्वर राजन, हेमंत टकले आदी मान्यवर उपस्थित होते.

- **स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा**

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी चव्हाण सेंटरचे पदाधिकारी, सहकारी व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

- **कविवर्य ना. धों. महानोर यांना गीत व कवितांची भावांजली**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०२३ रोजी कविवर्य स्व. ना. धों. महानोर यांना गीत व कवितांच्या माध्यमातून भावांजली अर्पण करण्यात आली. सदर कार्यक्रम चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. यासाठी परिवर्तन निर्मित 'एकांताच्या पारावर' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आदरणीय शरदचंद्र पवार साहेब हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. डॉ भालचंद्र नेमाडे, ज्येष्ठ निर्माते दिग्दर्शक डॉ जब्बार पटेल, अशोक जैन, रामदास भटकळ, सयाजी शिंदे, सोनाली कुलकर्णी, अजित भुरे, हर्षल पाटील, मंगेश सातपुते, भवरलाल व कांताबाई ट्रस्ट आणि परिवर्तन संस्था,

जळगाव या कार्यक्रमात सहभागी होते. श्रद्धा कुलकर्णी, हर्षदा कोल्हटकर आणि अक्षय गजभिये यांनी महानोरांची गीते गायिली.

- **वेब सिरीज स्क्रीनिंग आणि चर्चा**

**फिल्म – श्यामची आई**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि सीसीआरटी लॅबोरेटरीज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ नोव्हेंबर २०२३ रोजी 'श्यामची आई' चित्रपटाचे स्क्रीनिंग आणि चर्चेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी १५० हून अधिक लोक उपस्थित होते. या चर्चेसाठी अमृता राव – निर्माती, सुजय डहाके – दिग्दर्शक, सुनील सुकथनकर – लेखक, गौरी देशपांडे – अभिनेत्री, ओम भूतकर – अभिनेता, संदीप पथक – अभिनेता, बाळ अभिनेता कुमार शर्व गाडगीळ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सिद्धार्थ इंगळे आणि सीसीआरटी लॅबोरेटरीजचे एल्विस कुंदर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

- **मालनगाथा**

दि. ९ डिसेंबर २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे इंदिरा संत यांच्या 'मालनगाथा' या पुस्तकात समाविष्ट असलेल्या जात्यावरील ओव्यांचा संगीतमय कार्यक्रम नुकताच पार पडला. रसिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बालेघाटीच्या ईसवरापासून सुरू झालेला कार्यक्रम 'सरलं दळण' पर्यंत एखाद्या गजऱ्यासारखा गुंफला गेला. त्याचा दरवळ आता कित्येक दिवस रसिकांच्या मनात राहील.

लोकवाङ्मयाचे अभ्यासात मुकुंद कुळे, प्रा. नीतीन रिंढे, ज्येष्ठ निवेदक दत्ता बाळसराफ आदींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम रंगला. अनन्य थिएटर प्रस्तुत हा कार्यक्रमाच्या निमंत्रक खासदार सुप्रिया सुळे होत्या. संगीतकार यशोधन कदम यांची संकल्पना आणि संगीत दिग्दर्शन असलेला ह्या कार्यक्रम उत्तरोत्तर रसिकांची अधिकाधिक दाद मिळवत गेला. प्रशांत कदम यांनी याचे संगीत संयोजन आणि तृषार्त जामसंडेकर यांचे तालसंयोजन लाभलेल्या या कार्यक्रमात सुयोग मराठे, प्रीती तळवळकर, आरोही तळवलकर, मानसी जगताप आपल्या सुरेल आवाजात ओव्या सादर केल्या. वैभव चाळके यांनी कार्यक्रमाची संहिता लिहिली होती, तर वृंदा दाभोळकर यांनी निवेदन केले. या गाण्यांना रसिकांनी वेळोवेळी टाळ्या वाजवून दाद दिली. स्वाती केरेकर यांचे निर्मिती साहाय्य लाभले.

**लोकवाङ्मयाबाबत विवेक हवा !**

कार्यक्रमाला उपस्थित असलेले लोकवाङ्मयाचे अभ्यासक मुकुंद कुळे यांनी, लोकवाङ्मयातील जे जे उत्तम ते ते आपण जपून ठेवायला हवे, असे दुर्गाबाई भागवतांनी आपल्याला सांगून ठेवले आहे, असे सांगितले. त्यांनी या ओव्यांचे महत्त्व विशद केलेच शिवाय परंपरेने चालत आलेल्या या वाङ्मयातील काय घ्यायचे याचा विवेक असणे अत्यंत गरजेचे असल्याचेही सांगितले.

- **वेब सिरीज स्क्रीनिंग आणि चर्चा (२१ डिसेंबर २०२३)**

**फिल्म – पेट पुराण**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महाराष्ट्रात समाज प्रबोधनासाठी विविध माध्यमांच्या सहाय्याने सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. या उपक्रमांना लोकाचा नियमित भरघोस प्रतिसाद मिळत असतो. आता चव्हाण

सेंटरने फिल्म आणि वेबसिरीजच्या माध्यमातून प्रेक्षकांना मनोरंजन आणि सामाजिक संदेश पोहोचविण्यासाठी 'वेब सीरिज स्क्रीनिंग आणि चर्चा' हा उपक्रम सुरू केला.

तरी या महिन्यात या उपक्रमात गुरुवार दिनांक २१ डिसेंबर,२०२३ रोजी 'पेट पुराण' या वेब सीरिज स्क्रीनिंग आणि चर्चेचे प्रेक्षकांसाठी विनामूल्य आयोजन करण्यात आले होते.

या चर्चेत या वेबसीरिजचे लेखक, दिग्दर्शक – ज्ञानेश झोटींग, अभिनेता – ललित प्रभाकर, अभिनेत्री –सई ताम्हणकर, पशुवैद्यकीय चिकित्सक आणि प्राणिमित्र – डॉ. चैतन्य लेले, सहभागी झाले होते. चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी- दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ उपस्थित होते.

- **चित्रपटांचे स्क्रिनिंग आणि चर्चासत्राचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि प्रभात चित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३-२४ या वर्षामध्ये खालील चित्रपटांचे स्क्रिनिंग आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रासाठी लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

| दिनांक | चित्रपट |
|---|---|
| २१ एप्रिल २०२३ | रसिका आगाशे दिग्दर्शित 'तिच शहर होणं' या चित्रपटाचे स्क्रीनिंग |
| २९ आणि ३० मे २०२३ | 'चित्रभारती' लघुपट महोत्सव |
| २० जून २०२३ | मृणाल सेन लिखित 'एक दिन अचानकचे' या चित्रपटाचे स्क्रीनिंग |
| २४ जुलै २०२३ | 'पोर्ट्रेटचे ओफ पायोनियर' या डॉक्युमेंटरीच्या स्क्रीनिंग |
| २२ ऑगस्ट २०२३ | 'कोलाहल' या चित्रपटाचे स्क्रीनिंग आणि चर्चासत्र |
| २५ सप्टेंबर २०२३ | क्लासिक हिंदी चित्रपट 'तेरे घर के सामने' चे स्क्रीनिंग |
| २२ डिसेंबर २०२३ | 'हेमोलिम्फ' या हिंदी चित्रपटाचे स्क्रीनिंग |

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :-

- **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक**

चव्हाण सेंटरच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती व संस्थेला पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१. यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना / व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक

२. यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता / विज्ञान - तंत्रज्ञान पारितोषिक

३. यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास / आर्थिक - सामाजिक विकास पारितोषिक

४. यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती / कला व क्रीडा पारितोषिक

सन २०२३ या वर्षीच्या पारितोषिकासाठी वर्तमानपत्रात प्रगटन देण्यात आले होते. या क्षेत्रामध्ये भरीव पथदर्शी कार्य करणाऱ्या व्यक्ती अगर संस्थांना शिफारस करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावावर निवड समितीत विचार होऊन ज्येष्ठ साहित्यिक "मा. डॉ. यशवंत मनोहर' यांना पारितोषिक देण्याचे जाहीर करण्यात येऊन हे पारितोषिक दिनांक

२५ नोव्हेंबर २०२३ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी सेंटरचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सेंटर येथे देण्यात आले. पारितोषिकांचे स्वरूप २ लाख रु. रोख, शाल, मानपत्र व चव्हाण साहेबांचे स्मृतिचिन्ह असे आहे.

- **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम ५ लाख रुपये, सन्मानपत्र व चव्हाण साहेबांचे स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. डॉ. रूपा शहा, माजी कुलगुरू, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (२) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिर्देशक, वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद (३) मा. डॉ. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ (४) मा. डॉ. नरेंद्र जाधव, माजी सदस्य, योजना आयोग (५) मा. श्री. आय. एम. काद्री, प्रख्यात वास्तुविशारद व (६) मा. श्री विवेक सावंत यांचा समावेश आहे.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :-

### ५.१ शरद पवार इंस्पायर फेलोशिप

आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सहस्त्रचंद्रदर्शनानिमित्त, मागील दोन वर्षापासून यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने, शरद पवार इंस्पायर फेलोशिप सुरू करण्यात आली. पवार साहेबांनी त्यांच्या सार्वजनिक आयुष्यात साठ वर्षाहून अधिक काळ शेती, औद्योगिक श्रेत्रात काम केले आहे. त्यांच्या या लोकोत्तर कार्याला सलाम करण्यासाठी, 'यशवंतराव चव्हाण सेंटर' च्या वतीने कृषी, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी, संशोधक तसेच शिक्षकांसाठी शरद पवार इंस्पायर फेलोशिप सुरू करण्यात आली. महाराष्ट्रातील तरुण होतकरू, गुणवंत आणि नव्याने काही करू पाहणाऱ्या तरुण-तरुणींना संधीचे नवे अवकाश खुले करून देण्याचा हा प्रयत्न आहे. तरुणांना कृषी आणि संबंधित क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे की कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, नियंत्रित पर्यावरणीय शेती, प्राण्यांमधील आनुवांशिक सुधारणा इत्यादींशी परिचित होणे गरजेचे वाटते. आव्हान पेलण्याची जिद्द बाळगणारे तरुण-तरुणी या फेलोशिपच्या माध्यमातून आपल्या स्वप्नांना आकार देऊ शकतील व त्यातून भविष्यातील समृद्ध सुसंस्कृत महाराष्ट्र घडवतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सहस्त्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने साहेबांच्या देदीप्यमान कारकिर्दीला सलाम करण्यासठी 'यशवंतराव चव्हाण सेंटर' च्या वतीने 'शरद पवार इंस्पायर फेलोशिप'ची सुरुवात २०२१ पासून करण्यात आली आहे. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली या फेलोशिपची सुरुवात करण्यात आली आहे.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ॲग्रिकल्चर**

यंदाच्या वर्षी २०२३-२४ मध्ये तिसऱ्या बॅचच्या फेलोजची निवड करण्यात आली आणि दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी फेलोशिप प्रदान सोहळा गशततराव चव्हाण सेंटर येथे घेण्यात आला.

फेलोशिपचा पहिला बूट कॅम्प हा दि १३ डिसेंबर ते २३ डिसेंबरदरम्यान अटल इंक्युबॅशन सेंटर, अग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती येथे घेण्यात आला, ह्या बूट कॅम्प मध्ये कृषी व कृषी संबंधित व्यवसाय ह्या बाबतीत विविध विषयावर मार्गदर्शन देण्यात आले व तसेच वेगवेगळ्या कृषी प्रकल्पास भेट देण्यात आली. प्रत्येक फेलोजच्या स्मार्ट गोलवर खोलवर चर्चा व मेंटोरशिप देऊन स्मार्ट गोल ठरवण्यात आले.

ह्या वर्षीच्या दुसरा बूटकॅम्प सह्याद्री फार्म्स, नाशिक येथे दिनांक ४ एप्रिल ते १० एप्रिलदरम्यान घेण्यात आला, तीन महिन्याच्या नंतर आपल्या स्मार्ट गोल वर काम करून सर्व फेलोज पुढच्या टप्प्यासाठी सज्ज झाले होते. ह्या बूट कॅम्प व्यादरम्यान 'डिस्कव्हरी ऑफ द सोशल आंत्रप्रेन्योर इन यू', सर्व उद्योगांचा पाया रचण्यात कृषी क्षेत्राचे महत्त्व अशा विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले तसेच विविध कृषी उद्योजक यांच्याशी चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे ह्याच्या सोबत फेलोज ना संवाद साधण्याची संधी मिळाली. बूटकँपदरम्यान विविध शेतीतील प्रयोग व शेती उद्योगातील मंडळीसोबत चर्चासत्रे घेण्यात आली.

- **शरद पवार इंस्पायर फेलोशिप इन एज्युकेशन :**

**शैक्षणिक परिवर्तनासाठी कार्यरत अशा उपक्रमशील शिक्षकांना शरद पवार इन्स्पायर फेलोशीप**

अशा परिवर्तनशील शिक्षणाची अर्थात 'नवशिक्षणा'ची सुरुवात सध्याच्या शालेय पर्यावरणाशी मेळ राखत, त्यातील सर्व सहभाग-धारकांचे जास्तीत जास्त सहकार्य मिळवून व विरोध टाळून करावी लागेल. योग्य अशा व नानाविध प्रकारच्या अभ्यासक्रमेतर कृतिशील उपक्रमांमधून, वेळापत्रकेतर वेळात व चाकोरीबाह्य पद्धतीने ती करणे उचित ठरेल. काही होतकरू व उपक्रमशील शिक्षकांकरवी ती सुरुवात करता येईल. अशा उत्साही, हिकमती, नाउमेद न होता अडचणींचे संधीत रूपांतर करणाऱ्या, विशिष्ट ज्ञान क्षेत्रे, विद्या किंवा कलांमध्ये तरबेज असलेल्या, विद्यार्थ्यांचा विकास करण्यात मनापासून रस असलेल्या, 'हटके' प्रवृत्तीच्या शिक्षकांच्या नानाविध उपक्रमांद्वारे हळूहळू हे 'नवशिक्षण' मुख्यप्रवाही करण्याचा मार्ग सापडू शकेल.

अशा शिक्षकांना आपण 'बलशाली मार्गशोधक' किंवा 'पाथफाइंडर' किंवा 'इंस्पयारर' म्हणूया. आपल्यला असे शिक्षक शोधून काढावे लागतील. विहित अभ्यासक्रमकेंद्री अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन यापलीकडे जाऊन सातत्याने परिवर्तनशील कामगिरी केलेल्या शिक्षकांची निवड करावी लागेल. कल्पक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची जडणघडण करू पाहणाऱ्या व त्यासाठी चाकोरीबाह्य विचार व कृती करणाऱ्या शिक्षकांचा शोध घ्यावा लागेल. त्यांना नवशिक्षणाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वाव, पाठबळ, मदत, प्रोत्साहन, प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रतिष्ठा द्यावी लागेल. त्यांना नवी आव्हाने व संधींशी सुसंगत अशा त्यांच्या पसंतीच्या व प्रावीण्याच्या उपक्रमांच्या आरेखन व अंमलबजावणीसाठी रोख रक्कम व सातत्यपूर्ण मार्गदर्शन या स्वरूपातील शिष्यवृत्ती/प्रकल्प वृत्ती देण्यात येईल.

- **शरद पवार इंस्पायर फेलोशीप इन लिटरेचर**

महाराष्ट्र आज ज्या क्षेत्रांत अव्वल आहे, त्यांपैकी एक क्षेत्र म्हणजे साहित्य. मराठी साहित्याची साडेसातशे वर्षांची सशक्त परंपरा केवळ मराठी समाजालाच नव्हे, तर भारतीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाचकांनाही जीवनरस पुरवत आहे. परिवर्तनवादी, आधुनिक मूल्यांवर विकास पावलेल्या महाराष्ट्रीय संस्कृतीच्या

जडणघडणीत मराठी साहित्याचा मोठा वाटा आहे. प्रत्येक काळात होणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचे आव्हान पेलून त्यांना हवी ती दिशा देण्याची ताकद मराठी साहित्याने वेळोवेळी दाखवली आहे.

दर पिढीतील तरुण लेखकांनी आपल्या लेखनाद्वारे घडवलेला नवतेचा आविष्कार आजवरच्या मराठी साहित्याला आणि संस्कृतीला समृद्ध करत आला आहे.

साहित्य हे जीवनातली संवेदनशीलता, प्रगल्भता टिकवून ठेवते, वाढवते. तरुण लेखकांचे साहित्य समाजाला नवी दृष्टी, नवी संवेदनशीलता देत असते. मराठीत आधुनिक साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य असे नवनवे जोमदार आविष्कार त्या त्या काळातल्या लेखकांच्या तरुण पिढीने घडवून आणले.

भारतीय समाजात आज तरुणांची संख्या अधिक आहे. पण वर्तमान जीवनातली वाढती स्पर्धात्मकता आणि गुंतागुंतीची व्यवधाने यांमुळे ही तरुण पिढी साहित्यापासून काही प्रमाणात दुरावत आहे. अशा स्थितीत आजच्या तरुण पिढीतल्या लेखकांना प्रोत्साहन देऊन लिहिते ठेवणे आवश्यक आहे. या दृष्टीने तरुण लेखक/लेखिकांना साहित्यलेखनासाठी प्रेरक आणि मार्गदर्शक ठरेल अशी,'शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप' योजना यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे सुरू करत आहोत.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यप्रेम सर्वश्रुत आहे. त्यांच्या साहित्यप्रेमाचा वारसा पुढे शरद पवार साहेब यांनीही चालवला. परिवर्तनवादी साहित्यमूल्ये जपणारे लेखक, साहित्यिक उपक्रम आणि चळवळी यांना या नेत्यांनी नेहमीच पाठबळ दिले. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असलेल्या या दोन्ही नेत्यांचा मराठी साहित्याविषयी असलेला जिव्हाळा लक्षात घेऊन, त्यांच्याप्रति कृतज्ञता म्हणून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या यशवंतराव चव्हाण सेंटरने ही साहित्य पाठ्यवृत्ती योजना आखली आहे. शरद पवार साहेब यांच्या नावाने, त्यांच्या ८१व्या वाढदिवशी ही योजना महाराष्ट्राला समर्पित करत आहोत.

'शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप' ही कादंबरी किंवा दीर्घ कथा, नाटक, ललितेतर साहित्य, बालसाहित्य, अनुवाद, विज्ञान साहित्य अशा साहित्यप्रकारांत लेखन करू इच्छिणाऱ्या, तसेच सामाजिक, सांस्कृतिक किंवा विज्ञान या विषयांवर पुस्तक लिहू इच्छिणाऱ्या युवा लेखक/लेखिकांसाठी आहे. या पाठ्यवृत्तीसाठी निवड झालेल्या लेखकांना पुस्तक लिहिण्यासाठी आर्थिक साहाय्य केले जाते. शिवाय त्यांच्यासाठी उद्‌बोधन वर्ग आयोजित केले जातील. गरज भासल्यास त्यांना मार्गदर्शकही उपलब्ध करून दिले जाते. पाठ्यवृत्तिप्राप्त लेखकांच्या लेखनातील समस्या दूर होऊन त्यांचे लेखन अधिकाधिक दर्जेदार व्हावे यासाठीचे हे प्रयत्न आहेत. अशा तऱ्हेने लिहिलेले पुस्तक निवड समितीच्या पसंतीस उतरल्यानंतर त्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीही साहाय्य केले जाते.

या वर्षी एकूण ३८० लेखकांनी ऑनलाइन नोंदणी केली, त्यातून निवडीस पात्र ठरतील असे एकूण ७९ प्रस्ताव निवडले. या एकूण प्रस्तावापैकी निवड समितीने कादंबरी किंवा दीर्घ कथा, नाटक, ललितेतर साहित्य, बालसाहित्य, अनुवाद अशा साहित्यप्रकारांत ९ लेखक / लेखिकांची निवड केली आहे – कादंबरी: अक्षय मोहिते, आशिष वारघणे, प्रज्ञा भोसले, सूरज खेडकर; नाटक: मयूर सरकळे; ललितेतर गद्य: गणेश उफाडे, अनिकेत रामचंद्र वाघ ; बालसाहित्य: समाधान पुजारी; भाषांतर: साजिद इनामदार

साहित्य प्रकारानुसार निवड समितीत नामवंत लेखकांनी कार्य केले आहे - कादंबरी - प्रज्ञा दया पवार, रणधीर शिंदे, किरूण येले ; ललितेतर गद्य : मंजुश्री पवार, प्रमोद मुनघाटे, श्रद्धा कुंभोजकर; भाषांतर : गणेश विसपुते, करूणा गोखले; विज्ञान साहित्य : शरद नावरे ; बाल साहित्य : राजीव तांबे, दासू वैद्य, नाटक: अजित दळवी, राजीव नाईक. निवड समितीची बैठक दि. १८, १९ व २० नोव्हेंबर, २०२३ रोजी कृषी विज्ञान केंद्र, बारामती या ठिकाणी पार पडली.

निवड झालेल्या ९ लेखक / लेखिकांना 'शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप' पुरस्कार दि. १० डिसेंबर, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आदरणीय शरद पवार साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. निवड झालेल्या ९ लेखक / लेखकांना पाठ्यवृत्तीच्या काळात नियोजनबद्ध मार्गदर्शन करणे व त्यांच्या लेखनाला योग्य दिशा देण्याकरिता साहित्य प्रकारानुसार मार्गदर्शक देण्यात आले आहेत यामध्ये राजीव नाईक, प्रा. नीतीन रिंढे, डॉ. रणधीर शिंदे, गणेश विसपुते, किरण येले, राजीव तांबे, करुणा गोखले, शफाहत खान, मुकुंद कुळे यांचा समावेश आहे.

दि. ९ डिसेंबर, २०२३ रोजी निवड झालेल्या ९ लेखक / लेखिकांकरिता यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे प्रा. नीतीन रिंढे यांनी विशेष मार्गदर्शन (Orientation) कार्यक्रम आयोजित केला होता. दि. २ व ३ मार्च, २०२४ राष्ट्रीय मिल मजदूर संघ (RMMS) येथे साहित्य क्षेत्रातील ९ युवा लेखकांकरिता पहिले वॅर्कशॉपचे आयोजन केले होते . या दोन्ही दिवशी उपस्थित ९ युवा लेखक, मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शक (लेखक) उपस्थित होते.

तसेच , दि. २८ व २९ मे, २०२४ रोजी Agriculture Development Trust (ADT), बारामती येथे दुसऱ्या वॅर्कशॉपचे आयोजन केले होते. या दोन्ही दिवशी ९ फेलो व त्यांचे मार्गदर्शक, समन्वयक उपस्थित होते.

दि. २८ व २९ सप्टेंबर, २०२४ रोजी राष्ट्रीय मिल मजदूर संघ (RMMS) लोणावळा येथे तिसरे वर्कशॉपचे घेण्याचे ठरले आहे.

## ६. यशवंतराव चव्हाण सेंटर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) :-

माहिती तंत्रज्ञान अकादमी ने २५वा वर्धापन दिन साजरा करताना एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. गेल्या एक चतुर्थांश शतकात, ए.आय.टी. ही आय.टी. शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट दीपस्तंभ म्हणून उदयास आली आहे, ज्याने त्याच्या सर्वसमावेशक कार्यक्रमांद्वारे ३०,००० हून अधिक विद्यार्थ्यांच्या करिअरला आकार दिला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी सर्वोत्तम तयारीसह सुसज्ज करणे हे आमचे ध्येय आहे. मागील वर्षी, आम्ही C-CAT परीक्षेशी संबंधित तांत्रिक विषयांवर केंद्रित एक व्यापक वेबिनार आयोजित केले होते. या उपक्रमाची रचना उमेदवारांना आवश्यक अंतर्दृष्टी आणि ज्ञान प्रदान करण्यासाठी करण्यात आली आहे, जेणेकरून ते त्यांच्या आगामी परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तयार आहेत.

ए.आय.टी. येथे आम्ही गेल्या वर्षी १३५ विद्यार्थ्यांना पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (PG-DAC) या अभ्यासक्रमावर तयार केले. त्यामुळेच त्यातील काही विद्यार्थी रिसेशनच्या काळातसुद्धा सरासरी ९ लाखांचे पॅकेज घेण्यात यशस्वी झाले.

शिक्षण आणि उद्योग पद्धती यांच्यातील अंतर भरून काढण्याच्या आमच्या सततच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, आम्ही हाऊस ऑफ कोड येथे श्री विमल शाह, असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट (AVP) असलेले व्हर्च्युअल लेक्चर लाउंज आयोजित केले. श्री कमलेश होतचंदानी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मानसशास्त्र कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेची रचना निर्णय घेण्याच्या वेळेच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी आणि सॉफ्ट स्किल्स सुधारण्यासाठी आणि स्टेजची भीती कमी करण्याच्या उद्देशाने विविध क्रियाकल्प आयोजित करण्यात आली होती.

आमचे PG-DAC विद्यार्थी त्यांच्या प्लेसमेंटसाठी चांगल्या प्रकारे तयार आहेत याची खात्री करण्यासाठी आमच्या सतत प्रयत्नांमध्ये, आम्ही मॉक इंटरव्ह्यू आणि ग्रुप डिस्कशनची एक मजबूत प्रणाली स्थापन केली आहे. ही सत्रे केवळ सराव नसून, प्रशिक्षण कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा घटक आहेत, जे विद्यार्थ्यांना वास्तववादी अनुभव आणि मौल्यवान अभिप्राय प्रदान करतात व त्यांच्या करिअरमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवू शकतात.

मुलांचे आणि कर्मचाऱ्यांचे कठोर परिश्रम, समर्पण आणि त्यांना मिळालेल्या सर्वसमावेशक शिक्षणाचा दाखला म्हणून, AIT(YCC) विद्यार्थ्यांनी सध्या सुरू असलेल्या प्लेसमेंट प्रोग्राममध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आय. टी. क्षेत्रात स्पर्धा परिस्थिती असूनही, आमच्या PG-DAC विद्यार्थ्यांनी प्रभावी पॅकेजेस मिळवले आणि १ कंपन्यांमध्ये पदे मिळविलीं.

उत्तम शैक्षणिक दर्जा आणि कठोर परिश्रमाच्या भव्य उत्सवात, आम्ही आमच्या मार्च २०२४ बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी अलीकडेच दीक्षान्त समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवास संपला आणि व्यावसायिक जीवनातील एका नव्या अध्यायाची सुरुवात झाली.

सामाजिक जबाबदारीच्या आमच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून, AIT(YCC) ने वंचित १० वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रीलिम परीक्षेची व्यवस्था केली. या उपक्रमाचा उद्देश या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतिम परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक असलेला अनुभव आणि आत्मविश्वास प्रदान करणे हा आहे.

C-DAC च्या छत्राखाली, आम्ही अभियांत्रिकी महाविद्यालयांशी करार करून आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑफर करण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून आमचा शैक्षणिक प्रसार वाढवण्याच्या प्रयत्नात आहोत. हे अभ्यासक्रम तंत्रज्ञानाच्या गंभीर आणि उदयोन्मुख क्षेत्रातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

**Certificate Courses Offered:**

- Network Security
- Advanced Web Technology
- Linux System Administration
- Internet of Things (IoT)

व्यापक तऱ्हेने प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि आमच्या येथील C-DAC आणि MKCL अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी एकत्रित प्रयत्नांमध्ये, लक्ष्यित विविध प्रयत्नांची मालिका पार पाडली गेली आहे. हे उपक्रम जागरूकता वाढवण्यासाठी, स्वारस्य निर्माण करण्यासाठी आणि शेवटी या प्रतिष्ठित कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी डिझाइन केले गेले आहेत. आमचा दृष्टिकोन पारंपरिक पद्धतींना आधुनिक सोशल मीडिया धोरणांसह जोडतो ज्यामुळे जास्तीत जास्त पोच आणि प्रतिबद्धता वाढू शकते.

व्यापक तऱ्हेने प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि आमच्या येथील C-DAC आणि MKCL अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी एकत्रित प्रयत्नांमध्ये, लक्ष्यित विविध प्रयत्नांची मालिका पार पाडली गेली आहे. हे उपक्रम जागरूकता वाढवण्यासाठी, स्वारस्य निर्माण करण्यासाठी आणि शेवटी या प्रतिष्ठित कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी डिझाइन केले गेले आहेत. आमचा दृष्टिकोन पारंपरिक पद्धतींना आधुनिक सोशल मीडिया धोरणांसह जोडतो ज्यामुळे जास्तीत जास्त पोच आणि प्रतिबद्धता वाढू शकते.

आय.टी. शिक्षणातील उत्कृष्टतेचे प्रमाण म्हणून ए.आय.टी.ने आपली प्रतिष्ठा कायम राखली आहे, विद्यार्थ्यांना उद्योगात यशस्वी करिअरसाठी तयार केले आहे. आय. टी. क्षेत्रात होणारे बदल व प्रगती समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही प्रतिबद्ध आहोत.

## ७ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर उपक्रम :-

● **प्रथम मुंबई शिक्षण उपक्रम :-** मुंबई शहरात झोपडपट्टीवासीयांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या चालविणे, संगणकाचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून या उपक्रमाकरिता शिक्षक शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे प्रथम मुंबई शिक्षण उपक्रमामार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास चव्हाण सेंटरकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या केंद्रीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावर आहे.

● **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स :-** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य चव्हाण सेंटरच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्त्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळ्या क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करून घेता येईल, याची माहिती प्रसिद्ध केली जाते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण केंद्र इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

● **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ :-** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे कार्यालय केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर आहे.

● **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्चफाउंडेशन (मुंबई फर्स्ट) :-** मुंबई फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट

मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारून येथील पायाभूत सुविधांमध्ये विकास करून नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. या संस्थेचे कार्यालय चव्हाण सेंटरच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.

## ८ यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला मिळालेले अनुदान :

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईला सन २०२३-२४ मध्ये रु. १,००,८३,७२७/- (एक कोटी त्र्याऐंशी हजार सातशे सत्तावीस) इतकी रक्कम देणगी म्हणून प्राप्त झाली आहे.

## ९. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या विभागांमार्फत राबवण्यात आलेले उपक्रम :

### ९.१ महिला विभाग

महिला विभागाच्या वतीने महिलांची विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम चव्हाण सेंटरच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

महिला विभागातर्फे सन २०२३-२०२४ मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

- **यशस्विनी सन्मान सोहळा**

**विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा सत्कार सोहळा**

तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वा खालील राज्य शासनाने १९९४ साली जाहीर केलेल्या महिला धोरणाला २२ जून २०२३ रोजी २९ वर्षे पूर्ण झाली. याच ऐतिहासिक दिवसाचे महत्व लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'यशस्विनी सन्मान सोहळा' आयोजित केला होता. राज्यातील सामाजिक, साहित्य, कृषी, पत्रकारिता, उद्योजकता आणि क्रीडा प्रशिक्षण या सहा क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा यशस्विनींना हा पुरस्कार देण्यात आला. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा दिमाखदार सोहळा पार पडला. ज्येष्ठ अभिनेत्री तथा सामाजिक कार्यकर्त्या शबाना आझमी आणि ज्येष्ठ कवी-लेखक जावेद अख्तर यांच्या हस्ते सहा यशस्विनींचा सन्मान करण्यात आला. आदरणीय शरद पवार साहेब या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

आदरणीय शरद पवार साहेबांनी यावेळी बोलताना राज्यात महिला धोरण आणताना झालेला विरोध, त्यासाठी करावा लागलेला संघर्ष आणि त्या सर्वांवर मात करत महिला धोरण कसे लागू केले आणि हळूहळू त्यांचा तो निर्णय कसा लोकांना आवडू लागला यावर सविस्तर विवेचन केले. देशाचे संरक्षण मंत्री असताना संरक्षणदलातही महिलांसाठी खास आरक्षण ठेवण्याची गरज आणि त्यानुसार नियोजन कसे केले आणि आजमितीला संरक्षण दलात महिला अधिकारी कशा कामगिरी बजावत आहेत, तसेच हवाई दलातील अपघातांचे प्रमाण महिलांमुळेच कसे कमी झाले, याबद्दल भाष्य केले.

महिलांना कोणत्याही क्षेत्रात कमी न लेखता त्यांना बरोबरीची आणि सन्मानाची वागणूक देण्याची गरज असून

महिलांचे युग आले आहे, अशा शब्दात जावेद अख्तर यांनी आपले मत मांडले. प्रत्येक क्षेत्रात मोठमोठ्या पदावर त्या काम करू लागल्या आहेत. त्यांना फक्त आदर नाही, तर एक व्यक्ती म्हणून बरोबरीचे स्थान देण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी नमूद केले. शबाना आझमी यांनी यावेळी बोलताना महिला ही घरातील एक गरज आहे म्हणून न बघता ती एक स्वतंत्र व्यक्ती असून तिलाही स्वतंत्र विचार करू द्यायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली, बजा पहिल भारती नागेश स्वामी यांचा शेती आणि माती हा जिव्हाळ्याचा विषय आहे. बियाणांपासून ते मार्केटींगपर्यंत आपण स्वावलंबी कसे व्हावे ? हे शेतकऱ्यांना शिकवण्यासाठी 'मोकाट कृषी विद्यापीठाची' स्थापना केली. शेती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी गावातील मुलांना लहानपणापासूनच शेती आणि माती हा विषय समजून सांगण्यात त्या अग्रेसर आहेत. शेती आणि माती यांची सेवा करणाऱ्या भारती नागेश स्वामी यांना 'यशस्विनी कृषी सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

समाजभान जागृत ठेवून, अस्मिता जपत, नकुशा मुलीच्या दु:ख-शोषणाच्या जाणीवेतून डॉ. सुनिता यांच्या लेखणीतून 'फिन्द्री' ही एक नवी कोरी कादंबरी अवतरली. या कादंबरीचा मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. आपल्या चतुरस्त्र लेखणीतून साहित्याच्या कक्षा रूंदावणाऱ्या आणि सामाजिक जाणीवेतून निर्माण झालेल्या भावना आपल्या साहित्यात जपणाऱ्या डॉ. सुनिता बोर्डे खडसे यांना 'यशस्विनी साहित्य सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

'एक लक्ष ठेवी' या उद्देशाने दहा बाय दहाच्या खोलीत सुरु केलेल्या महिला बचत गटाचे रुपांतर आजच्या घडीला 'गोदावरी अर्बन' बँकेच्या रुपात चालू आहे. बचत गटातील महिलांना राज्यातील नॅशनल बँकेमध्ये अपमानास्पद वागणूक, कर्ज मागायला गेल्यावर टाळाटाळ करणे ही सर्व कारणे राजश्री ताईंच्या नजरेस पडली आणि या महिला बचत गटांसाठी आपण स्वत:हून काहीतरी केले पाहिजे. या प्रेरणेतून त्यांनी सहकारी चळवळीचा अभ्यास केला आणि उभी राहिली "गोदावरी अर्बन बँक"! आदरणीय शरद पवार साहेबांनी आणलेल्या महिला धोरणाचा प्रत्यय राजश्री हेमंत पाटील यांच्या कार्यात पाहायला मिळत आहे. उद्योजिका राजश्री हेमंत पाटील यांना 'यशस्विनी उद्योजकता सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतात. त्यापैकी 'कचरा वेचक' हा एक महत्वपूर्ण घटक आहे. त्यांचे पर्यावरणातील योगदान, कामगार म्हणून त्यांचा दर्जा, शहराच्या घनकचरा व्यवस्थापनामध्ये त्यांची महत्वपूर्ण भूमिका हे देखील महत्वाचे आहे. हीच उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून १९९३ साली पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील कचरा वेचकांनी एकत्र येऊन कागद काच पत्र कष्टकरी पंचायत ही संघटना स्थापन केली. या संस्थेच्या मुख्य संस्थापकांपैकी एक म्हणजे "लक्ष्मी नारायणन" ! लक्ष्मी नारायणन यांना 'यशस्विनी सामाजिक सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आज घडीला शैलजा जैन यांनी तीनशे हून अधिक खेळाडूंना प्रशिक्षित केले आहे. त्यांनी घडवलेले खेळाडू त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात नाव लौकिक मिळवत आहेत. ग्रामीण भागात जाऊन त्यांनी टॅलेंट हंट राउंडद्वारे ४० मुलींची निवड केली आणि त्यांना नाशिक, महाराष्ट्र येथून दिडशे किमी अंतरावरील वनवासी आश्रम, गुही येथे अनेक प्रशिक्षण सत्रांद्वारे शैलजा यांनी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. शैलजा जैनेंद्रकुमार जैन यांना 'यशस्विनी क्रीडा प्रशिक्षक सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सर्वसामान्य माणूस व त्यांचे प्रश्न हे शर्मिला यांच्या पत्रकारितेचे कायम सूत्र राहिले आहे. समाजातील वंचित-उपेक्षित घटकांसाठी त्या सातत्याने लिखाण करतात. शोधपत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी विविध प्रकारच्या

गैरप्रकारांवर वेळोवेळी प्रकाशझोत टाकला, हे प्रश्न तडीस नेले. समाजातील शेवटचा माणूस हा पत्रकारितेचा केंद्रबिंदू असायला हवा ही भावना जोपासणाऱ्या शर्मिला प्रभाकर कलगुटकर यांना 'यशस्विनी पत्रकारिता सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी खासदार श्रीनिवास पाटील, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. फौझिया खान, सुरेखा ठाकरे, उषा दराडे, आशा मिरगे, अंकुश काकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष माजी महापौर प्रशांत जगताप, विद्या चव्हाण, अजित निंबाळकर, सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दीप्ती नाखले, राजलक्ष्मी भोसले, मृणालिनी वाणी, भारती शेवाळे व चव्हाण सेंटरचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच राज्यभरातून आलेल्या महिला भगिनी यावेळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

"यशस्विनी सन्मान" पुरस्कारासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवून घेण्यात आले आणि आलेल्या अर्जांचे परीक्षण करूनच सहा 'यशस्विनी' निवडल्या गेल्या. अरुंधती पाटील, रेणुका कड, ज्योती म्हापसेकर यांनी सामाजिक क्षेत्र, माया पंडित, सुजाता शेनाई, नीरजा धुळेकर यांनी साहित्य क्षेत्र, मेघा बोरसे, सीमा कुलकर्णी, मनीषा भोसले यांनी कृषी क्षेत्र, जयदेवी स्वामी, उज्ज्वला बर्वे, मेधा कुलकर्णी यांनी पत्रकारिता, मीनल मोहाडीकर, मोहिनी केळकर, मेधा सामंत यांनी उद्योजकता तर जानकी कुलकर्णी यांनी क्रीडा प्रशिक्षक इ. क्षेत्रात निवड समितीने सदस्य म्हणून काम पाहिले.

- **सुगरण महिलांचा भीमथडी यात्रेमध्ये सहभाग**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून सुगरण प्रकल्प सुरु झाला. याअंतर्गत सुगरण महिलांना त्यांनी बनविलेले खाद्यपदार्थ विक्रीस भीमथडी यात्रेत संधी मिळाली. Live खाद्य पदार्थांना अतिशय मोठ्या प्रमाणात पुणेकरांनी प्रतिसाद दिला.

- **महिला बचत गटांचे स्टॉल्स काला घोडा आर्ट फेस्टिवलमध्ये**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून यशस्विनी अभियान चालू करण्यात आले. याअंतर्गत महिला बचत गटांनी बनविलेले उत्पादन काला घोडा फेस्टिवलमध्ये प्रदर्शनास व विक्रीस ठेवले होते. या यशस्विनींच्या स्टॉल्सना भरपूर प्रतिसाद मिळाला.

- **यशस्विनी जिल्हा समन्वयक राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन - १० मे**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या यशस्विनी सामाजिक अभियानांतर्गत यशस्विनी जिल्हा समन्वयक बैठकीचे आयोजन आज यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे करण्यात आले होते. महिलांच्या कार्यक्षमतेमध्ये वृद्धी होण्यासाठी निश्चित आणि दिशादर्शक प्रयत्नांवर भर देण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

- **सुगरण स्टोअर्स मध्ये दमदार विक्री**

महाराष्ट्रातील चौदा जिल्ह्यांमध्ये एकूण ३७ सुगरणची स्टोअर्स आहेत. कोल्हापूर, कळवा आणि पुणे हे स्टोअर्स सर्वात जास्त विक्री करणारे आहेत.

- **एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन**

चव्हाण सेंटरच्या महिला विभागामार्फत अहमदनगर येथे 'एकल महिला' या विषयवार एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस हेरंब कुलकर्णी, दिपक नगरगोजे आणि मुकुंद टांकसाळे यांचे मार्गदर्शन लाभले. समाज कल्याण विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते.

- **'गावरान खाद्य महोत्सवाचे' आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने कोथरूड, बावधन, आणि कात्रजयेथे गावरान खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सर्व ठिकाणी आवर्जून भेट दिली. खाद्य महोत्सवात सामील झालेल्या बचत गटातील महिलांशी त्यांनी संवाद साधला.

महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी आणि महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. पुणेकरांनीही अस्सल महाराष्ट्रीयन पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी या महोत्सवाला मोठा प्रतिसाद दिला.

- **महिलांचे हक्क व अधिकार विषयी जनजागृतिपर सत्र**

चव्हाण सेंटरच्या महिला विभागामार्फत बदलापूर येथे महिलांचे हक्क व अधिकार या विषयावर जनजागृतीपर सत्राचे आयोजन करण्यात आले. ॲड. निर्मलताई प्रभावळकर या सत्राच्या प्रमुख मार्गदर्शक होत्या. स्त्री विषयक कायद्यांवर त्यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच १३ फेब्रुवारी २०२४ रोजी अमृतेश्वर महाविद्यालय विंझर ता. वेल्हे येथे एड. अनिशा फणसळकर ह्यांनी दैनदिन जीवनात मुलिंसंबंधी कायदे व त्यांचें अधिकार अतिशय सोप्या भाषेत त्यांना समजावून सांगितले, जेणेकरून प्रत्येक युवती तिच्या अधिकार आणि सुरक्षिततेबद्दल जागरूक (Aware) होऊ शकेल.

पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या नोकरी करायला लागतील तेव्हा कार्यालयात लैंगिक हिंसा आणि छळ जर झाला तर त्याविरुद्ध कायदा त्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या लैंगिक हिंसाचार आणि छळापासून कायदेशीर संरक्षण देऊ शकेल. महाविद्यालयातील मुली अविवाहित असल्याने जेव्हा त्या लग्न करतील तर कोणी हुंडा मगितलाच तर त्या आता नक्कीच विरोध करतील. हुंडाबंदी साठी कायदा आहे पण तो शक्यतो अमलात येत नाही. समाजाला किंवा वडीलधाऱ्या माणसांच्या दबावाखाली येउन मुली त्यास बळी पडतात. तर बळी कसे पडू नये ह्याबद्दल सुंदर असे दाखले व प्रत्यक्ष उदाहरणे देत आनिशाताईंनी मुलींना खूप छान मार्गदर्शन केले. मुलीनिही भरभरून प्रतिसाद दिला. त्याचबरोबर यशस्विनी सामजिक अभियान च्या पुणे जिल्हा समन्वयक भारतीताई शेवाळे ह्यांनी शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य सांभाळणे किती महत्वाचे आहे हे मुलींना त्यांच्या मार्गदर्शनातून पटवून दिले. दुर्गाताई चोरघे ह्यांनी स्पर्धा परीक्षा व आव्हाने ह्यासंबंधी अडचणी कशा सोडवाव्यात ह्यावर मार्गदर्शन केलें. या कार्यक्रमाला अमृतेश्वर कॉलेज चे प्राचार्य डॉ. संजीव लाटे ह्यानी मोलाचे सहकार्य केले.

- दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी वडगांव बु. येथे करण्यात आले. समाजवादी महिला सभेच्या विश्वस्त ॲड. अर्चना मोरे यांनी दैनंदिन जीवनात महिलांसंबंधी कायदे व त्यांचे अधिकार अतिशय सोप्या भाषेत त्यांना समजावून सांगितले. जेणेकरून ती तिच्या अधिकार आणि सुरक्षिततेबद्दल जागरूक (Awareness) होऊ शकेल.

कार्यालयात लैंगिक हिंसा आणि छळविरुद्ध कायदा महिलांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या लैंगिक हिंसाचार आणि छळापासून कायदेशीर संरक्षण देण्यासाठी पॉश-द सेक्सुअल हैरेसमेंट ऑफ विमेन एट वर्कप्लेस, कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण नियम, हुंडा बंदी कायदा, बलात्काराच्या पीडितांना मदत आणि पुनर्वसनासाठी सुधारित योजना इ. विषयावर मार्गदर्शन केले. महिलांनी भरपूर प्रतिसाद दिला.

दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी घाटकोपर येथे जनजागृतीपर सत्राचे आयोजन करण्यात आले. स्त्री मुक्ती संघटनेच्या शोभा कोकिटकर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. बालविवाह, प्रॉपर्टी राईट्स, २००६ नविन कायदा, domestic violence, RTE, पालकांसंबंधी कायदा, कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण नियम, हुंडा बंदी कायदा, बलात्काराच्या पीडितांना मदत आणि पुनर्वसनासाठी सुधारित योजना इ. विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

महिलांना असलेली कोर्टाबद्दलची भिती त्यांनी नाहीशी करायचा प्रयत्न केला. या सत्रास महिलांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

## ९.२ आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभाग

- **आरोग्य**
  - **गर्भाशयमुख कर्करोग निदान शिबिर**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी चव्हाण सेंटर, आय केअर फाउंडेशन आणि सिल्वर बर्च हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी 'गर्भाशयमुख कर्करोग निदान' शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महिलांची ECG, CBC, Random blood sagar, BP इ. प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. पुणे शहर येथील झालेल्या शिबिरात ११९ महिलांनी तर पुणे ग्रामीण येथील शिबिरात १०७ महिलांनी लाभ घेतला आहे.

या शिबिरास उपस्थित सर्व महिलांना आय केअर फाऊंडेशनच्या सुजाताताई यांनी योग्य ते मार्गदर्शन केले. या शिबिरास महिलांचा भरपूर प्रतिसाद लाभला.

  - **आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि कॅन्सर पेशंट्स एँड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी , यशवंतराव चव्हाण सेंटर मध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचे सेंटरच्या सी. ई. ओ. मा. दिप्ती नाखले व आरोग्य दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभाग प्रमुख दीपीका शेरखाने यांनी ग्रंथभेट देऊन स्वागत केले. या आरोग्य शिबिराची सुरुवात कॅन्सर पेशंट्स एँड असोसिएशनच्या एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा. नीता मोरे आणि मा. मीनल परब यांच्या मार्गदर्शपर व्याख्यानाने झाली.

आपणा सर्वांना ठाऊक आहे की कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे अनेक प्रकार या जगात आढळतात. आपल्याला कर्करोग हा आजार गंभीर आहे हे तर माहीत आहेच, पण त्याची सुरुवातीची लक्षणे नक्की काय आहेत ? फक्त तंबाखूमुळे कॅन्सर होतो असा समज फार पूर्वी होता, पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या नवीन नवीन शोधाने कर्करोगाचे इतर प्रकारही समोर आले. पण आजही जनमानसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरूकता

नाही किंवा त्याबद्दल काही माहिती नाही. त्याच दृष्टीने थोडी जागरूकता निर्माण करावी उद्देशाने ह्या आरोग्य तपासणीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात पॅथॉलॉजी, सर्जन, गायनॅकॉलॉजिस्ट , ई. एन.टी स्पेशालिस्ट, फिजिशियन आणि कौन्सिलर आदी तज्ज्ञांनी तपासणी केली. सेंटरच्या इमारतीतील सर्व कार्यालयातील एकूण १५० कर्मचाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. यामध्ये प्रथम संस्था, एम.इ.डी. सी. यशवंतराव चव्हाण सेंटर कर्मचारी आदींचा समावेश होता.

- **"कर्करोग निवारण जनजागृती शिबिर'**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या वतीने आणि कॅन्सर पेशंट्स एॅड असोसिएशन व प्रथम संस्था यांच्या विशेष सहकार्याने दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी , घाटकोपर येथील डी.बी.पवार इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये कर्करोग नियंत्रण व प्रतिबंध परिचर्चा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कॅन्सर पेशंट्स एॅड असोसिएशनच्या एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर मा. नीता मोरे आणि असिस्टंट डायरेक्टर मा. मीनल परब यांची मार्गदर्शपर व्याख्यानाने झाली.

या व्याख्यानाला विभागातील एकूण ७० पालकांनी हजेरी लावली होती. व्याख्यानाच्या शेवटी उपस्थितांच्या प्रश्नांचे निरसन व्याख्यात्यांकडून करण्यात आले.

- **कॅन्सर जनजागृती कार्यक्रम**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन यांच्या वतीने व प्रथम संस्था यांच्या सहकार्याने दिनांक २७ डिसेंबर २०२३ रोजी रुणवाल नगर 1 माऊली कृपा सोसायटी,वाशी नाका येथे कॅन्सर जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या एक्जुकेटिव्ह डायरेक्टर मा. नीता मोरे यांनी सुरुवातीला या व्याख्यानाचा उद्देश काय आहे हे उपस्थितांना समजावून सांगितले. याबद्दल पालकांना माहिती देताना मोठ्या प्रमाणात तीन प्रकारचे प्रचलित असणारे कॅन्सर म्हणजे मुख, स्तन व गर्भाशय यावर माहिती दिली तसेच त्याबद्दलचे मुख्य लक्षणे, कारणे ,घ्यावयाची काळजी व उपचार यावर चर्चा झाली. पण आजही जनमानसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरूकता नाही किंवा त्याबद्दल पुरेशी माहितीही नाही. त्यांच्यातली भीती व गैरसमज, आर्थिक बाबी व त्याबद्दलची अडचण या सगळ्या गोष्टींमुळे साधी तपसणी देखील लोकं करून घेत नाहीत. आणि म्हणूनच लोकांनी ती जाणून घ्यावी व त्यांच्या ह्या प्रश्नांचे निरसन व्हावे यासाठी थोडी जागरूकता निर्माण करावी या उद्देशाने जनजागृतीपर व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. सुरुवातिला माता पालक थोड्याशा शांत होत्या कारण या विषयावर सहसा त्या घरी किंवा इतरही ठिकाणी खूप मोकळ्या प्रकारे बोलत नाहीत व त्यामुळेच त्यांना खुलून बोलणे अवघड वाटत असेल. पण निता मोरे मॅडम यांनी त्यांना मी ही तुमच्यासारखीच आहे माझ्याशी न लाजता मोकळेपणाने बोला ,प्रश्न विचारा, असे सांगितल्यावर पालक चर्चेत मोकळ्या पणाने सहभागी झाले. काहींनी मनातील प्रश्न विचारले, तर काहींनी आपल्या आप्तेष्टांमध्ये या प्रकारचे लक्षणे आहेत किंवा काही समस्या आहेत यावर त्यांना माहिती विचारली व शंकेचे निरसन करून घेतले. या व्याख्यानाला वस्तीतील एकूण ४० पालकांनी उपस्थिती दर्शविली होती.

● **मोफत आरोग्य तपासणी शिबिर :**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि कॅन्सर पेशंट्स ऍड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज बुधवार दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी, दुपारी १ ते ४ या वेळेत यशवंतराव चव्हाण सेंटरच्या ऋणानुबंध सभागृहामध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे अनेक प्रकार या जगात आढळतात. आपल्याला कर्करोग हा आजार गंभीर आहे हे तर माहित आहेच, पण त्याची सुरुवातीची लक्षणे नक्की काय आहेत ? फक्त तंबाखूमुळे कॅन्सर होतो असा समज फार पूर्वी होता, पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या नवीन नवीन शोधाने कर्करोगाचे इतर प्रकारही समोर आले. पण आजही जनमानसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरुकता नाही किंवा त्याबद्दल काही माहिती नाही. त्याच दृष्टीने थोडी जागरुकता निर्माण करावी उद्देशाने ह्या आरोग्य तपासणीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात समुपदेशक, नियमित रक्त चाचणी, सर्जन, स्त्री चिकित्सा (स्तन परीक्षा व गर्भाशय चाचणी) कान, नाक, घसा तपासणी, आणि शरीर चिकित्सा आदी तपासणींचा समावेश होता. या शिबिरात एकूण १०७ लोकांनी आपला सहभाग नोंदविला. विभागाच्या संपर्कातील मंडळी, संस्थेचे प्रतिनिधी सेंटरच्या जवळील परिसरातील सर्व गरजू व्यक्तींना या शिबिराचा लाभ घेता आला. तसेच सध्याच्या वाढत्या जनजागृतीमुळे इमारतीच्या विभागातील विद्यार्थी वर्गाने देखील उत्स्फूर्त हजेरी लावली.

● **मोफत आरोग्य तपासणी व चष्मे वाटप शिबिर**

ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित शारदा महिला संघ, यशवंतराव चव्हाण सेंटर, ग्रामपंचायत लासुर्णे, शिवनंदन हॉस्पिटल बारामती, AK लॅब बारामती, प्राथमिक आरोग्य केंद्र लासुर्णे, नर्सिंग कॉलेज शारदानागर, आणि जतन फाउंडेशन यांच्या वतीने लासुर्णे येथे दि. ४ जून २०२३ रोजी महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व चष्मेवाटप शिबिर पार पडले. या शिबिराला, सुनंदा पवार, डॉक्टर्स, सर्व सहभागी संस्थांचे पदाधिकारी, सपोर्टिंग स्टाफ, परिसरातील महिला उपस्थित होत्या.

● **वेल बिईंग अंतर्गत**

**विशेष व्याख्यानमालेचे आयोजन**

१. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने डॉ. यात्री ठाकरे यांचे 'वुमन अँड मेंटल हेल्थ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी दिप्ती नाखले, दीपिका शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते.

२. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने डॉ. यश वेलणकर यांचे "युअर इमोशन, युअर रिलेशनशिप, युअर बॉडी" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी दिप्ती नाखले, विजय कान्हेकर, दीपिका शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते.

३. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने सिद्धी घीवाला यांचे 'वुमन वेल बिईग' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. वेल बिईंग अंतर्गत या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

● **दोन पिढ्यांतील नात्यांचा प्रवास उलगडणारी वेबसिरीज 'दो गुब्बारे'**

ज्येष्ठ नागरिक व युवा यांच्या नात्यांची परिभाषा उलगडणारा भावनांचा प्रवास म्हणजे 'दो गुब्बारे' सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते, व मानसोपचार तज्ञ डॉ.मोहन आगाशे यांच्या अभिनयातून अधिक स्पष्ट झाले! कधी कधी काही

नाती आपली असूनही दुरावतात, सुखी परिवार हा फक्त फोटोमध्येच दिसतो. पण प्रत्यक्षात या फोटोफ्रेमची चौकट खिळखिळी झालेली असते. इतकी की जराशा धक्क्याने ती कोसळून पडेल आणि आत असलेल्या माणसांचं नातं तुटून जाईल म्हणून ती जिवापाड जपावी आणि कुणालाही कळू नये हाच प्रयत्न असतो. ही धडपड मा. वरुण नार्वेकर यांच्या दिग्दर्शनातून आज पाहायला मिळाली. वेगळी भाषा, प्रांत, संस्कृती यासोबतच युवा व ज्येष्ठ नागरिक या दोन्ही पिढीचा एकमेकांसोबत होणारा सुखद संवाद, हा दुरावल्यामुळे व दुखावलेल्या नात्यांवर मायेची फुंकर घालणारा होता. यामुळे नव्याने सुरू झालेल्या या नात्यासोबत पुन्हा आयुष्य उमेदीने जगण्याची इच्छा होते. हे लेखकाने अतिशय उत्तमरीत्या मांडले आहे तसेच मा. डॉ. मोहन आगाशे व मा. सिद्धार्थ शॉ यांच्या अभिनयाने त्यास पूर्ण न्याय दिला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने पिढीपिढीतील स्नेहसंबंध या उपक्रमांतर्गत दो गुब्बारे या वेब सिरीजचे स्क्रिनिंग दिनांक ५ ऑगस्ट २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात पार पडले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक व युवा यांचा प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्क्रिनिंग झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी जमलेल्या दोन्ही पिढयांसोबत चर्चा केली.

- **आत्महत्या प्रतिबंध व उपाय या विषयावर व्याख्यान !**

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचे औचित्य साधून चव्हाण सेंटरच्या आरोग्य, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभागामार्फत 'आत्महत्या प्रतिबंध व उपाय' या विषयावर ऑनलाईन स्वरूपात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

आजच्या जीवनाशी त्रस्त पिढीने (युवा, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, ट्रान्सजेंडर) आपल्या सुख द:खाची एक नवीन परिभाषा तयार केली असून त्यांनी आखलेल्या परिघामधून थोडे जरी दुर्लक्षित झाले किंवा सहन झाले नाही, तरी आपले जीवन संपवण्याच्या दृष्टीने टोकाचे पाऊल उचलत असल्याचे समोर आले आहे. बिघडलेल्या मानसिक अवस्थेमुळे उद्भवणारी परिस्थिती यांमुळे या बाबी सर्रास घडत आहे. यावर प्रतिबंध करणे शक्य आहे आणि योग्य वेळी समुपदेशन केल्यास एखाद्या व्यक्तीची मानसिक स्थिती सुधारण्यास खूप मदत होते. कुटुंब आणि मित्रांनी तशा व्यक्तीच्या वागण्यावर किंवा हालचालींवर लक्ष ठेवणे आणि त्याची मानसिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. नाहीतर यामुळे अनेक रोग उद्भवू शकतात. असे अनेक मानसिक आजार डोकं वर काढताना दिसत आहेत. सर्वच वयोगटात मानसिक आजारांचे प्रमाण कमीअधिक स्वरूपात आढळते अधिक प्रमाणात हे आजार बळावले की आत्महत्या हाच शेवटचा पर्याय, असा दिसू लागतो. हे मानसिक आजार समुपदेशनातून देखील सुधारू शकतात.

या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण सेंटर, आरोग्य, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभागामार्फत 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त' लोकांमध्ये जनजागृतिपर रविवार दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी, सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० या वेळेत 'आत्महत्या प्रतिबंध व उपाय' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे (झूमच्या माध्यमातून) आयोजन केले होते. क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट नायर हॉस्पिटल, मुंबईच्या मा. डॉ.मानसी जोशी, यांनी उपस्थितांशी या विषयावर संवाद साधला.

- **शोध आनंदी जीवनाचा**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून 'शोध आनंदी जीवनाचा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मानसिक आरोग्याविषयी समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

- **दिव्यांग**

  - **मोफत डिजिटल श्रवणयंत्र पूर्व तपासणी व वाटप शिबिर**

ज्येष्ठ नागरिक आणि कर्णबधिर मुलांनाही ऐकण्याचा अधिकार असून त्यांच्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही प्रयत्नशील आहोत. त्याचाच एक भाग म्हणून बारामती येथे दि. ११,१२ आणि १५ ऑक्टोबर २०२३ रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

खासदार सुळे यांच्या पुढाकाराने यशवंतराव चव्हाण सेंटर, स्वरूप चॅरिटेबल ट्रस्ट, ठाकरसी ग्रुप आणि महात्मा गांधी सेवा संघ संचालित दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या सहकार्याने बारामती येथे मोफत श्रवणयंत्र तपासणी आणि वाटप करण्यात आले. या शिबिरात पूर्वतपासणी झालेल्या लाभार्थींना श्रवणयंत्रे देण्यात आलीच. याशिवाय नव्याने काही लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांनाही या यंत्रांचे वाटप करण्यात आले. पूर्वतपासणी झालेले आणि नवे अशा एकूण २५५ लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

स्वरूप चॅरिटेबल ट्रस्टचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक रोहित मिश्रा, संचालक सुरेश पिल्लै यांच्यासह यशवंतराव चव्हाण सेंटरचे संयोजक विजय कान्हेकर, संभाजी होळकर, धनवानकाका वदक, दीपिका शेरखाने, दीपाली पवार आदी याप्रसंगी उपस्थित होते.

- खासदार सुळे यांच्या पुढाकाराने यशवंतराव चव्हाण सेंटर, स्वरूप चॅरिटेबल ट्रस्ट, ठाकरसी ग्रुप आणि महात्मा गांधी सेवा संघ संचालित दिव्यांग पुनर्वसन केंद्र. यांच्यावतीने शिव छत्रपती मंगल कार्यालय, धनकवडी, पुणे येथे (दि. १३ ) आणि (दि. १४) ऑक्टोबर २०२३ रोजी शिबिर पार पडले. या शिबिरात पूर्वतपासणी झालेल्या लाभार्थींना तर श्रवणयंत्रे देण्यात आलीच. याशिवाय नव्याने काही लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांनाही या यंत्रांचे वाटप करण्यात आले. पूर्वतपासणी झालेले आणि नवे अशा एकूण १५३ लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

स्वरूप चॅरिटेबल ट्रस्टचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक रोहित मिश्रा, संचालक सुरेश पिल्लै यांच्यासह यशवंतराव चव्हाण सेंटरचे संयोजक विजय कान्हेकर, माजी नगरसेवक, धनकवडी, पुणे चे मा. विशालभाऊ तांबे, दीपिका शेरखाने, मनीषा खिल्लारे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर आणि सिग्निया कंपनीच्या वतीने सोलापूर येथे दि.७ नोव्हेंबर रोजी मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात चव्हाण सेंटरच्या लोकोपयोगी उपक्रमांचे सर्वच मान्यवरांनी कौतुक केले. चव्हाण सेंटर ही लोकांसाठी काम करणारी एक उत्तम संस्था आहे, अशा शब्दात अनुराधा पौडवाल यांनी सेंटरचा गौरव केला.

आरोग्य, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभागाचे संयोजक विजय कान्हेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात आरोग्य दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभाग करत असलेल्या कामाची सविस्तर माहिती दिली. गेली पंधरा वर्ष दिव्यांगासाठी हा विभाग अविरत कार्यरत आहे. शीघ्र निदान आणि शीघ्र उपचार या अनुषंगाने त्यांना लागणारे कृत्रिम अवयव साहित्य, चव्हाण सेंटरद्वारे पोहोचविले जात आहेत, त्यातील एक म्हणजे श्रवणयंत्र !! ह्या श्रवयंत्रामुळे मुलांच्या चेहेऱ्यावर येणारे हसू , हा आनंद ह्याचे मोजमाप करता येणार नाही. कृत्रिम अवयव साहित्य वाटपासाठी मोबाईल गाडीची व्यवस्था यामधून गरजूंनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. तसेच आजपर्यंत वीस हजार लाभार्थ्यांना चाळीस हजार श्रवणयंत्रांचे वापर करण्यात आले. अर्ली इंटर्व्हेन्शनच्या माध्यमातून दरवर्षी एक विषय घेऊन राज्यस्तरीय परिषद घेत असतो व शासनामार्फत त्याचा पाठपुरावा घेण्याचे काम स्वत:

आदरणीय सुप्रियाताई करत असतात. अशी माहीती श्री.विजय कान्हेकर यांनी दिली.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुलांना श्रवणयंत्र बसविण्यात आले व त्यानंतर सर्व लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

माजी आमदार व नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंड,शाखा सोलापूर चे अध्यक्ष श्री. प्रकाश यलगुलवार यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देत चव्हाण सेंटरच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. चव्हाण सेंटर लोकांसाठी काम करणारी एक उत्तम संस्था असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

सिग्निया कंपनीचे सीईओ अविनाश पवार यांनी खासदार आणि चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्या भेटीनंतर सिग्निया कंपनी कशा प्रकारे या सामाजिक उपक्रमात सहभागी झाली, याचा घटनाक्रम तपशीलवार सांगितला. याबरोबरच सध्याच्या जीवनशैलीमुळे कानावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहितीही त्यांनी दिली. श्रवणयंत्र वाटपानंतर कर्णबंधिरांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य खूप काही सांगून जात होते.

यशवंतराव चव्हाण सेंटरने सिग्निया कंपनीच्या सहकार्याने यावर्षी आतापर्यंत तीनशेहून अधिक लाभार्थ्यांना श्रवणयंत्राचे वाटप केले आहे. चव्हाण सेंटरचे कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे, जेष्ठ सदस्य दत्ता गायकवाड, कार्यक्रमाचे व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, विभागाचे संयोजक विजय कान्हेकर, सोलापूर केंद्राचे सचिव दिनेश शिंदे, समन्वयक अभिजित राऊत, विभागाच्या प्रमुख दिपीका शेरखाने, सहाय्यक मनिषा खिल्लारे, सोलापूर केंद्राच्या सहाय्यक तेजस्विनी श्रीरेखम, शशीभूषण यलगुलवार आदी या वेळी उपस्थित होते. नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंड आणि सोलापूर शाखेचे विशेष सहकार्य लाभले.

- **बढते कदम की ओर**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त 'बढते कदम की ओर...' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. सदर परिसंवाद दि. ९ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात सुरुवातीला योगिता तांबे यांनी तबलावादन केले. संगीत, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, उद्योग तसेच समाजमाध्यमे या क्षेत्रांमध्ये जे दिव्यांग आपापल्या परीने छाप उमटवत आहेत. या सर्वांच्या प्रयत्नांना साथ मिळावी या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन चव्हाण सेंटरमार्फत करण्यात आले होते. या परिसंवादास चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

तंत्रज्ञानाचा वापर आपल्या आयुष्यात चांगल्या पद्धतीने होतोय तसाच दिव्यांगांच्या आयुष्यात देखील व्हायला हवा आणि दिव्यांग देखील आत्मनिर्भर व्हायला हवेत, अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी आज आपल्या भावना व्यक्त केल्या.

दिव्यांगांसाठी उपलब्ध औषधांची नावे ब्रेल लिपी मध्ये देखील असायला हवीत, असे प्रतिपादन परिसंवादातील पहिल्या सत्रात अनुजा संखे यांनी केले. पहिल्या सत्रात योगिता तांबे, नवनीत कुलकर्णी, अनुजा संखे यांची मुलाखत अमुकतमुक या यूट्यूब चॅनलचे ओंकार जाधव आणि शार्दुल कदम यांनी घेतली. तसेच दुसऱ्या सत्रात मीनाक्षी निकम, फरीदा लांबे, अभिजित राऊत, सुमित पाटील, कविता मुरूगकर यांची मुलाखत दीपिका शेरखाने यांनी घेतली.

चव्हाण सेंटरचे सरचिटणीस हेमंत टकले, सीईओ दिप्ती नाखले, विजय कान्हेकर, आरोग्य, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभागाच्या प्रमुख दीपीका शेरखाने, मनीषा खिल्लारे, वंदना जगताप यांच्यासह अनेक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **दिव्यांग प्रमाणपत्र**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्यावतीने दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र म्हणजेच युडीआयडी कार्ड घरपोच देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. हे कार्ड मिळण्यासाठी बारामती आणि परिसरातील दिव्यांग बांधवांना तपासणीसाठी पुण्याला येणे गरजेचे होते. पण यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पाठपुराव्यामुळे ही तपासणी आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल कॉलेज, बारामती येथेच उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचा फायदा बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक दिव्यांग बांधव आणि त्यांच्या कुटुंबीयांना झाला याचा आनंद आहे. तसेच मागील दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेले या उपक्रमामुळे आजपर्यंत ४ २ १ ० पेक्षा जास्त दिव्यांग बांधवांचे प्रमाणपत्र बनवण्यात आले आहेत ही अत्यंत आनंदाची बाब आहे. यापुढेही दिव्यांग बांधवांच्या सोयीसुविधांसाठी काम करण्यासाठी चव्हाण सेंटर कटिबद्ध आहे.

- **मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप शिबिर**

दिव्यांगांसाठी आयोजित मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप शिबिर संपन्न झाले. कृत्रिम अवयव आणि इतर साधने हे दिव्यांगांना सहाय्यभूत ठरतात. त्यांना सन्मानाचे जीवन जगता यावे, त्यांच्या जीवनातील संघर्ष कमी व्हावा या उद्देशानेच मतदारसंघातील तीनही तालुक्यात अशा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून अधिक काम करण्याची ऊर्जा मिळाली. त्यांच्या कठीण आयुष्याला सुखकर करण्यात खारीचा वाटा उचलू शकलो याचे समाधान आहे. यावेळी शिबिराला मोठ्या संख्येने आलेल्या दिव्यांगांशी संवाद साधला.

- **ज्येष्ठ नागरिक**
  - **ज्येष्ठ नागरिकांसाठी एक दिवसीय जनजागृती कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, फेडरेशन ऑफ सिनियर सिटीझन्स ऑर्गनायझेशन ऑफ महाराष्ट्र (FESCOM), वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ मे २०२३ रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी एक दिवसीय जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस सातारा, सांगली, कोल्हापूर आणि कराड येथील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

या कार्यशाळेत 'ज्येष्ठांसाठी केंद्र व राज्य शासनाचे धोरण आणि ज्येष्ठांसाठी उपयुक्त कायदे' या विषयावर फेसकॉमचे अध्यक्ष अरुण रोडे, 'ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक लाभांच्या योजना' या विषयावर फेसकॉमचे उपाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, 'कृतिशील वृद्धत्व' या विषयावर फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल उपाध्यक्ष अंजुमन रशीद खान, 'ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर क्राईम जागरूकता' या विषयावर मुंबईच्या माजी महापौर ॲड. निर्मला सामंत-प्रभावळकर, 'वयोवृद्धांचे मानसिक आरोग्य' या विषयावर परिवर्तन ट्रस्ट, सातारा येथील रूपाली भोसले आणि योगिनी मगर यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर, दिपीका शेरखाने, संतोष मेकाले, योगेश कुदळे, वेणूताई चव्हाण ट्रस्टचे नंदकुमार बटाने तसेच वेणूताई चव्हाण स्मारक चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

- **जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिवस**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिवस' या विषयावर दि. १५ जून

२०२३ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत 'सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिबंधासाठी घ्यावयाची खबरदारी' या विषयावर ॲड. प्रमोद ढोकळे, 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिवसाचा इतिहास' या विषयावर ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर, 'वृद्धांसाठी पुनर्वसन थेरपी' या विषयावर डॉ. चैतन्य उल्हास मंत्री आणि डॉ. जुईली उल्हास मंत्री यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी चव्हाण सेंटरचे कोषाध्यक्ष हेमंत टकले, विश्वस्त बी.के. अग्रवाल, सीईओ दिप्ती नाखले, विजय कान्हेकर, आरोग्य विभाग प्रमुख दीपिका शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते.

- **ज्येष्ठांसाठी परिसंवादाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादासाठी मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश मोरेश्वर गोडसे, डॉ. प्रकाश पाटील आणि सीमंतीनी खोपकर हे सर्व उपस्थित होते. या परिसंवादामध्ये २० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग होता. या कार्यक्रमासाठी चव्हाण सेंटरचे सरचिटणीस हेमंत टकले, सीईओ दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ, दीपिका शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते.

- **ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दि. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये निवडक चार ज्येष्ठ नागरिकांना व एका ज्येष्ठ नागरिक संस्थेला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

रत्नागिरी येथील रेखा बागुल, कल्याण येथील मीनल ठाकोर, रत्नागिरी येथील डॉ. श्रीरंग कद्रेकर, नवी मुंबई येथील अण्णासाहेब टेकाळे यांना यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ठाणे येथील ज्येष्ठ नागरिक संस्था वासिंद व परिसर यांना यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संस्था पुरस्कार देऊन सन्मानित केले.

या प्रसंगी न्यायमूर्ती सी.एल.थूल, चव्हाण सेंटरचे सरचिटणीस हेमंत टकले, सीईओ दिप्ती नाखले, माजी महापौर निर्मला सामंत प्रभावळकर, ज्येष्ठ नागरिक भवन, नेरूळ नवी मुंबईचे अध्यक्ष दिगंबर चापके, फेस्कॉम कोकण विभागाचे अध्यक्ष शा. गो. पाटील, फेस्कॉम मुंबई विभागाचे अध्यक्ष शरद डिचोलकर, चव्हाण सेंटरचे विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, दीपिका शेरखाने यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

- **ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद कायदेशीर मार्गदर्शन आणि चर्चासत्र संपन्न, चिपळूण, रत्नागिरी**

यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र रत्नागिरी यांच्या वतीने दि. २८ नोव्हेंबर २०२३ रोजी ज्येष्ठ नागरिकांची कार्यशाळा मोठ्या प्रतिसादात संपन्न झाली. शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.

या कार्यक्रमाला हायकोर्टाचे ज्येष्ठ एडवोकेट प्रमोद ढोकळे यांनी या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले कायदे त्यांच संगोपन, त्यांचे हक्क याविषयी आपल्या कुटुंबातील मुला मुलींसोबत राहताना येणाऱ्या अडचणी याबद्दल सविस्तर चर्चासत्र देखील झाले. प्रश्नोत्तराच्या तासात अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आपले अनुभव या वेळी उपस्थितांसमोर मांडले.

भारतामधील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या कायद्यांमधील तरतुदी, मुलं सांभाळ करत तर त्या संदर्भात कुठे आणि कशी तक्रार करावी याचीही माहिती यावेळी देण्यात आली.

आनंदाची गुरूकिल्ली या विषयावर डॉक्टर सरदार यांनी उत्तम व्याख्यान केले. जमलेल्या ज्येष्ठ नागरिकांसोबत गप्पा मारून आनंदाने जीवन जगण्याचे सोपे सूत्र सांगितले. या व्याख्यानात उपस्थित नागरिकांनीही चर्चेत सहभाग घेतला. या वेळी वय वर्ष ८२ असलेल्या डॉक्टर साठे यांचा स्विमिंग मध्ये यशस्वी सहभाग नोंदवल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला हायकोर्टाचे ॲड. प्रमोद ढोकळे, माधवबागचे सीआरझेड प्रमुख डॉक्टर मिलिंद सरदार, श्रीमती सुमती जांभेकर, फेस्कॉम्म चे सदस्य श्री उस्मान बांगी, माजी तहसीलदार मारुती अंब्रे, ज्येष्ठ नागरिक दिव्यांग विभागाच्या प्रमुख दीपिका शेरखाने, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्रचे सचिव अभिजित खानविलकर, सह्याद्री शिक्षण संस्थेचे श्री महाडिक सर, उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा खिल्लारे यांनी केले.

- **आम्ही म्हातारे नाही ..महातारे आहोत...**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ज्येष्ठ नागरिक प्रशिक्षक प्रशिक्षण एक दिवसीय शिबिर दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील विविध संस्था, संघटनाचे प्रतिनिधी आणि ज्येष्ठ नागरिक यांनी तसेच ज्येष्ठांसाठी काम करणारे युवक यांनी सुद्धा हजेरी लावली होती. या शिबिरासाठी ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर, श्री. प्रकाश बोरगावकर, ॲड. प्रमोद ढोकळे, डॉ. प्रकाश खलप आदी मान्यवर वक्ते म्हणून लाभले होते. ज्येष्ठ नागरिकांप्रति दुर्व्यवहार हिंसाचार आणि दुर्लक्ष, ज्येष्ठ नागरिक धोरण, पोटगी आणि कल्याण अधिनियम २००७ व २०१० तसेच इच्छापत्र, सायबर क्राईम, वारसा हक्क, ज्येष्ठ नागरिकांच्या उपचारात जेरियाट्रिक्स शास्त्राचे महत्त्व काय आहे अशा विविध उपयुक्त अशा विषयांवरती वक्त्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना आरोग्य दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक विभागाचे संयोजक मा. विजय कान्हेकर यांनी सध्या विभागाच्या वतीने चालत असलेल्या कार्याची माहिती दिली. सेंटरच्या मा.मुख्य कार्यकारी अधिकारी दिप्ती नाखले यांनी उपस्थितांशी संवाद साधला व त्यांची मते जाणून घेतली. विभागाच्या प्रमुख दीपिका शेरखाने यांनी उपस्थितांचे आभार व विभागाच्या वतीने चालणाऱ्या कामकाजांमध्ये सामावून घेण्यासाठी उपस्थितांना आवाहन करत समारोपाचे भाषण केले.

शेवटी सेंटरच्या कार्यक्रम व्यवस्थापक मा. दत्ता बाळसराफ तसेच दिग्दर्शक, लेखक मा. गणेश मतकरी यांनी कार्यक्रमाला विशेष भेट दिली व उपस्थितांचे कौतुक करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान केले.

## ९.३ कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम, मुंबई

- **कायदेविषयक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन**

१. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कायदेविषयक साहाय्य व मोफत सल्ला फोरम आणि संकल्प सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ ऑक्टोबर, २०२३ रोजी कुर्ला (पूर्व) मुंबई येथे कायदेविषयक

कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मानवी हक्क आणि अधिकार, घरगुती हिंसाचार आणि महिलांविषयक कायदे, ग्राहक संरक्षक कायदा आणि माहिती अधिकार आणि दिव्यांग कायदा २०१६ या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेस मार्गदर्शक म्हणून ॲड. जयमंगल धनराज, ॲड. आदित्य वाघोते, ॲड. डिसोझा, ॲड. विपुल पाटील उपस्थित होते.

२. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कायदेविषयक साहाय्य व मोफत सल्ला फोरम आणि संकल्प सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ ऑक्टोबर, २०२३ रोजी धारावी, मुंबई येथे कायदेविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मानवी हक्क आणि अधिकार, घरगुती हिंसाचार आणि महिलांविषयक कायदे, माहिती अधिकार आणि सायबर गुन्हे, सहकार कायदा व ॲट्रोसिटी कायदा या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेस मार्गदर्शक म्हणून ॲड. जयमंगल धनराज, ॲड. आदित्य वाघोते, ॲड. डिसोझा, ॲड. संजय बाविसाने, ॲड. मधुकर उगले उपस्थित होते.

- कायदेविषयक साहाय्य व मोफत सल्ला फोरम विभागाने वर्ष-२०२३-२०२४ मोफत कायदेशीर सल्ला दिलेल्या केसच्या माहितीचा तक्ता:

| अ. क्र. | दिनांक | अशिलाचे नाव | अशिलाचे येण्याचे ठिकाण | कायदेशीर सल्ला देणाऱ्या वकिलाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | २१/४/२०२३ | नितेश केळकर | ता. लांजा , जि. रत्नागिरा | ॲड. जयमंगल धनराज |
| २. | १२/५/२०२३ | सीमा आधाटे | लोढाहेवन, डोंबिवली | ॲड. जयमंगल धनराज |
| ३. | ३०/६/२०२३ | पूजा भरडकर | मुंबई | ॲड. जयमंगल धनराज |
| ४. | ०४/०८/२०२३ | सुभाष रामनोर | अंधेरी, मुंबई | ॲड. आदित्य वाघोते |
| ५. | २५/०८/२०२३ | दीपक घेवडे | माटुंगा, मुंबई | ॲड. जे.बी. पाटील |
| ६. | ०१/०९/२०२३ | लता माने | धारावी, मुंबई | ॲड.विपुल पाटील |
| ७. | ०१/०९/२०२३ | सुरेखा सावंत | धारावी, मुंबई | ॲड.विपुल पाटील |
| ८. | ०१/०९/२०२३ | एकनाथ सदाफुले | धारावी, मुंबई | ॲड.विपुल पाटील |

## ९.४ शिक्षण विभाग

शिक्षणाला महत्त्व देऊन क्रियाशील समाज घडविण्यासाठी, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे शिक्षण विकास मंच कार्यरत आहे. २००८ साली स्व. डॉ. कुमुद बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली या मंचाची स्थापन झाली. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर शिक्षण विकास मंचाची वाटचाल सुरू आहे. हा मंच शैक्षणिक प्रश्न, शैक्षणिक उपक्रम, शैक्षणिक धोरण इत्यादी बाबींवर मुख्यत्वे काम करतो. यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा.सौ.सुप्रियाताई सुळे, शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक असून डॉ.वसंत काळपांडे मुख्य संयोजक, बसंती रॉय

विशेष सल्लागार आणि डॉ.माधव सूर्यवंशी शिक्षण विकास मंचच्या कोअर टीमचे समन्वयक म्हणून जबाबदारी पाहतात. नजमा काझी, ऐनुल आत्तार, अजित तिजोरे, जयवंत कुलकर्णी, तुषार म्हात्रे, मच्छिंद्र बोऱ्हाडे, डॉ. रूपेश मोरे, महेंद्र गणपुले आणि अरविंद शिंगाडे हे शिक्षण विकास मंचचे कोअर टीमचे सदस्य आहेत. दत्ता बाळसराफ हे मानद कार्यक्रम व्यवस्थापक असून शिक्षण विभागाचे प्रमुख योगेश कुदळे आहेत आणि त्यांना साहाय्य करण्याचे काम संजना पवार करतात. कोअर टीमचे सदस्य आणि शिक्षण विकास मंचशी जोडले गेलेले राज्यभरातील आणि भारताबाहेरीलही सुमारे २०००० सदस्य पूर्णपणे स्वयंसेवी वृत्तीने काम करतात. यात प्राथमिक, माध्यमिक, आणि महाविद्यालयीन शिक्षक, शाळांचे मुख्याध्यापक, संस्थाचालक, शिक्षणतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षण प्रेमी आणि पत्रकार यांचा समावेश आहे. शिक्षण विकास मंचाच्या माध्यमातून प्रामुख्याने शिक्षण कट्टा, शैक्षणिक साहित्य पुरस्कार, ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथ पुरस्कार, शिक्षण साहित्य संमेलन, व्याख्याने, पालक मेळावे, दत्तक शाळा योजना तसेच शिक्षकांसाठी प्रशिक्षणे आणि कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबवले जातात.

### ४.१ शिक्षण कट्टा :

- **विषय 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान'**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान' या विषयावर शनिवार ८ जुलै २०२३ रोजी 'शिक्षण कट्टा' आयोजित करण्यात आला. या शिक्षण कट्ट्याला मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे विधिज्ञ अँड. निलेश खानविलकर हे उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करीत असताना संविधानातील मूल्ये कशा रीतीने शालेय अभ्यासक्रमातून मुलांवर प्रतिबिंबित करता येतील, याचे विवेचन केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, प्रेमभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणीय संवेदनशीलता आदी मूल्यांची रुजवणूक मुलांच्या मनात कशी करता येते हे सोदाहरण स्पष्ट केले या कट्ट्याचे संचलन बसंती रॉय यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधव सूर्यवंशी यांनी केले तर आभार अजित तिजोरे यांनी मांडले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नांदेड यांच्या वतीने 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान' विषयावर 'शिक्षण कट्टा' दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आला. डॉ. अनंत राऊत यांनी या कट्ट्यावर मार्गदर्शन केले

- **शिक्षण कट्टा समूह शाळा योजना**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने समूह शाळा योजना या विषयावर राज्यस्तरीय शिक्षणकट्टा शनिवार दिनांक ७ आक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आला. या कार्यक्रमास शासनाचे प्रतिनिधी म्हणून नागपूर शिक्षण विभागाचे उपसंचालक उल्हास नरड यांची उपस्थिती होती. २१ सप्टेंबरचा हा निर्णय का घेण्यात आला..? त्या मागची शासनाची काय भूमिका आहे, हे सांगताना कमी पटाची एकही शाळा शासन बंद करणार नाही. समूह शाळेत प्रवेश घेण्याची सक्ती शासन करणार नाही, पण गावकऱ्यांना विश्वासात घेऊन समूह शाळांची निर्मिती करण्यात येईल, अशी मांडणी त्यांनी आपल्या अभिनिवेशपूर्ण शैलीतून केली. पानशेत समूह शाळेच्या मुख्याध्यापिका शबाना शेख यांनी आपल्या शाळेचा पट वाढल्याचे सांगून मुले आवडीने शाळेत येत असल्याचे सांगितले. पुणे जिल्ह्याचे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी सुनील कुऱ्हाडे यांनी विद्यार्थी वाहतूकीची चांगली व्यवस्था

करून समूह शाळा सुरू ठेवाव्यात असे मत व्यक्त केले. शिक्षण विस्तार अधिकारी किसन भुजबळ यांनी समूह शाळांची निर्मिती गावकऱ्यांच्या मागणीनुसार व संविधानिक तत्त्वाला अनुसरून करण्यात येईल असे प्रतिपादन केले, तर सध्या कोणतीही शाळा बंद करण्यात येणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.

शिक्षण प्रतिनिधी विक्रम अडसुळ यांनी कमी पटाच्या शाळा बंद करू नये. या शाळा बंद झाल्याने वाडी-वस्तीवरील मुलांचे शिक्षण थांबेल. कळमशेत या कमी पटाच्या शाळेत काम करणारे शिक्षक संजीव बागुल यांनी दुर्गम भागात वाहतुकीची व्यवस्था करणे अवघड आहे. शाळांचा अभ्यास करून टप्प्याटप्याने ही योजना सुरू करावी, असे सांगितले. माजी शिक्षण सहसंचालक आणि शिक्षणतज्ज्ञ भाऊ गावंडे यांनी पटसंख्या आणि गुणवत्ता यांचा संबंध जोडू नये. समूह शाळांची अंमलबजावणी योग्य रीतीने होणार नाही. यामुळे याला विरोध करावा असेआवाहन केले.

वाबळेवाडी, जालिंदर नगर या पुणे जिल्ह्यातील शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांनी यशस्वितेची गृहीतके धरून काम करू नये, तर कोणत्याही कामाचा समग्र विचार करावा. मुलांना कोणत्या शाळेत घालायचे याची स्वायत्तता पालकांना द्यावी, असे नमूद केले. शाळेचा पट वाढवण्यासाठी पालक शिक्षक संवाद महत्त्वाचा आहे, यास अनुसरून शिक्षकांनी काम करावे असे मत जरेवाडी, जि.बीड येथील शाळेचे मुख्याध्यापक संदीप पवार यांनी मांडले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे शिक्षण विस्तार अधिकारी आणि अभ्यासक रमेश ठाकूर यांनी गुणवत्ता नाही म्हणून शाळेचा पट कमी होतो. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शिक्षण अभ्यासक किशोर दरक यांनी शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळेला पायाभूत सुविधा देण्यास शासन का कमी पडते..? असा सवाल उपस्थित करून आपल्या जबाबदारीपासून सरकार पळ काढते आहे. शिक्षणाचे केंद्रीकरण करून संविधानाचा भंग केला जातो आहे. समूह शाळा योजनेतील सामाजिकीकरण आणि गुणवत्ता या बाबी फसव्या आहेत. याला विरोध झाला पाहिजे अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

मुख्याध्यापक संघाचे राज्य प्रवक्ते महेंद्र गणपुले यांनी विद्यार्थी वाहतूक व्यवस्था यावर प्रश्न उपस्थित करून सुरुवातीला अंमलबजावणीचे चांगले चित्र तयार करून नंतर 'ये रे माझ्या मागल्या' अशी याची अवस्था होईल म्हणून याला आमचा विरोध आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. मराठी अभ्यास केंद्राचे सुशील शेजुळे यांनी केंद्र यावर काय काम करीत आहे याची माहिती दिली. शिक्षक भारतीचे राज्य प्रवक्ते आणि शिक्षक जालिंदर सरोदे यांनी या शाळांतून समाजापासून दूर असलेल्या वंचित मुलांचे शिक्षण होते, म्हणून या शाळा सुरू राहिल्या पाहिजेत मत व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दत्ता बाळसराफ यांनी शिक्षण विकास मंचच्या माध्यमातून कमी पटाच्या शाळा दत्तक घेऊन त्याचे सक्षमीकरण कसे केले, याचे दाखले देऊन. समूह शाळा योजना राबवण्याऐवजी लहान शाळाचे सक्षमीकरण करावे. एखाधा अधिकाऱ्याच्या मनात आले, सरकारच्या मनात आले म्हणून कोणतेही प्रयोग आपण करू नयेत. याचे मोठे नुकसान समाजाला भोगावे लागते. कल्पनेने आदेश काढण्याऐवजी विद्यार्थी हिताचे आदेश काढावेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार बसंती रॉय यांनी कमी पट म्हणून गुणवत्ता कमी किंवा विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत नाही अशी कारणे देऊन समूह शाळांचा निर्णय शासनाने अमलात आणू नये. भविष्यात याचे विपरीत परिणाम होतील, असे विचार समारोपीय मनोगतांतून व्यक्त केले. उपस्थितांचे आभार डा. माधव सूर्यवंशी यांनी मानले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात रमेश ठाकूर म्हणाले की, जगातील कोणत्याही समस्येचे मूळ हे शालेय शिक्षणात सापडते. भारतीय संविधान हे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी संविधानातील बाबींचा संबंध हा दैनंदिन जीवनाशी जोडला जावा. नागरिकशास्त्र हा विषय फक्त परीक्षेतील गुणाभोवती केंद्रित न करता विद्यार्थ्यांच्या छोट्या छोट्या कृतीतून दिसायला हवा तर भारतीय संविधानाचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनात दीर्घ काळ टिकून राहतील.

डॉ. रूपेश मोरे यांनी या कट्ट्याचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले तर वैशाली बावस्कर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक वसंत काळपांडे, जिल्हा केंद्राचे सचिव नीलेश राऊत यांचे मार्गदर्शन लाभले

यावेळी राजेंद्र वाळके,डॉ प्रकाश खेत्री, नारायण लवांडे, बद्रीनाथ थोरात, सुरेश परदेशी, रोहिणी माळी,गोविंद गायकवाड, भारत चव्हाण, अरुण ठाकरे, विष्णू देवरे, दिलीप वाढे,अरुण माने, ढवळू बहिरम, किशोर नरवडे आदींसह मुख्याध्यापक, शिक्षक यांची उपस्थिती होती. ऑनलाईन झूमच्या माध्यमातून राज्यभरातून अभ्यासक, शिक्षक या शिक्षण कट्टा कार्यक्रमात सहभागी झाले होते.

- **शिक्षण कट्टा**

**कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) आणि शालेय शिक्षण**

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंचच्या वतीने शनिवार, दि. २७ जानेवारी, २०२४ रोजी 'कृत्रिम द्धिमत्ता (AI) आणि शालेय शिक्षण' या विषयावर पवार पब्लिक स्कूल भांडुप, मुंबई येथे शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत र्चासत्र ठेवण्यात आले होते. या चर्चासत्राच्या सुरुवातीला पवार पब्लिक स्कूलच्या प्राचार्य मा. सुमा दास यांनी उपस्थितांचे स्वागत केले यानंतर शिक्षण विकास मंचाचे डॉ. माधव सूर्यवंशी यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शालेय शिक्षण' या विषयावर चर्चा ठेवण्यामागचा हेतू स्पष्ट केला येत्या वर्षभरामध्ये राज्यात विभागावर या चर्चा ठेवणार सल्याचे सांगीतले व शिक्षण कट्टयाला उपस्थित सणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी या शिक्षणकट्ट्याचे प्रास्ताविक केले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात होणारा प्रसार ाकडे लक्ष वेधून, शिक्षणकट्टा पहिल्यांदाच आपण यशवंतराव चव्हाण सेंटरच्या बाहेर घेत आहोत हे सांगितले. सकारात्मक रीतीने चर्चा घडवून आणावी याबद्दल त्यांनी शूभेच्छा दिल्या. शिक्षण विभाग यशवंतराव चव्हाण सेंटरचे मुख योगेश कुदळे यांनी मान्यवर पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि त्यांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत केले.

तज्ज्ञ मार्गदर्शक आयआयटी मुंबईचे अभिषेक माळीनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास, त्याची वाटचाल, त्याचा विकास आदीबाबतची माहिती संबंधितांना करून दिली यानंतर दुसरे तज्ज्ञ वक्ते डॉ. अमर पांचाळ यांनी प्रत्यक्ष रोजच्या जीवनात याचा कशा रतीने उपयोग होतो आहे हे प्रात्यक्षिकासह सर्वांना दाखवून दिले. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यकाळामध्ये रोजगाराच्या संधी कमी होतील का.. ? यावर त्यांनी चर्चा केली. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रगतीच्या गमतीजमती संबंधितांना सांगितल्या. नेमकेपणाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा आपण जर उपयोग केला तर शिक्षणात तो फायदेशीर होईल. अन्यथा यामुळे धोका होण्याचा संभव अधिक आहे. विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी जो नेमलेला अभ्यासक्रम आहे तो पूर्ण करावा, त्याच्याकडे अधिक लक्ष द्यावे नंतर या तंत्रज्ञानाकडे वळावे असा सल्ला त्यांनी दिला.

चव्हाण सेंटरचे मानद कार्यक्रम प्रमुख दत्ता बाळसराफ यांनी कोणतीही व्यवस्था ही मानवी जीवन सुखी करण्यासाठी असते. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाने तयार केलेली आहे. पायाभूत शिक्षण हे महत्त्वाचे आहे आणि शिक्षणातून माणूसपण जपावे, असा सल्ला त्यांनी दिला. शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार बसंती रॉय यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेला आणि तंत्रज्ञानाला काही पाश्चिमात्य देशाने शिक्षणापासून दूर ठेवले आहे. याचा परिणाम नैसर्गिक शिक्षणावर होतो, याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता सोबतच पायाभूत अभ्यासाकड ही विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शिक्षणात उपयोग होत असला तरी शिक्षकाची तो जागा घेऊ शकणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे शेवटी मच्छिंद्र बोराडे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे निवेदन तुषार म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षण विकास मंच कोअर टीमचे अजित तिजोरे, जयवंत कुलकर्णी, अनुल अत्तर, शिक्षक भारतीचे जालिंदर सरोदे, मुख्याध्यापक गंगाधरे सर, वीणा डोणगावकर. भांडुप, मुलुंड, विक्रोळी, घाटकोपर परिसरातील अनेक शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **शिक्षण कट्टा**

**कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) आणि शालेय शिक्षण**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि शिक्षण विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शालेय शिक्षण' या विषयावर पुण्यातील निसर्ग कार्यालय, गुलटेकडी येथे शिक्षण कट्ट्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी केले. यशवंतराव चव्हाण सेंटरचे शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी शिक्षण कट्ट्याचे वक्ते यांचा परिचय करून दिला व त्यांना ग्रंथभेट दिली.

कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या विषयावर नामवंत तज्ज्ञ, लेखक, व्याख्याते डॉ. दीपक शिकारपूर यांचे पहिले व्याख्यान झाले त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे दैनंदिन जीवनातील उपयोग त्याची काळजी आणि त्याचा शालेय स्तरावरील उपयोग याबद्दल उदाहरणांसह माहिती दिली गुगल वरून मिळणाऱ्या माहितीपेक्षा सुद्धा अनुभवातील शिक्षण हे जास्त महत्त्वाचे आहे. शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी असलेला संवाद; पालकांचा- मुलांचा असलेला संवाद याचे महत्त्व त्यांनी सांगितले. त्याचबरोबर प्रश्नपत्रिका काढत असताना स्मरणावर आधारित प्रश्न विचारण्याचे प्रमाण कमी करणे, गुगल वरू शोधून माहितीवर आधारित उपक्रम देऊ नयेत; प्रत्यक्ष कृती करण्याचे दैनंदिन जीवनातील उपयुक्त असे उपक्रम देणे आवश्यक आहे असे सांगितले. प्रश्नोत्तराच्या वेळी उपस्थितांनी अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न विचारले. त्यापैकी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिक्षकांचे काम कसे सोपे होईल त्या संदर्भात बोलत असताना bard software द्वारे शिक्षकांनी लेसन प्लॅन, मेथोडोलॉजी, प्रश्नपत्रिका, वर्कशीट, एखाद्या विषयावर निबंध इत्यादी बाबी किती सहजपणे कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शक्य होता आहेत, त्याचा वापर वेळ वाचवण्यासाठी साहाय्यभूत होणार आहे. अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होऊ लागला तर मानवी मेंदूचा स्मरणशक्तीसाठी होणारा वापर कमी होईल का ? त्याचे काय परिणाम होतील असा प्रश्न या वेळी उपस्थित करण्यात आला.

दुसरे तज्ज्ञ व्याख्याते आयआयटी पवई येथील पीएच. डी. अभ्यासक अभिषेक माळी यांनी अतिशय बारकाईने तपशीलवार कृत्रिम बुद्धिमत्तेच्या इतिहासापासून त्याचे उपयोग, आणि त्याचे परिणाम तसेच शिक्षकांनी विविध ॲप्सविषयी माहिती विचारल्यावर विविध ॲप्स जे दैनंदिन जीवनामध्ये आणि शिक्षकांसाठी उपयुक्त

आहेत उदाहरणार्थ, co pilot, Humatai ai, in video, opus cilip, compose AI त्यांची नावे व माहिती यांचे सादरीकरण केले.

शिक्षण कट्ट्यावरील चर्चेची समारोपीय मांडणी डॉ. वसंत काळपांडे यांनी केली. मांडणी करताना त्यांनी, कृत्रिम बुद्धिमत्ता या संदर्भात आपण कुठे आहोत ? कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराची काय आवश्यकता आहे ? त्याचे पुढील काळात काय परिणाम होतील ?

त्याबाबतीत कोणती दक्षता घ्यायला हवी. याचे विश्लेषण केले. शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरचे या विषयासंदर्भातील पुढील धोरण कसे असेल. हे सांगून नोव्हेंबर महिन्यात याच विषयावर शिक्षण परिषद होणार असल्याचे नमूद केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरचे मानद कार्यक्रमप्रमुख दत्ता बाळसराफ यांनी त्यांच्या दृष्टिकोनातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संदर्भातील लेखाजोखा मांडला व आगामी काळात याच विषयावरील शिक्षणकट्टे औरंगाबाद, शेगाव व राज्याच्या विविध भागात येथे होणार असल्याचे सांगितले. उपस्थितांचे आभार पुणे जिल्हा समन्वयक सौ. हर्षा पिसाळ यांनी मानले.

- **'नवोपक्रमांची नवलनगरी ' पुस्तक प्रकाशन सोहळा**

'यशवंतराव चव्हाण सेंटर' निर्मित आणि 'डिजिटिकल वर्क्स' प्रकाशित 'नवोपक्रमांची नवलनगरी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आज उत्साहात पार पडला.

राज्याचे माजी शिक्षण संचालक व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे हे या पुस्तकाचे मुख्य मार्गदर्शक आहेत. शिक्षण विकास मंचच्या कोअर कमिटीचे सदस्य तथा राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे प्रवक्ता आणि उपाध्यक्ष महेंद्र गणपुले आणि मेंदू व शिक्षण अभ्यासक डॉ. श्रुती पानसे यांच्या अनुभवी संकलनातून हे पुस्तक साकारले आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत सुनीलकुमार लवटे हे यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला.

शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशनसाठी निवडल्या गेलेल्या पहिल्या बॅचच्या शिक्षकांनी अतिशय कल्पकतेने नवोप्रक्रम राबवलेले सर्वच उपक्रम नवीन राष्ट्रीय धोरण २०२० मधील तरतुदींशी सुसंगत आहेत. हे उपक्रम घेण्यामागची प्रेरणा समजावी आणि इतर शिक्षक आणि शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांना अशाच प्रकारचे काम करण्याची प्रेरणा मिळावी ही या पुस्तकाची निर्मिती करण्यामागची संकल्पना आहे.

## ४.२ शरद पवार इन्स्पायर फेलोशिप

शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन अंतर्गत साल २०२३-२४ साठी खालील शिक्षकांची निवड करण्यात आली प्राथमिक व माध्यमिक या फेलोशिपच्या सल्लागार समिती मधे डॉ. रुपेश मोरे, जगदीश कुडे,जयवंत कुलकर्णी काकासाहेब वाळूंजकर, भाऊसाहेब उमाटे किशोर भागवत, महेंद्र गणपुले, राजकिरण चव्हाण मच्छिंद्र बोऱ्हाडे, संदीप पवार, तुषार म्हात्रे, उमेश खोसे, वर्षा कुलकर्णी, अरविंद शिंगाडे, नदीम खान, श्रीनिवास, सोमनाथ वाळके, सुवर्णा देशपांडे, विवेक खैरनार डॉ. नंदा भोर यांच्या निवड समितीने काम पहिले.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशनची कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे देण्यात येणाऱ्या शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशनची कार्यशाळा दिनांक १७,१८ व १९ नोव्हेंबर २४ रोजी बारामती येथे संपन्न झाली. मा. विवेक सावंत यांनी आज या कार्यशाळेला भेट देऊन फेलोंशी संवाद साधत मार्गदर्शन केले. प्राथमिक १९ व माध्यमिक २० शिक्षक फेलोज यांची उपस्थिती होती

याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. वसंत काळपांडे, कार्यशाळेचे मार्गदर्शक डॉ. ह. जगताप, चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, आदी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या शिक्षकांना यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने व एम के सी एल च्या सहकार्याने 'शरद पवार इनस्पायर फेलोशीप इन एज्युकेशन' देण्यात येते.

- **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन प्रकल्पांना भेटी**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन अंतर्गत राबवण्यात आलेल्या प्रकल्पांना चव्हाण सेंटरच्या पदाधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, विजय कान्हेकर, योगेश कुदळे, दीपिका शेरखाने, संतोष मेकाले, रंजीत बायस यांनी जालना येथील जिल्हा प्राथमिक शाळा श्रीरामतांडा येथे भेट दिली. या सर्वांचे स्वागत बंजारा गीते गाऊन आणि पारंपरिक नृत्ये सादर करून करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक व शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्राप्त शिक्षक जगदिश कुडे यांनी विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी चालू असलेल्या नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमाबद्दल माहिती दिली. या माध्यमातून सहा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारलेल्या विद्यार्थी व पालकांसोबत सर्व पदाधिकाऱ्यांनी संवाद साधले.

शिक्षण विभाग प्रमुख योगेश कुदळे यांनी जि. प. प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी तसेच द्विशिक्षकी शाळा, टेमगिरवाडी आणि जामखेड, बारामती, चाकण, पुणे, आष्टी, बीड येथील शालेय प्रकल्पांना भेटी दिल्या तसेच त्या त्या ठिकाणी फेलोशिप अंतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला.

शरद पवार इन्सपायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२३-२४ प्राप्त नामदेव वाजे यांच्या Learning Beyond शाळा पुस्तकापलीकडील जीवन शिक्षण या प्रकल्पाला यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पदाधिकारी मंडळाने भेट दिली. आश्रमशाळा मोहपाडा येथे नामदेव वाजे कार्यरत आहेत. या प्रसंगी चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ, योगेश कुदळे आणि भूषण काळे उपस्थित होते

यशवंतराव चव्हाण सेंटरची शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन अंतर्गत सोलापूर येथील आयकॉनिक क्लबला चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ आणि आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभागाचे मुख्य संयोजक विजय कान्हेकर यांनी भेट देऊन फेलोशिपचा आढावा घेतला. त्याचबरोबर उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी फेलो राजकिरण चव्हाण, फेलो पूनम पाटील तसेच अश्विनी मोरे यांनी त्यांच्या प्रकल्पाबद्दल माहिती दिली. भविष्यात विविध क्षेत्रातील चांगले नेतृत्व शालेयस्तरावर तयार करणे व त्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे या उद्देशाने 'आयकॉनिक क्लब' हा उपक्रम राबवला जातो.

तसेच सेवासदन शाळेतील 'सुंदर सेवासदन आमुचे' या प्रकल्पाची सविस्तर माहिती चव्हाण सेंटरच्या मान्यवरांनी घेतली.

खोमारपाडा हे १००० ते १२०० लोकवस्ती असलेले, आदिवासी वारली समाज १०० टक्के असलेले गाव. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती. त्यातल्या त्यात भात पीक हे एकच पीक घेऊन साधारण डिसेंबर ते मे असे सहा महिने कामाच्या शोधात स्थलांतर होणारे गाव ! येथील पालकांचे स्थलांतर प्रमाण हे ९५ टक्के तर शाळेत शिकणाऱ्या मुलांचे स्थलांतर प्रमाण हे १५ ते २० टक्के असे होते. जि.प.शाळा, खोमारपाडा येथे डिसेंबर २०१३ साली शिक्षक बाबु मोरे हे बदली होऊन हजर झाले. त्यांनी मुलांचे आणि पालकांचे होणारे स्थलांतर पाहिले. मुलांचे स्थलांतर थांबले पाहिजे, यासाठी विविध उपाययोजना करून देखील शंभर टक्के यश मोरे यांना मिळत नव्हते. तत्कालीन शिक्षण सचिव श्री. नंदकुमार हे होते. त्यांचा आग्रह होता की १०० टक्के मुलांचे स्थलांतर थांबले पाहिजे आणि १०० टक्के मुले शिकली पाहिजेत. यावर विचार करताना शिक्षक मोरे यांनी परसबागेच्या माध्यमातून पालकांना शेतीमध्ये भातशेतीनंतर विविध पिके घेण्यासाठी प्रेरित करण्यासाठी प्रयत्न केले आणि त्याला यशही आले. सुरुवातीला ३० शेतकऱ्यांची शाळेत बैठक घेतली. त्यातून गट आणि वैयक्तिक शेतीची सुरुवात खोमारपाडा येथे झाली. त्यातून ज्या पालकांना घर सोडून सहा महिन्यात निव्वळ ३० ते ४० हजार प्रतिकुटुंब मिळायचे. त्यांना विविध पिकांच्या माध्यमातून पन्नास हजार ते लाखभर रु. नफा मिळाला. त्यातून शेतीबाबत नवी उमेद निर्माण झाली. शेतकऱ्यांची संख्या वाढायला लागली. पुढे कोरोना काळात अक्षरधारा फौंडेशनची मदत आणि मार्गदर्शक मोरे यांच्या प्रयत्नांना मिळाले. श्री. मोरे यांचे हे काम मनरेगाचे तत्कालीन अप्पर मुख्य सचिव श्री. नंदकुमार यांना माहीत झाले आणि ११ मार्च २०२१ रोजी खोमारपाडा येथे लखपती शेतकरी कार्यशाळा घेतली.

शिक्षक बाबु मोरे यांच्या स्थलांतर थांबविण्याचा प्रयत्नांना आता सामाजिक संस्था यांच्या सोबतच रोजगार हमी योजना आणि इतर विभागही सोबत आले होते. त्यातून पुढे शरद पवार ग्राम समृद्धी शासन निर्णय आल्याने खोमारपाडा आणि बाजूच्या पाड्यात गायगोठे, कुक्कुटपालन शेड, बकरी शेड, मोगरा लागवड, काजू लागवड, आंबा लागवड, व्हर्मी कंपोस्ट, नाडेप कंपोस्ट, अस्तरीकरण शेततळे, नाला खोलीकरण, सिंचन विहीर इ. मालमत्ता निर्मिती होणारी कामे मोठ्या प्रमाणात केली गेली. त्यामुळे पालक विविध व्यवसाय आणि पिके याच्या माध्यमातून लाखो रुपये कमवू लागली आहेत. सुहृद फौंडेशन आणि अक्षरधारा फौंडेशन यांनी पूरक आहार, भाजी, शाळेच्या भौतिक सुविधा यासाठी मोठी मदत केली आहे. शेतकऱ्यांना स्वत: चा शेतमाल स्वत: विकता यावा यासाठी सुहृद फौंडेशन कडून शेतमाल वाहतूक गाडीही मिळविण्यात मोरे यांना यश आले आहे.

इस्कॉन च्या माध्यमातून वाडी प्रकल्प, शेतीसाठी कुंपण, मोकाट गुरांसाठी चारा छावणी इत्यादी मदत झाली आहे. IASOWA च्या माध्यमातून शाळा नूतनीकरण, शाळेसाठी सौरऊर्जा, अंगणवाडी नूतनीकरण, पाड्यासाठी व्यायामशाळा आणि वाचनालय इत्यादी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. समस्त महाजन आणि माय ग्रीन सोसायटी यांच्या माध्यमातून मागील वर्षी २५ शेततळे, विहीर गाळ काढणे, उतार जागेवर CCT करणे, २.५ किमी नाला खोलीकरण इत्यादी कामे केली आहेत. अक्षरधारा फौंडेशन च्या माध्यमातून १०० टक्के अंध असलेल्या बारकी मलावकर या अंध ताईला किराणा दुकान उपलब्ध करून देण्यात शिक्षक मोरे यांना यश आले आहे. पूर्वी

अगदी हलाखीचे जीवन जगणाऱ्या बारकी ताई आज रोज २०० ते ३००० रु. कमाई करून आत्मनिर्भर झाल्या आहेत. मागील वर्षी शिक्षक बाबु मोरे यांच्या 'विद्यार्थी ज्ञानपती पालक लखपती' या उपक्रमाला शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन ही मिळाली आहे. त्या माध्यमातून शाळेतील मुलांसाठी जॉली फोनिक्स, हस्ताक्षर, गोष्ट सांगणे, सामन्य ज्ञान, अवांतर वाचन इ. उपक्रम घेत आहेत. ज्यातून शाळेतील मुलांना मोठा फायदा होत आहे.

शिक्षक मोरे यांच्या या कामाची दखल घेत महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल मा. श्री. रमेश बैस यांनी यांनी घेतली. दि- ०७ मार्च २०२४ रोजी खोमार पाडा गावाला त्यांनी भेट दिली. शिक्षक म्हणून केलेले मोरे याचे हे काम प्रचंड मोठे आहे, असे मा. राज्यपाल महोदय या प्रसंगी म्हणाले. आज खोमारपाडा पॅटर्न महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाला आहे.

- **'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप' समिती आढावा बैठक संपन्न**

शरद पवार इन्स्पायर फेलोशिपच्या सल्लागार आणि निवड समितीची बैठक आदरणीय पवार साहेब आणि सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या.. प्रमुख उपस्थितीत काल पार पडली. बैठकीमध्ये मागील २ वर्षांमध्ये दिल्या गेलेल्या फेलोशिपचा आढावा घेण्यात आला तसेच पुढील दिशा ठरविण्यात आली.

या प्रसंगी ऑक्सफर्ड विद्यापीठातील आर्टिफिशिअल इंटेलिजन्स विभागाचे संचालक डॉ. अजित जावकर, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत पाटील, माजी कुलगुरू एस. एन पुरी, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, एमकेसीएल चे चीफ मेंटॉर विवेक सावंत, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे सीईओ निलेश नलावडे, सह्याद्री ॲग्रोचे विलास शिंदे, प्रा. डॉ. नीतीन रिंढे, चव्हाण सेंटरचे सरचिटणीस हेमंत टकले, सल्लागार समितीचे सदस्य नरेंद्र मुरकुंभी, आभा लांबा, फेलोशिपच्या सल्लागार समिती व निवड समितीचे सदस्य उपस्थित होते.

## ४.३ शिक्षक लेखन कार्यशाळेचे आयोजन

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने शिक्षक लेखन कार्यशाळेचे दि. १२ मे २०२३ रोजी पुणे येथे आयोजन करण्यात आले. या एकदिवसीय कार्यशाळेला राज्यभरातून निवडक अशा लिहित्या शिक्षकांची निवड करण्यात आली. शैक्षणिक विषयावरचे लेखन, शालेय शिक्षण घेणाऱ्या लहान मुलांसाठीचे लेखन करीत असताना कशा स्वरूपाची काळजी घ्यावी ? याचे मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात आले.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले. लेखनात सहजता, सोपेपणा, नेमकेपणा, अचूकता असावी. लेखन पाल्हाळिक न करता शब्दमर्यादा आखून करावे. बालभारतीच्या माजी विदद्यासचिव, लेखिका धनवंती हर्डीकर यांनी बालभारतीत काम करीत असताना लेखनासंबंधी काय अनुभव आले ? याच्या आठवणी सांगितल्या. तसेच लेखक हा त्या-त्या ठिकाणच्या परिसंस्थेचे अपत्य असते. यामुळेच पर्यावरणीय वातावरणाचे परिणाम त्याच्या लेखनावर होत असतो. असे निरीक्षण धनवती हर्डीकर यांनी नोंदवले.

या कार्यशाळेच्या निमित्ताने लिहित्या शिक्षकांचे लेखन प्रकाशित करण्यासाठी ब्लॉग निर्मितीची घोषणा या वेळेस करण्यात आली. अशाच प्रकारच्या कार्यशाळा जिल्हास्तरावर घेण्याचा मानस चव्हाण सेंटरचा आहे. कार्यशाळेस उपस्थित असणाऱ्या शिक्षकांचे स्वागत योगेश कुदळे यांनी केले तर शिक्षण विकास मंच,

यशवंतराव चव्हाण सेंटर शैक्षणिक विषयावर जे काम करीत आहे याची मांडणी समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी केली आणि उपस्थितांचे आभार अजित तिजोरे यांनी मानले.

- **विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप**

विमुक्त भटक्या स्थलांतरित कुटुंबातील शिक्षणापासून वंचित शाळाबाह्य मुलांसाठी पालावरची शाळा शांतीनगर, आसेगाव कॉर्नर वसमत या सामाजिक उपक्रमासाठी बालरक्षक- शिक्षक शामराव रावले यांची यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई व शरदचंद्र पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२३-२४ साठी निवड झाली. याच फेलोशिप अंतर्गत मिळालेल्या निधीतून ६० विद्यार्थ्यांना २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त विमुक्त भटक्या स्थलांतरित कुटुंबातील शिक्षणापासून वंचित मुलांसाठी शालेय साहित्य त्यामध्ये स्कूल बॅग, दोन वह्या, पेन, डब्बा व पाणी बॉटल व खाऊचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्र लाईव्ह न्यूजचे संपादक नागराज एंगडे, ए.टी. व्ही न्यूजच्या तालुका प्रतिनिधी श्रीमती अनिता चव्हाण, नगर पालिका कार्यालय, मनमाड चे कार्यालय अधीक्षक श्री मयूर महाजन साहेब, सामाजिक कार्यकर्ते सुरेश मस्के व साहित्यिक तथा संवाद ग्रुपच्या संगीता देशमुख, अपर्णा तनपुरे यांच्यासह पालावरचे सर्व विद्यार्थी, पालक व माता भगिनी उपस्थित होत्या.

## ४.४ चौदावी राज्यस्तरीय शिक्षण परिषद - २०२३

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या, शिक्षण विकास मंच आयोजित चौदावी राज्यस्तरीय शिक्षण परिषद पार पडली. 'नवीन शैक्षणिक धोरण, भारतीय संविधान आणि शालेय शिक्षण' या विषयावरील आयोजित शिक्षण परिषदेत उपस्थित राहून शिक्षकांशी संवाद साधला.

या परिषदेत ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत सुनीलकुमार लवटे यांनी आवर्जून उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. या एकदिवसीय परिषदेमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी आपले संविधान या विषयावरील 'टॉक शो'चे उत्तम सादरीकरण केले. तसेच 'नवीन शैक्षणिक धोरण, भारतीय संविधान. आणि शालेय शिक्षण' या विषयावर डॉ. कमलादेवी आवटे यांनी विचार व्यक्त केले. 'संविधानातील मूल्यविचार व शालेय शिक्षण' या विषयावरील चर्चेत राही श्रुती गणेश, ऐनुल अत्तार, बसंती रॉय यांनी सहभाग घेत मार्गदर्शन केले.

'आपले आयकार्ड' या विषयाच्या अनुषंगाने श्रीरंजन आवटे यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी प्रथम संस्थेच्या फरीदा लांबे, दत्ता बाळसराफ, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सीईओ दीप्ती नाखले, शिक्षण विभागाचे प्रमुख योगेश कुदळे, साहाय्यक संजना पवार, शिक्षण विकास मंचची टीम, राज्यभरातील शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

- **डॉ. कुमुद बंसल उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरचा २०२३ या वर्षीचा डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ठ शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार नीलेश निमकर लिखित 'शिकता शिकविता' या पुस्तकाला जाहीर करण्यात आला आहे. राज्यभरातून आलेल्या शैक्षणिक विषयावरील पुस्तकांचा अभ्यास करून निवड समितीने एकमताने या

पुस्तकाची निवड केली. येत्या २६ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत मान्यवरांच्या उपस्थिती हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

'शिकता शिकविता' या पुस्तकात शिकण्याच्या प्रक्रियेची गोष्ट सांगितली आहे. एक तरुण, आदिवासी भागात शिक्षक म्हणून रुजू होतो, तेथे रमतो, आदिवासी मुलांपर्यन्त गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचले पाहिजे यासाठी धडपडतो त्याची गोष्ट म्हणजे हे पुस्तक आहे.

लेखक नीलेश निमकर हे स्वत: एका आदिवासी शाळेत शिक्षक होते. शाळेत अध्यापन करत असताना त्यांना जे अनुभव आले त्याची मांडणी या पुस्तकात त्यांनी केली आहे. ग्रामीण, आदिवासी मुलांना शिकविताना लेखक स्वत: काय आणि कसे शिकत गेले..? याचे मनोज्ञ वर्णन या पुस्तकात आले आहे. पाठ्यक्रमातून मूल्यशिक्षण शिकविताना आणि त्याची रुजवणूक करताना मुलांशी झालेला संवाद या पुस्तकात आलेला आहे तो अत्यंत वाचनीय आहे. मूल्यमापन कसे करावे..? ज्ञान रचनावाद कसा राबवावा..? शिक्षकांनी स्वत:ची गुणवत्ता वाढवण्यासाठी काय करावे..? या संदर्भातील माहिती या पुस्तकात आली आहे. सखोल चिंतन, रोचक व रंजक लेखन आणि प्रांजळ अनुभव कथन हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

नीलेश निमकर गेली २५ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. बाल शिक्षण, प्राथमिक शिक्षण, शिक्षकांचा व्यावसायिक विकास आदी विषयावर त्यांनी काम केले आहे. आदिवासी मुलांचे शिक्षण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. समाज माध्यमातून नियमित शिक्षण विषयक लेखन ते करत असतात. नीलेश निमकर आणि त्यांचे सहकारी 'क्वेस्ट' या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून अडीच लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोचले आहेत, यावरून त्यांच्या कामाचा आवाका आपल्या लक्षात येतो.

- **बाळासाहेब घोडे, दीपाली सावंत यांना पहिला डॉ. कुमुद बन्सल गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर**

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंचच्या वतीने या वर्षांपासून एक पुरूष आणि एक महिला शिक्षक यांना राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे.

पहिला राज्यस्तरीय डॉ. कुमुद बन्सल गुणवंत शिक्षक पुरस्कार दुर्गम भागात अतिशय व्रतस्थपणे काम करणारे बाळासाहेब घोडे, दीपाली सावंत यांना जाहीर करण्यात आला.बाळासाहेब घोडे जि.प. प्राथमिक शाळा शिवनगर (डोंगरगण), ता. शिरूर, जि. पुणे येथे तर दीपाली सावंत या जि.प.प्राथमिक शाळा शेकापूर (बाई), ता. हिंगणघाट जि.वर्धा येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

बाळासाहेब घोडे यांनी शिवनगर सारख्या छोट्याश्या वस्तीवरील शाळेला सृजनशील प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावली. आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्वातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला आहे. जी मुले शाळेत येत नव्हती, पालकही यासाठी आग्रही नव्हते. यासाठी त्यांनी पालकांना शाळेचे महत्त्व पटवून दिले. अतिशय कमी पट असणाऱ्या शाळेचा पट आता दोन अंकी झाला आहे. शाळेची इमारत लोकवर्गणीतून उभी करून भवताल पर्यावरणस्नेही केल्याने शाळेतील वातावरण आनंददायी झाले आहे. मुले ही शाळेत बसली नसून बागेत बसली आहे असा अनुभव शाळेला भेट दिल्यानंतर येतो. गुणवत्तेच्या दृष्टिनेही ही शाळा जिल्ह्यात अव्वल स्थानावर आहे. ही शाळा सहजशिक्षणाचे एक केंद्र तयार झाले आहे. या शाळेला भारत सरकारचा राष्ट्रीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार देखील मिळाला आहे ही बाब उल्लेखनीय वाटते.

दीपाली सावंत या वर्धा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील उपक्रमशील शिक्षिका म्हणून शिक्षणक्षेत्रात परिचित आहेत. त्यांनी दुर्गम अशा पारधी पाड्यातील मुलांना नियमित शाळेत आणण्यासाठी केलेले कार्य अद्वितीय आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बालरक्षक चळवळीच्या माध्यमातून सातत्यपूर्ण प्रयत्न करून सोबतच शाळेमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून मुलांच्या शिकण्यासाठी आपली धडपड केल्याने ही मुले शाळेत आली, टिकली आणि शिकत आहेत. याचा अनुभव त्यांच्या शाळेला भेट दिल्यावर येतो. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरु असतात.कोविडकाळात मुलांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य आणि राज्यस्तरावर त्यांच्या नवोपक्रमांची नोंद ह्या बाबीही सर्वांना प्रेरणादायी आहेत. वर्धा जिल्हा हा राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.मूलोद्योगी शिक्षणाची संकल्पना वर्धा जिल्ह्यातून शिक्षणक्षेत्राला मिळालेली आहे. त्याचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांना 'शिक्षणातून स्वावलंबी' बनविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमधून दिसून येतात.

राज्यभरातून नामांकन झालेल्या प्रक्रियेतून निवडक शिक्षकांच्या मुलाखती, प्रत्यक्ष शाळा भेटी यातून या दोन शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड समितीने एकमताने शिफारस केली होती.

## ४.५ कुमुद बन्सल स्मृती व्याख्यान

'नवीन शैक्षणिक धोरण-२०२० आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर मा. विकास गरड यांनी मांडणी केली. नवीन शैक्षणिक धोरणाचा अभ्यास आणि त्याची राज्यातील अंमलबजावणीत या संदर्भात त्यांचा प्रत्यक्ष अनुभव महत्त्वाचा आहे. मा. गरड सरांनी कागदावर असलेले धोरण, त्याच्या अंमलबजावणीत शिक्षकांचा सहभाग आणि शिक्षकांच्या मनात याबाबत असलेले प्रश्न अशा तीन पातळीवर मांडणी केली. प्रत्यक्ष व्याख्यान सुरू असताना धोरणाबाबत विशेषत: अभ्यासक्रम, पुस्तके, विद्यार्थ्यांचा वयोगट, वर्ग नियोजन, आकृतिबंध, मूल्यमापन, परीक्षा, बोर्ड, शिक्षक प्रशिक्षण, भाषा धोरण अशा विविध विषयांवर संवादरूपाने मांडणी केली.

समारोपाच्या भागात ऑनलाइन स्वरूपात आलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. यात शिक्षकांसोबत नवीन शैक्षणिक धोरणाची महत्त्वाची वैशिष्ट्ये, त्या अनुषंगाने शिक्षकांनी अध्यापनात करायचे बदल, मूल्यमापनाची तंत्रे, शिक्षकांची भूमिका या मुद्द्यांवर चर्चा करीत असताना नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भाने शिक्षकांनी अधिक चौकस असले पाहिजे आणि स्वत:ला अपटेड ठेवताना समृद्ध होत गेले पाहिजे असे सांगितले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी काय केलं जाईल याबाबतही चर्चा करून फेसबुक, झुम मीटिंगच्या माध्यमातून विचारलेल्या शंकांचे निरसन डॉ. विकास गरड यांनी केले. आभारप्रदर्शन व निवेदन डॉ. माधव सूर्यवंशी यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे सर यांनी मार्गदर्शन केले. कोअर कमिटी सदस्य महेंद्र गणपुले सर, अजित तिजोरे, मच्छिंद्र बोऱ्हाडे, तुषार म्हात्रे शिवाय सर्व जिल्हा शिक्षणकट्टा समन्वयक यांची मदत झाली

- **शिक्षकांनी अधिक समृद्ध व्हावे - विकास गरड**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने शिक्षक दिन डॉ. कुमुद बन्सल स्मृतिदिनाचे औचित्य साधून मंगळवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे

प्रास्ताविक करताना योगेश कुदळे यांनी शिक्षण क्षेत्रात शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर कोणते काम करीत आहे, याचा आढावा घेतला.

शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार आणि शिक्षण अभ्यासक बसंती रॉय यांनी डॉ. कुमुद बन्सल यांच्यासोबत काम करतानाच्या आठवणी सांगून, त्यांच्या काळ हा शिक्षण क्षेत्राचा सुवर्णकाळ होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे प्रेरणादायी होते. त्यांना गुणांची पारख होती, यामुळे त्यांची निवड ही अचूक असायची. त्या संवेदनशील होत्या, हे सांगताना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील काही आठवणी रॉय मॅडम यांनी सांगीतल्या.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष आणि शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा. सुप्रियाताई सुळे यांनी शिक्षक दिनानिमित्त राज्यातील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. कुमुद बन्सल यांच्या स्मृतीला अभिवादन करून त्यांच्या कार्याची देशपातळीवर कशारीतीने नोंद घेतली गेली, याचे विवेचन केले. डॉ. कुमुद बन्सल यांच्या नावाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक, शिक्षिका पुरस्कार देण्याची घोषणा त्यांनी केली. आज महाराष्ट्र शिक्षणात मागे पडत आहे. तो गुणवत्तेच्या दृष्टीने कसा पुढे जाईल यासाठी राजकीय अभिनिवेश बाजूला करून आणखीन प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले. चांगल्या कामाचे कौतुक करून, त्याचे डॉक्युमेंटेशन करावे आणि शासनाला सादर करून, चांगले काम करण्यासाठी पाठपुरावा करावा अशी सूचना त्यांना केली.

### ४.६ पीजीआय २.० अहवालाच्या निष्कर्षाबाबत बैठकीचे आयोजन

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी प्रसिद्ध केलेल्या पीजीआय २.० अहवालाच्या निष्कर्षाबाबत आदरणीय पवार साहेबांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सेंटर येथे, चव्हाण सेंटरच्या शिक्षण विभागाच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या आणि शिक्षकांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेण्यात आल्या. शिक्षकभरती, पवित्र पोर्टल, अशैक्षणिक कामे, आदी गोष्टींवर चर्चा करण्यात आली.

याबाबत आदरणीय पवार साहेबांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थ आणि शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे ठरले.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, 'प्रथम' च्या फरिदा लांबे, गिरीश सामंत, विकास गरड, ऐनुल अत्तार, काकासाहेब वाळुंजकर, मुख्याध्यापक महासंघाचे जे. के. पाटील, महेंद्र गणपुले, डॉ. माधव सूर्यवंशी, मच्छिंद्र बोऱ्हाडे, अजित तिजोरे, तुषार म्हात्रे, रसिका मुळ्ये आदी मान्यवर उपस्थित होते. राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. वसंत काळपांडे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. ह. ना. जगताप, किशोर दरक आदी बैठकीत ऑनलाईन सहभागी झाले होते. तसेच प्रथम, मुक्तांगण, कोटक, टीच फॉर इंडिया, हमारा फाऊंडेशन, रंगुनवाला, निपुण भारत, विकास सहभाग आदी संस्थांच्या प्रतिनिधींनीदेखील या बैठकीत सहभाग घेतला.

### ४.७ जिल्हा समन्वयकांची एकदिवसीय कार्यशाळा

यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंच अंतर्गत राज्यभर काम करणाऱ्या जिल्हा समन्वयकांची एकदिवसीय कार्यशाळा पुण्यात पार पडली.

प्रास्ताविकानंतर चव्हाण सेंटरचे कार्यक्रम प्रमुख दत्ता बाळसराफ यांनी उपस्थित समन्वयकांना कार्यशाळेचा उद्देश समजावून दिला. शिक्षण विकास मंचचे काम अधिक प्रभावीपणे आणि चांगल्या पद्धतीने कसे करावे, शिक्षण विकास मंचाच्या वर्षभराच्या कामाचं नियोजन कसे करावे, संघटना वाढीच्या दृष्टीनं कोणते प्रयत्न करावेत याबाबतचे मुद्दे सर्वांसमोर विचारार्थ ठेवले. शिवाय शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार बसंती रॉय यांनी आपण एक शैक्षणिक विषयावरील पोर्टल सुरू करावे, अशी सूचना केली आहे त्याचाही विचार करावा, असे मत व्यक्त केले.

शिक्षण विकास मंचच्या कामाचे स्वरूप आणि समन्वयकांची भूमिका याविषयी शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी सर्वांना माहिती दिली. शिक्षण विकास मंचची सुरूवात, वाटचाल आणि समन्वयकांची भूमिका याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले ? शिवाय शिक्षण परिषदा, शिक्षण कट्टे, WhatsApp ग्रुप, शिक्षक साहित्य संमेलन, फेलोशिप, राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार याबद्दलही माहिती दिली.

शिक्षण विकास मंचाच्या कार्यक्रमाची तांत्रिक बाजू सांभाळणारे अजित तिजोरे यांनी सर्वांना सोप्या भाषेत शिक्षण विकास मंचच्या सोशल मीडियाविषयी माहिती दिली. शिक्षण विकास मंचाने कोणते नवोपक्रम हाती घ्यावेत ? याविषयी पाठ्यपुस्तक मंडळाच्या प्रमुख आणि लेखिका धनवंती हर्डीकर यांनी मांडणी केली. या विषयाच्या अनुषंगाने सखोल चर्चा झाली. मंच स्तरावर, समन्वयक स्तरावर आणि शिक्षकांना वैयक्तिकरीत्या करता येण्याजोगे उपक्रम त्यांनी सुचवले. अनेक महत्त्वाचे मुद्दे त्यांनी त्यांच्या विवेचनात मांडले.

दुपारच्या सत्रात प्रवीण शिंदे यांच्या 'विज्ञानमित्र' या संकेतस्थळाचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आदरणीय डॉ. वसंत काळपांडे यांच्या हस्ते झाले. 'शरद पवार इन्स्पायर फेलोशीप इन एज्युकेशन' मधील समन्वयकांची भूमिका नेमकी काय असायला हवी ? याविषयी योगेश कुदळे यांनी समन्वयकांना मार्गदर्शन केले. काही सूचना केल्या. वारंवार सारखेच विषय प्रकल्पासाठी येऊ नयेत ? यासाठी काय काय करता येईल ? याबाबतचा विचार सुचवण्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात शिक्षण विकास मंचची आगामी काळातील भूमिका काय असेल.. ? याविषयी राज्याचे माजी शिक्षण संचालक, शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आदरणीय डॉ. वसंत काळपांडे यांनी शिक्षण विकास मंचाशी जोडलेल्या समन्वयकांसोबत स्वत:चे अनुभवविश्व उलगडताना सांगितले की, वाचन हा माझा छंद असून, शिक्षण हे माझे आवडते क्षेत्र आहे. शिक्षण हा माझ्यासाठी एन्जॉय करण्याचा विषय आहे. त्यामुळेच मी सर्वांसोबत जोडला गेलो. आजच्या नवनवीन संकल्पना शिक्षणात येत आहेत, त्याचा विचार करावा, त्याचा स्वीकार करावा. कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) सारखा विषय घेऊन आगामी वर्षभर आपण राज्यात यामुळेच काम करणार आहोत. त्याची लिटमस टेस्ट मुंबईत होणाऱ्या २७ जानेवारीच्या शिक्षण कट्ट्यापासून सुरू होईल. शिक्षण विकास मंच शिक्षणात ओपिनियन मेकर म्हणून काम करीत आहे. यामुळेच आपली वाढ होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'शरद पवार इन्स्पायर फेलोशीप इन एज्युकेशन' साठी काही महत्वाच्या विषयाची निवड यादी करण्याचा सल्ला समन्वयकांना दिला.

दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत संदीप पवार जरेवाडी बीड यांनी शासनाकडून दररोज पाठविल्या जाणाऱ्या आदेशाचा शालेय कामकाजावर होणारा परिणाम हा मुद्दा उपस्थित केला. शिक्षकांना शिकवू द्या अशी

आग्रही भूमिका त्यांनी मांडली. ऐनुल अत्तार मुंबई, महेंद्र गणपुले पुणे, हर्षा पिसाळ पुणे, डॉ. रूपेश मोरे छत्रपती संभाजीनगर, काकासाहेब वाळुंजकर अहमदनगर, रवींद्र जंगम सातारा, किशोर भागवत बुलढाणा, तानाजी माने सोलापूर, सचिन खैरनार ठाणे, महादेव मांदळे पुणे, उमेश नेवसे पुणे, अतुल सवाखंडे पुणे, प्रमोद धायगुडे पुणे उपस्थित सर्व समन्वयकांनी सक्रिय सहभाग घेतला. आगामी काळातिल कृतीकार्यक्रमांविषयी तुषार म्हात्रे यांनी माहिती दिली. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेचं सूत्रसंचालन जयवंत कुलकर्णी यांनी केलं. मच्छिंद्र बोऱ्हाडे यांनी कार्यशाळेच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

### ४.६ 'मुंबई डायलॉग' ऑन वर्ल्ड अफेअर्सचे आयोजन

परराष्ट्र धोरणाच्या दृष्टिकोनावर चर्चा सुरू करण्याचा प्रयत्न चव्हाण सेंटरकडून करण्यात आला आहे. परराष्ट्र धोरण हा केवळ केंद्र सरकारच्या चिंतेचा विषय होऊ शकत नाही. भविष्याच्या दृष्टीने पाहिले तर तो आपला देखील विषय आहे. मुंबई हे आर्थिक घडामोडींचे प्रमुख केंद्र ! त्यामुळेच मुंबईस जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. चव्हाण सेंटर 'मुंबई डायलॉग' अंतर्गत परराष्ट्र धोरण समजावून सांगण्यात यशस्वी होत आहे.

### ४.८ 'मुंबई डायलॉग' ऑन वर्ल्ड अफेअर्स एप्रिल २०२३ ते एप्रिल २०२४

| | | |
|---|---|---|
| Dr. Parimal Maya Sudhakar | Indias Aspirational Foreign policy | 28/4/2023 |
| Dr. Ajay Gudavarthi | Why has the World become so illiberal? | 22/5/2023 |
| Rajni Bakshi | Bazaar Ethos and the defiant search for the alternatives to Capitalism | 27/6/2023 |
| Atul Mishra | Should Liberal Democracy have a Future | 25/7/2023 |
| Prof Dipankar Sinha | Rebooting Political communication | 25/8/2023 |
| Yogendra Yadav | Reclaiming the Republic: The Challenge of 2004 | 29/10/2023 |
| Dr Arvind Yelery | Kissinger & China A mercular relationship that changing the world | 24/01/2024 |
| Prof Rama Kumar | Tall Claims and Bleak realities features of contemporary Indain Economyz | 03/04/2024 |

### ४.९ पी.एच.डी

राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयासाठी मुंबई विद्यापीठाकडून पीएच. डी. साठी आपल्याला मान्याता मिळाली आहे. २०२३-२४ साठी अर्थशास्त्र विषयाचे ७ व राज्यशास्त्र विषयाचे २ असे ९ अर्ज आले . निवड प्रक्रियेनुसार ४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. त्यांचे विषय व नावे खालीलप्रमाणे आहेत. अर्थशास्त्र या विषयासाठी मा. डॉ. बालाजी सुरवसे , साहाय्यक प्राध्यापक, कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट कणकवली ,सिंधुदुर्ग यांची पीएच. डी. गाईड म्हणून नेमणूक केलेली आहे.

1. Natasha Kalasi A study of Economic Impact of Digital Payment Methods on Fiscal policy
2. Harshwardhini Borwankar: An Empirical Study of Micro Finance Institutions in the financial Inclusion and Socio-Economic development of sindhudurg district .
3. Vinita Fernandis , Marine Eco system and the Socio-Economic Implication of new Fishing method on Coastal Communities.

4. Manisha Navle, Informal Labour Economy, A cross Sectional Study of labour Markets in Mumbai Region.

## ४.१० स्वातंत्र्य दिनानिमित्तप्रश्नमंजुषा

७७ व्या भारतीय स्वातंत्र्यदिननिमित्त घेतलेल्या प्रश्नमंजुषा राज्यस्तरीय स्पर्धेत शालेय गटात नगरचा महादेव खेडकर, महाविद्यालयीन गटात ठाण्याचा नीरज पवार आणि खुल्या गटात नांदेडच्या रेखा कंगठीकर प्रथम.

भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने ७७ व्या भारतीय स्वातंत्र्यदिननिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

गतवर्षीपासून या प्रश्नमंजुषेला सुरुवात झाली आहे. गतवर्षीपेक्षा या वर्षी मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढवणारा आहे. या या स्पर्धेत राज्यभरातून एकूण ४८२१ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

शालेय गट, महाविद्यालयीन गट आणि खुला गट अशा तीन विभागात ही स्पर्धा घेण्यात आली.मराठी, इंग्रजी या दोन भाषेत झालेल्या स्पर्धेस राज्यातील विविध विभागांतून भरघोस प्रतिसाद मिळाला.

तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.शिवानी लिमये पुणे, राहुल प्रभु मुंबई, भाऊसाहेब उमाटे लातूर यांनी मदत केली. या सर्व प्रक्रियेची तांत्रिक बाजू अजित तिजोरे यांनी सांभाळली, समन्वयाचे काम डॉ.माधव सूर्यवंशी व योगेश कुदळे यांनी केले. शिक्षणकट्ट्याचे जिल्हा समन्वयक, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या पूर्ण टीमने अतिशय उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला आणि स्पर्धकांना प्रोत्साहित केले. त्याबद्दल त्यांचे कौतुक...

७ व्या भारतीय स्वातंत्र्यदिननिमित्त घेतलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेचा निकाल

शालेय गट:

१. Mahadev Devidas Khedkar - अहमदनगर - १५ गुण

२. Bhagwati Vinayak Kesarkar - मुंबई - १५ गुण

३. Harshwardhan Mahesh Jadhav - सातारा - १५ गुण

महाविद्यालयीन गट:

१. Niraj Gangadhar Pawar - ठाणे- १५ गुण

२. Vedant Vijay Barde - ठाणे- १५ गुण

३. Sarthak Pramod Satao - बुलढाणा- १५ गुण

खुला गट:

१. Rekha Marutirao Kangthikar - नांदेड- १५ गुण

२. श्री समाधान दगडूबा बोरुडे - जालना- १५ गुण

३. Rekha Patil- रायगड - १५ गुण

- **प्रजासत्ताक दिनानिमित्त राबवण्यात आलेले उपक्रम**

संविधान म्हणजे आपल्या भारतीय नागरिकांच्या जगण्याचा पाया आहे, सम्मानपूर्वक जीवन जगायचे असेल तर संविधान समजून घेणे आणि त्यानुसार वर्तन आपली जवाबदारी असल्याचे अॅड. खोत यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण सेंटर आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या अमृतहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात आम्ही भारतीय नागरिक ह्या विषयावर त्या बोलत होत्या.

प्रजासत्ताकची पंचाहत्तरी साजरी करत असताना प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या धडावर आपलेच डोके आहे का आणि त्यात आपलेच विचार आहेत का, कोणी आपल्याला whatsapp च्या खोट्या माहितीद्वारे फसवत तर नाही न हे तपासून बघणे आपली नागरिक म्हणून पहिले कर्तव्य असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले! आपला सम्मानपूर्वक जगण्याचा अधिकार तेव्हाच अबाधित राहू शकतो जेव्हा आपण समोरच्या व्यक्तीचा अधिकार जपणे हे आपले कर्तव्य समजून घेऊ असेही त्या म्हणाल्या!

वर्तमान परिस्थिती मध्ये संविधान विशेषत: संविधानातील धर्मनिरपेक्ष हे तत्त्व समजून घेणे अत्यंत जरुरीचे आहे असे त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी उपस्थितांना सोपे उदाहरण दाखले देत गाणी म्हणत धर्मनिरपेक्षता, लोकशाही हक्क कर्तव्य ह्या संज्ञा समजून सांगीतल्या! कार्यक्रमाला उपस्थित जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी , शिक्षक , शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, आजी माजी सरपंच पंचायत समिती आजी माजी सदस्य यांनी गाणी म्हणत कार्यक्रमाला दाद दिली. कार्यक्रमाची सांगता करताना ॲड. खोत यांनी संपूर्ण गावाला बालविवाह प्रतिबंध करण्याची शपथ दिली.

देशाच्या संविधानाप्रति सर्वसामान्य नागरिकांपासून मुलांपर्यंत सर्वांना अभिमान वाटावा, त्यापासून सतत प्रेरणा मिळावी, यासाठी आपल्या मतदार संघात संविधान स्तंभ उभे केले आहेत. ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सव निमित्ताने बारामती, दौंड, जेजुरी, सासवड, भोर, वेल्हा, पौड, आणि धनकवडी येथील संविधान स्तंभास अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शाळांनी संविधान स्तंभापर्यंत रॅली काढली, तसेच संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. याचबरोबर संविधानाबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधान पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी शाळांचे शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. सर्वानी या उपक्रमात भाग घेतला याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

## ९.५ युवा विभाग

- **दहा दिवसीय बूट कॅम्पचे आयोजन (४ ते १० एप्रिल २०२४)**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ॲग्रिकल्चर' अंतर्गत दहा दिवसीय बूट कॅम्प आयोजित करण्यात आला. सह्याद्री फार्म, नाशिक येथे या कॅम्पचे आयोजन केले होते. या बूट कॅम्प मध्ये संदिप शिंदे, विलास शिंदे यांनी फेलोंना मार्गदर्शन केले. सह्याद्री फार्सच्या यशस्वी उपक्रमांतून सर्व फेलोंनी प्रेरणा घेतली.

चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे यांनी या बूट कॅम्प ला भेट देऊन फेलोंशी संवाद साधला. या वेळी चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, सह्याद्री फार्मचे चेअरमन विलास शिंदे व त्यांची टीम उपस्थित होती.

- **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या 'शिवदर्शन' या नियतकालिकाला चव्हाण सेंटरतर्फे विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी पुष्पराज गावंडे सदस्य महाराष्ट्र राज्य मंडळ, आमदार

अमोल मिटकरी, साहित्यिक रावसाहेब काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास कुलट, प्रशांत देशमुख, प्रा. पोहरे सर, संतोष मेकाले, अविनाश चव्हाण व मनीषा खिल्लारे आदी उपस्थित होते.

विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. विनायक विज्ञान महाविद्यालय नांदगाव खंडेश्वर महाविद्यालयाच्या 'ज्ञानदिप' या नियतकालिकाला चव्हाण सेंटरतर्फे विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी डॉ. मोना चिमोटे, मनिषा खिल्लारे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अलका भिसे, संपादक राजू तायडे, प्रविण खोडके, आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

- **अभिसरण :शोधूया स्वत :ला... समजूया महाराष्ट्राला**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने मागील चौदा वर्षांपासून 'अभिसरण यूथ एक्सचेंज प्रोग्राम' आयोजित करण्यात येतो. या उपक्रमांतर्गत विदर्भातील युवक- युवतींना पाच गटांत विभागून सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांत पाठविण्यात आले. दिनांक ९ मे २०२३ पासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा १९ मे २०२३ रोजी समारोप झाला. समारोपास चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे उपस्थित होत्या.

या वेळी सर्व युवक-युवतींनी पश्चिम महाराष्ट्रातील जीवनमान समजावून घेतले. यामध्ये शेती व प्रमुख पिके, भौगोलिक वैशिष्ट्ये, ऐतिहासिक वारसा व परिसरातील व्यक्तिमत्त्वांची ओळख आदींची माहिती या मुलांना मिळाली. या तरुणांनी दाखविलेला उत्साह अतिशय महत्त्वाचा आहे. लोकांना या उपक्रमाबद्दल आता कुतूहल वाटते ही जमेची बाजू आहे. भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक कसा करता येईल, हा चव्हाण सेंटरचा मानस आहे.

या सर्व मुलांना संपूर्ण दहा दिवसांमध्ये प्रसिद्ध मराठी दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, ज्येष्ठ लेखक प्रशांत दळवी, प्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा जोशी, प्रा. श्रद्धा कुंभोजकर, प्रा. देवकुमार आहिरे, डॉ. प्रमोद मुनघाटे व डॉ. अरुणा सबाने, डॉ. आशिष इखार यांनी मार्गदर्शन केले.

रवींद्र झेंडे, निलेश राऊत, रंजीत बायस, संतोष मेकाले, मनीषा खिलारे, पंकज राऊत, सुबोध जाधव व मंगेश निरंतर यांच्या विशेष सहकार्यामुळे हा दहा दिवसीय उपक्रम यशस्वी झाला.

- **अभिसरण : शोधूया स्वत :ला समजूया महाराष्ट्राला**

यशवंतराव चव्हाण सेंटर, युवा विभाग आयोजित 'अभिसरण - मराठवाडा ते कोकण' या नऊ दिवसीय अभ्यास दौऱ्याच्या समारोप कार्यक्रम शांतीवन आश्रम पनवेल येथे पार पडला. या दौऱ्यासाठी मराठवाड्यातील ५० युवक व युवती कोकण अभ्यास दौऱ्यासाठी आले होते.

कोकणातील रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधदुर्ग या जिल्ह्यांतील चालीरीती संस्कृती, रोजगार, भाषा, खाद्य इत्यादी घटकांचा अभ्यास युवकांनी केला. तसेच कोकणातील दुर्ग, गड, शिक्षण संस्था, कुटुंब भेट, बाजारपेठ, शेती, पारंपरिक व्यवसाय, अशा सर्व बाबींचा अभ्यास ह्या दौऱ्यात करण्यात आला.

या समारोप कार्यक्रम प्रसंगी चव्हाण सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, दत्ता बाळसराफ, रत्नागिरी जिल्हा केंद्र सचिव अभिजीत खानविलकर, नांदेड जिल्हा केंद्र सचिव शिवाजी गावंडे, जागृत कष्टकरी संघटनाचे अनिल

सोनवणे आणि सारंग नेरकर उपस्थित होते. या संपूर्ण उपक्रमात नॅन्सी मॅम, अनिल सोनवणे सर, सिध्दी गावडे, प्रीती जाधव, अक्षय, हरीश यांचे मोलाचे योगदान लाभले.

या दौऱ्याचे नियोजन संतोष मेकाले, उपक्रमाचे राज्य समन्वयक रंजीत बायस, अतुल तांडेल, दीपक जगताप यांनी केले.

- **उच्चशिक्षण - का, कुठे आणि कसे ?**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागाच्या वतीने 'उच्चशिक्षण - का, कुठे आणि कसे ?' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत देशातील नामांकित विद्यापीठांतील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांविषयी माहिती देण्यात आली. उपस्थित वक्त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले. तसेच विविध फेलोशिपस् प्रवेशप्रक्रिया व त्यासाठीची तयारी, शिक्षणपद्धती, भविष्यातील करिअरच्या रोजगाराभिमुख नवीन संधी याविषयी तज्ज्ञांनी माहिती दिली.

- **महाराष्ट्र क्रिएटर समिट**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'महाराष्ट्र क्रिएटर समिट' आयोजित करण्यात आली. या प्रसंगी चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे उपस्थित होत्या. आज समाजात अनेक विषय आहेत. क्रिएटर यांनी पुढाकार घेऊन त्यावर काम करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर मराठी भाषा जपण्यासाठी देखील काम करणे गरजेचे आहे, असे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. तसेच नेटवर्किंग, थिंकिंग आणि इव्हाल्विंग या त्रिसूत्रीवर आगामी काळात भर देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्व. चव्हाण साहेब यांच्या जयंतीदिनी पाच क्रिएटर व्यक्तींना फेलोशिप देण्यात येणार असल्याची घोषणा या वेळी त्यांनी केली.

या क्रिएटर समिट मध्ये अनेक वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. 'डिजिटल कंटेंट-आशय निर्मितीमध्ये भाषा, बोली आणि प्रादेशिक संस्कृतीचे स्थान', 'आशय निर्मितीतून (Content Creation) आर्थिक उत्पन्न', 'स्वामित्वहक्क (कॉपीराइट) / बौद्धिक संपदा हक्क (आयपी) संबंधी प्रश्न आणि अभिनव आशय निर्मिती' आणि कंटेंट क्रिएटरची सुरक्षितता (सायबर सुरक्षा, हॅकिंग, धमक्या, ट्रोलिंग, डिजिटल कंटेंट क्रिएटरचे मानसिक आरोग्य) या विषयावर उपस्थित क्रिएटर्सनी चर्चा केली.

या कार्यक्रमासाठी भाडीपा-विषय खोल, अमुक-तमुक आणि खास रे टीव्ही यांचे विशेष सहकार्य लाभले. डिजिटल माध्यमातून व्यक्त होत जनतेच्या मनामध्ये घर करणारे सर्व क्रिएटर्स या समिटसाठी उपस्थित होते. त्याचबरोबर त्यांचा चाहतावर्ग देखील मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

- **युवा नेतृत्व विकास**

**एक दिवसीय कार्यशाळा**

आज जालना येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, जालना यांच्या तर्फे जालन्यातील महाविद्यालयीन युवक व युवती यांच्यासाठी युवा नेतृत्व विकास एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा केंद्र

जालनाचा अध्यक्ष नात्याने व सचिव प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा केंद्र जालनाच्या उपाध्यक्षा सौ. डॉ. उषा झेर व कार्यशाळेच्या अध्यक्षा सौ. मनीषा टोपे यांनी केले.

आजचा युवक असा असावा, व्यक्तिमत्त्व विकास व युवकांची सामाजिक भूमिका, युवकांचे मानसिक आरोग्य- भावना, 'युवकांच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र' या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. युवा नेतृत्व विकास एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल युवक व युवती जिल्हा केंद्र जालनाचे आभार मानले.

यावेळी मा. बाबासिंग अध्यक्ष, ज्ञानज्योत शिक्षण संस्था तसेच युवा विभाग प्रमुख, मा. संतोष मेकाले, मुंबई, सागर गडकरी, शंकर वैद्य, किशोर खरात, गणेश उढान, शिवाजीउगले, अनंत चेके, सवडे यांच्यासह कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील युवक व युवती उपस्थित होते.

- **युथ वेलबीइंग**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागातर्फे 'युथ वेलबीइंग' या विषयावर विल्सन महाविद्यालय, मुंबई येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास विद्यार्थ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला.

- **मानसिक आरोग्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

युवांसाठी मानसिक आरोग्य या विषयावर दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात माणसाचे दैनंदिन जीवन फारच त्रासदायक होत चालले आहे. तो शारीरिक, मानसिकदृष्ट्या त्रस्त आहे, त्याच्या आयुष्यातील आनंद हरवत चालला आहे, यामुळे अकालिक आजारांना सामोरे जावे लागत आहे. शारीरिक आजारांचे लक्षणे आपल्याला कळतात म्हणून त्यावर आपण लगेच उपचार करतो, परंतु मानसिक आजारांची लक्षणे आपल्याला लवकर समजून येत नाहीत, सामाजिक भीतीने आपण कोणाशी त्याविषयी बोलत नाहीत. यामुळे हळूहळू माणूस या आजारांना बळी पडत चालला आहे. यासाठी माणसाचे मानसिक आयुष्य सुदृढ असणे खूप गरजेचे आहे. हल्लीची मुलेहि आधुनिकतेच्या नावाखाली सामाजिक माध्यमांच्या आहारी जात आहेत. व त्यातून नकारात्मकता येऊन युवांच्या हातून आत्महत्यासारखे प्रकार घडत आहेत.

याचा सर्वांगीण विचार करून मानसिक आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने युवांसाठी मानसिक आरोग्य या विषयावर दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी व्याख्यानाचे आयोजा करण्यात आले होते. मानसशास्त्रज्ञ मा. योगेश फडतरे यांनी या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. हे व्याख्यान मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात घेण्यात आले होते. एकूण १०८ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.

- **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्रदान सोहळा**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. रंगमंचीय कलाविष्कार, क्रीडा, साहित्य, सामाजिक, उद्योग, पत्रकारिता आणि नवनिर्मिती या विषयांत उल्लेखनीय काम करणाऱ्या एकूण आठ युवक आणि सात युवतींना या वेळी खासदार सुळे यांच्या हस्ते राज्यस्तरीय युवा पुरस्कार देण्यात आले. सन्मानपत्र आणि २१ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अभिनव एज्युकेशन सोसायटीचे राजू जगताप, चव्हाण सेंटरचे विश्वस्त अजित निंबाळकर, जिल्हा केंद्र पुणेचे

सचिव अंकुश काकडे, आनंद अवधानी, डॉ. गणेश चंदनशिवे हे उपस्थित होते.

या वेळी बोलताना सुप्रियाताई सुळे म्हणाल्या, “आपल्याला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. पण ती परंपरा आपण विसरत आहोत का ? असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. मी मागील आठवड्यात एका शाळेत गेले होते तिथे यशवंतराव चव्हाण कोण होते ? असा प्रश्न विचारला असता फक्त एका मुलालाच याचे उत्तर देता आले. याचा अर्थ आपण नव्या पिढीला सांगण्यात कमी पडत आहोत. अगोदरची पिढी प्रगल्भ होती. पण आज कोणत्याही बाबतीत टोकाची भूमिका घेतली जात आहे. आज माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे एआयमुळे अनेक समीकरणे बदलताना दिसत आहेत. एकीकडे एआय मुळे अनेकांचे जॉब धोक्यात आले आहेत. तर दुसरीकडे एआयवर आधारित असलेल्या शेतीसाठीची देशातील पहिली लॅब बारामतीत होत आहे. मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून त्या ठिकाणी शेतीच्या सुयोग्य नियोजणासाठीचे तंत्रज्ञान विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे चव्हाण सेंटरतर्फे एआयच्या बाबतीत यापुढे काम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याचबरोबर एक थिंक टँक देखील तयार केला जाणार आहे.”

अत्यंत उत्साह आणि युवक युवतींच्या जल्लोषात पुण्यात आज हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. अनेक तरुणांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याशी या वेळी संवाद साधला. चेतन कोळी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### ९.६ आदिवासी विकास केंद्र

- **सामुदायिक वन हक्क चर्चासत्राचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आदिवासी विकास केंद्रातर्फे दिनांक १७ ऑक्टोबर.२०२३ रोजी “सामुदायिक वन हक्क” या विषयावर पुणे येथे एक दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यास आली.

या चर्चासत्रात लोकशासन आंदोलन, AFARM, संस्कृती प्रतिष्ठान, सगुणा, जातन फाउंडेशनचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. प्रतिभाताई शिंदे या सत्राच्या अध्यक्ष होत्या. यशवंतराव चव्हाण सेंटर च्या सीईओ श्रीमती दिप्ती नाखले आणि श्री दत्ता बाळसराफ हे देखिल या चर्चासत्रा मधे उपस्थित होते.

## १०. जिल्हा केंद्रे:-

### १०.१ जिल्हा केंद्र, नागपूर

- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विदर्भ गौरव प्रतिष्ठान व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय सेवेत कार्यरत भगिनींचा सत्कार करण्यात आला.

- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तथा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची ११० वी जयंती जिल्हा केंद्र नागपूर येथे साजरी करण्यात आली. या प्रसंगी श्रीपाद अपराजित, डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नागपूर यांच्या वतीने ‘लैंगिक शोषण’ या संवेदनशील विषयावर चर्चेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी बालमानसशास्त्रज्ज्ञ डॉ. अविनाश गावंडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी

मुश्ताक पठाण कादंबरीकार, शीतल देशमुख-उठाके तसेच समुपदेशक, वैद्यकीय व्यवस्थापन व कायदा अभ्यासक डॉ. अनुजा ननावरे या चर्चेत सहभागी झाले.

- महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त 'युवा अष्टावधानी' या विषयावर अर्चित चांडक (भा.पो.से.) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद' या विषयावर सुप्रसिद्ध साहित्यिक समीक्षक डॉ. प्रकाश खरात यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- ग्रामजयंतीचे औचित्य साधून 'राष्ट्रसंताचे जीवनदर्शन' या विषयावर डॉ. संजय भवते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- विदर्भ गौरव प्रतिष्ठान व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. डॉ. उल्हास मोगलेवार यांच्या 'दीपस्तंभ' या लेखसंग्रहाचा प्रकाशन समारंभ पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज यदि यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नागपूर आणि वनराई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण म्हणजेच ५ जून रोजी नेहरू विद्यालय, न्यू हिंगणा, रायपूर येथे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी होते. सर्वश्री प्रकाश नागपूरचे, सरपंच-दिनेश डोंगरे, उपसरपंच - बबलू शेख, प्रकाश ईटनकर, श्रीराम काळे, अजय पाटील, रमेशजी बंग, राजाभाऊ टाकसाळे, निलेश खांडेकर, महेश बंग व इतर मान्यवर उपस्थित

- **आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा**

  यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नागपूरच्या वतीने नागपूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील एक शिक्षकाला आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला.

  पाच हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या प्रसंगी माजी मंत्री सुनिलबाबू केदार, माजी मंत्री रमेशजी बंग, माध्यमिक जिल्हा परिषद नागपूरच्या शिक्षणाधिकारी रवींद्रजी काटोलकर, डॉ. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

- **पुस्तक प्रकाशन सोहळा**

  निवृत्त सनदी अधिकारी व २१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या "वेदनेचा कूस" व "गांधीवादाचा केमिकल लोचा आणि इतर कथा" या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ पार पडला.

  या प्रसंगी ९८ व्या नियोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, प्रसिद्ध कवी व वक्ते डॉ. पी. विठ्ठल, श्री. महेश बंग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## १०.२ जिल्हा केंद्र, नाशिक

- दि.१४.०७.२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रालयच्या वतीने मुझीयम ऑन व्हिल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकच्या वतीने मुझीयम ऑन व्हिल या उपक्रमात एका बसमध्ये विविध वाद्ये ठेवण्यात आली आहेत. त्याची सविस्तर माहिती देण्यात आली. त्याचबरोबर ती वाद्ये वाजवण्याची संधी देखील लहान मुलांना देण्यात आली, त्यामुळे मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. शाळेतील लहान मुलांबरोबरच शिक्षकांनी देखील या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला. माध्यमिक विद्यालय शाळेतील विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाचा लाभ घेतला. फिरते वस्तुसंग्रहालय टीमच्या आत्रेयी चक्रवर्ती, शांतीनी सुतार व टीमने मुलांना वस्तुसंग्रालयात मांडण्यात आलेल्या वस्तुंबाबत सविस्तर माहिती दिली. ध्वनी हा प्रदर्शनाचा मुख्य केंद्रिबंदू आहे. हे विद्यार्थ्यांना समजून सांगितले, पुरातन वस्तू ध्वनी, मानवाचा प्रवास या विषयावर हे फिरते प्रदर्शन आहे. या उपक्रमाचे आयोजन अत्रेय चक्रवर्ती, शंतीनी सुतार, ऋतुजा काळे, अमित पाले, यशस्वीतेसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव प्रा. अशोक पिंगळे, भुषण काळे, गणेश ढगे, आदींनी परिश्रम.

- दि.२७.०७.२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मोडक रिसर्च ॲन्ड रिहयाबिलिटेशन या संस्थेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थीना १०वी व १२वी ला मिळालेल्या गुणांबदद्दल गुणगौरव सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकच्या वतीने व मोडक रिसर्च ॲन्ड रिहॅबिलिटेशन या संस्थेच्या संयुक्त विद्यामाने सदर गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रम अमेरीकेतील महाविद्यालयातून पदविधर होणारी पहिली मूकबधिर व्यक्ती मा. श्री. हेलन किलर यांच्या स्मृतिप्रीत्यार्थ १०वी आणि १२वी उत्तीर्ण झालेल्या मुलामुलीचा सत्कार करून त्याद्वारे मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा उद्देश समोर ठेवून करण्यात आला. कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे कोषाध्यक्ष मा. श्री. हंमत टकले, व मोडक रिसर्च ॲन्ड रिहॅबिलिटेशन संस्थेच्या सचिव मा. श्रीमंती शेख शाईन जिल्हा केंद्र नाशिकचे अध्यक्ष ॲड नितिन ठाकरे सचिव प्रा. अशोक पिंगळे, सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे, विक्रांत मते उपस्थीत होते.

- दि.०४.०८.२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक येथे गिव्ह वेलफेअर ऑरगनायजेशन संस्थे कडून अभ्यासिकेतील विद्यार्थीनां स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट दिल्याबद्दल कार्यक्रम आयोजन करण्यात आला.

अभ्यासिकेतील आर्थिक दुर्लभ गटकातील होतकरू मुलामुलींना स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यास आवश्यक असणारे पुस्तके खरेदी करणे शक्य होत नाही. ही गरज ओळखून गिव्ह वेलफेअर ऑरगनायजेशन संस्थे अध्यक्ष श्री. रमेश अयर सरांनी जिल्हा केंद्र नाशिक अभ्यासिकेतील मुलांनी दिलेल्या पुस्तकांची यादी नुसार ५६ पुस्तके भेट दिली, त्यानिमित्ताने अभ्यासिकेतील विदयार्थीसोबत शुक्रवार दि. ०४.०८.२०२३ सायंकाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास गिव्ह वेलफेअर ऑरगनायजेशन संस्थेचे तुषार गायकवाड यांनी अभ्यासिकेतील मुलांना मार्गदर्शन केले व यापुढेही पुन्हा पुस्तकांची गरज असल्यास

नक्कीच मदत करू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमास अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरचे भूषण काळे व गणेश ढगे यांनी परिश्रम घेतले.

- गुरूवार दि.१०.०८.२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक मार्फत सुप्रसिध्द कवी मा. ना.धो. महानोर यांना मानवंदना निमित्त या नभाने या भुमीला दान दयावे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शब्दांचा हा खेळ मांडला, जांभूळ पिकल्या झाडाखाली, मी रात टाकली, घन ओथंबुन येती, चिंब पावसाने रान झाली, या सह नभ उतरू आलं मन चिंब पावसाळी, आम्ही ठाकर ठाकर अशी काही गाणी ना.धों. महानोर यांची अजरामर गीते. याच गीतांचे सादरीकरण करीत महानोर यांच्या आठवणीना नाशिककरांनी उजाळा दिला.

यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठा विद्या प्रसारक सॅमाज यांच्यातर्फे गंगापूर रोडवरील आयएमआरटी महाविद्यालय येथे या नभाने या भूमीला दान द्यावे या कार्यक्रमात कवी स्व. ना.धों. महानोर यांना त्यांच्या गाजलेल्या कविता व गीतांच्या सादरीकरणातुन मानवंदना देण्यात आली. गायक अपर्णा देशपांडे, ॲड. प्राजक्ता अत्रे, गोसावी, प्रा. आनंद अत्रे, यांनी या वेळी महानोर यांच्या कविता व गीतांचे सादरीकरण केले. प्रसाद पुराणिक देवाशिष पाटील, अनिल धुमाळ, निलेश सोनवणे यांनी संगीत साथ दिली. व्यवस्थापन गणेश ढगे यांनी केले.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकचे अध्यक्ष ॲड. नितिन ठाकरे सचिव प्रा. अशोक पिंगळे सदस्य ॲड. राजेंद्र डोखळे उपस्थीत होते. सूत्रसंचालन सुरेखा बो-हाडे यांनी केले. आभार भूषण काळे यांनी मानले.

- सोमवार दि.१४.०८.२०२३ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक मार्फत युवा स्वातंत्र्यता ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले.

युवकांमध्ये राष्ट्र अभिमान जागावा या उददेशाने राज्यातील प्रत्येक केंद्रावर युवा स्वातंत्र्यता ज्योत रॅलीचे आयोजन केले होते. ही रॅली रावसाहेब थोरात सभागृह ते हुतात्मा स्मारकापर्यन्त काढली विद्यार्थीनी हातात संदेश फलक घेत भारत माता की जय वंदे मातरम घोषणा देत उत्सफुर्त सहभाग नोंदविला. चेह-यावर तिरंग्याचे टॅटू गांधी टोपी, पांढरे कुर्ते अशा पोशाखातील विद्यार्थिनी या रॅलीतून देशभक्तीचे दर्शन घडविले. रॅलीचे उदघाटन यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक चे सचिव प्रा. अशोक पिंगळे, व ॲड. राजेंद्र डोखळे, प्रा. सुरेखा बो-हाडे यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडुन व मशाल पेटवून करण्यात आले. म.वि.प्र. समाज संस्थेची महाविद्यालये, मातोश्री कॉलेज, नवजीवन कॉलेज, बीवायके कॉलेज, पी.व्ही. जी. कॉलेज, जे. आय. टी. कॉलेज, व के.के.वाघ कॉलेज, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. जवळपास तीनशे विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

- शुक्रवार दि.२५.०८.२०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व होरायझन अकॅडेमी सुळेवाडी रोड, मखमलाबाद मार्फत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व होरायझन अकॅडेमी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

झाला. या वेळी जिल्हा केंद्र नाशिकचे अध्यक्ष ॲड. नितिन ठाकरे यांनी. वृक्षसंवर्धन करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले या प्रसंगी म.वि.प्र. चे रमेश पिंगळे, लक्ष्मण लांडगे, अशोक बो-हाडे, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकचे सचिव प्रा. अशोक पिंगळे, ॲड राजेंद्र डोखळे, सुरेखा बो-हाडे आदी उपस्तीत होते.

- रविवार दि. ०३ मार्च २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक मार्फत गोदातीरी वसंत काव्योत्सवाचे आयोजन करण्यात आले.

नाशिक ही साहित्यनगरी आहे आणि अशा काव्य उत्सवातून नाशिकची साहित्य परंपरा वाहती राहणार आहे. अनेक कवींना येथे व्यासपीठ प्राप्त होत आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण सेंटर नाशिक विभागाचे अध्यक्ष ॲड. नितिन ठाकरे यांनी केले.

गोदावरी गंगाघाटावरील यशवंतराव महाराज पटांगण येथे गोदापूजन आणि गोदा वसंत काव्य उत्सव झाला.

जेष्ठ कवी नरेश महाजन अध्यक्षस्थानी होते पुलाखालून पाणी सारं वाहून गेलं ही कविता सादर केली. ज्येष्ठ कवयित्री रेखा भंडारे, अश्विनी बोरस्ते, सुरेखा बो-हाडे आदी महिला भगिनींनी गोदापूजन केले, गोदा वसंत काव्य उत्सवात कवी किरण सोनार यांनी संथ वाहणारी गोदामाई, मी झालो नाशिकचा आशिक ही कविता सादर करून उपस्थितांची मनं जिंकली, ज्येष्ठ साहित्यिक विजयकुमार मिठे यांनी भरून आले आभाळ. पङ्क्तील थोड्या गारा घाबरू नकोस मित्रा सुटलाय रान वारा या कविता सादर केल्या ज्येष्ठ कवयित्री रेखा भंडारी यांनी गोदामाई ही आपली रचना सादर केली. उत्कृष्ट कवीनां संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देउन सत्कार करण्यात आला कार्यक्रमासाठी माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, ॲड. भास्करराव पवार, ॲड. राजेंद्र डोखळे, डॉ. अशोक पिंगळे, डॉ. अशोक बो-हाडे श्री. भूषण काळे, व्यवस्थापक गणेश ढगे उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या जयंतीनिमित्त श्री. भास्कर पेरे पाटील यांचे व्याख्यान

मंगळवार दिनांक १२ मार्च २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता स्थळ रावसाहेब थोरात सभागृह येथे आयोजित केले होते. या वेळी बोलतांना त्यांनी प्रतिपादन केले की यशवंतराव चव्हाणांसारखे नि:स्वार्थी आयुष्य जगा. मनुष्याचे आयुष्यमान कमी होत असताना प्रामुख्याने स्वच्छ पिण्याचे पाणी, वृक्षलागवड वैयक्तिक स्वच्छता, बाहेरचे खाद्यपदार्थ टाळणे, नवीन पिढीला संस्कार, ज्येष्ठांना जीव लावणे या गोष्टींचा अंगीकार करणे आवश्यक आहे. कोणतेही काम सामूहिक प्रयत्नाने गाव सुधारण्यासाठी करून आदर्श गाव बनू शकते. यशवंतराव चव्हाण व डॉ. कलाम यांनी आपले आयुष्य समाजासाठी दिले. त्यांचा आदर्श घेउन प्रत्येकाने नि:स्वार्थी जीवन जगावे असे प्रतिपादन आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी केले. तसेच यशवंतराव चव्हाण सेंटर या समाजाचा विचार करणा-या संस्था आहेत. जनसामान्यांनी संतांचे विचार आत्मसात करून चांगला समाज, देश घडविण्यासाठी प्रयत्न करावे.

अध्यक्षीय भाषणात ॲड. नितिन ठाकरे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे उत्तम प्रशासक, साहित्यिक होते. कला, क्रीडा क्षेत्रात त्यांचा वावर होता. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी योगदान दिले. त्यांचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे अनेक लोकोपयोगी उपक्रम सुरू केले आहेत. याचाच एक

भाग म्हणून सेंटरमार्फत अभ्यासिका चालवली जाते याच अभ्यासिकेतील एमपीएससीतुन उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा चव्हाण साहेबांची पुस्तके भेट देवून सत्कार करण्यात आला. तसेच २५ सेविकांना साडी चोळी वाटप केले. प्रास्ताविकात ॲड. राजेंद्र डोखळे यांनी केले सूत्रसंचालन सुरेखा बो-हाडे यांनी केले.

- दि.२९.०९.२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मविप्रचे समाजकार्य महाविद्यालय यांच्या वतीने गोदावरी स्वच्छता अभियानया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिक व मविप्रचे समाजकार्य महाविद्यालय यांच्या वतीने एक १ ऑक्टोंबरला स्वच्छता अभियानाच्या पार्श्वभूमीवर अनंत चतुर्दशीच्या दुस- या दिवशी गोदावरी काठी रामकुंडावर स्वच्छता अभियान राबवले गेले. स्वच्छता अभियानात मार्गदर्शन करतांना यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे म्हणाले, स्वच्छता हा जीवनाचा मूलमंत्र आहे. आज इंडस्ट्रीज आणि लोकसंख्या वाढ यामुळे प्रदूषण खूप वाढले आहे. अनंत चतुर्दशीनंतर गोदाकाठी भाविकांनी केलेला कचरा आज स्वच्छता अभियानात दूर करूया व गोदावरी जलाची आणि काठाची स्वच्छता करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. माजी आमदार नानासाहेब बोरस्ते या प्रसंगी युवकांना मार्गदर्शन करताना म्हणाले, स्वच्छतेचे संस्कार महाविद्यालयाच्या शिक्षणाबरोबर आवश्यक आहे. म्हणूनच स्वच्छतेतून आरोग्य संपन्नता या मार्गाकडे तरुणांनी मार्गक्रमण करावे. स्वच्छतेसाठी तरुणांनी स्वत: पुढाकार घ्यावा.

गोदाकाठी स्वच्छता अभियानाच्या सुरुवातीस गोदावरी प्रार्थनेचे सामूहिक गायन केले गेले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुरेखा बो-हाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. राजेंद्र डोखळे यांनी केले. या स्वच्छता अभियानामध्ये समाजकार्य महावद्यालयाच्या शंभर विद्यार्थ्यांनी आणि सहभागी व्यक्तींनी गोदाकाठावरील रामकुंड, फुलबाजार, भाजी बाजार या भागात स्वच्छता केली. या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नाशिकचे सचिव डॉ. अशोक पिंगळे, प्राध्यापिका डॉ. बैरागी, श्री. अशोक बो-हाडे जिल्हा केंद्राचे व्यवस्थापक श्री. गणेश ढगे उपस्थित होते.

## १०.३ जिल्हा केंद्र, औरंगाबाद ( छत्रपती संभाजी नगर )

- **चित्रपट चावडी**

प्रसिद्ध दिग्दर्शक राओबा गजमल दिग्दर्शित दुपारची शाळा हा सिनेमा मे महिन्याच्या चित्रपट चावडीत दाखविण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने या सिनेमाचे प्रदर्शन बुधवार, दि. ३१ मे २०२३ रोजी सायंकाळी सहा वाजता चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम कॅम्पस, औरंगाबाद येथे संपन्न झाला. सिनेरसिकांनी नेहमीप्रमाणे या चावडीला मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.

दि. २३ जून २०२३ रोजी, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम यूनिवर्सिटीचे एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात ‘भाई का बथडे’ हा लघुपट आणि ‘कडूबाई’ या महितीपटचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. वाड्या-वस्त्यांवर जाऊन बाबासाहेबांचे विचार आपण गाण्यातून लोकांपर्यंत पोहचवले. बाबासाहेब नसते तर माझं आयुष्य आणि गाणं हे

संघर्षात बदलले नसते. माझ्या आयुष्यावर बनवलेला हा महितीपट माझ्या संघर्षाचा प्रवास आहे. असे विचार लोकगायिका कडूबाई खरात यांनी व्यक्त केले. या वेळी विद्यापीठाचे कुलपती तथा सेंटरचे अध्यक्ष अंकुशरव कदम, दिग्दर्शक उमेश घेवरीकर, नीलेश राऊत, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, विभागप्रमुख शिव कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

दि. २८ जून २०२३ रोजी, आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला बुधवारी दास्तान - ए – रामजीचे आयोजन करण्यात आले. उर्दूमधील दास्तान वाचल्या होत्या, अनुभवल्या होत्या आणि त्यामध्ये रंगून गेलो होतो. आज प्रत्यक्षात अक्षय शिंपी व नेहा कुलकर्णी यांच्या अभिनयातून ही दास्तान अनुभवायला मिळाली, याचा मनस्वी आनंद झाल्याची भावना गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी या वेळी व्यक्त केली.

अक्षय शिंपी यांच्या एकल कथा आणि तदनुषंगिक अभंगांचे मिश्रण असलेला 'दास्तान - ए - रामजी' हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्या वतीने आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात यशस्वीपणे संपन्न झाला. या वेळी श्री.पांचाळे बोलत होते.

या वेळी चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, विशेष पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण, नीलेश राऊत, एम.जी.एम.रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, डॉ.आनंद निकाळजे,शिव कदम, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव व सर्व संबंधित उपस्थित होते.

श्री.पांचाळे म्हणाले, या दास्तानचे विशुद्ध आणि मनोज्ञ रूप असे होते की आपला श्वासही आपल्याला ऐकू येत होता. अतिशय सुंदरपणे हे सादरीकरण अक्षय शिंपी आणि नेहा कुलकर्णी यांनी केलेले आहे. माझी भावना व्यक्त करीत असताना मला एक शेर आठवला तो असा की, " देख ना सकते थे तो दरिया भी था कतरा, आंख खुली तो कतरा भी दरिया नजर आया"

दास्तानगोई हा उर्दूमधील पारंपरिक कथाकथनाचा प्रकार मराठीत आणण्याच्या आमच्या प्रयोगाला छत्रपती संभाजीनगरकरांनी उपस्थित राहत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, त्याबद्दल सर्वप्रथम आपले आभार मानतो. हा प्रयोग अगदी घरापासून, शेती, व्याख्यानमाला ते सुसज्ज सभागृहात सादर करता येतो. आज रसिक श्रोत्यांनी दास्तानला उपस्थित राहत याचा आनंद घेतला. आता ही दास्तान तुमची झाली, असे श्री. शिंपी या वेळी म्हणाले.

दास्तानगोई हा उर्दूमधील पारंपरिक कथाकथनाचा प्रकार एकाच विषयाच्या धाग्यात विणलेले छोटे-छोटे किस्से, कथा, कविता असलेल्या 'दास्तान-ए-बडी बांका' या पहिल्या कार्यक्रमाद्वारे दास्तानगोई हा प्रकार अक्षय शिंपी यांनी मराठीत आणला. अक्षय शिंपी हे गेली अनेक वर्षे अभिनय आणि साहित्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत.

- Singing in the Rain हा पाऊस आणि सिनेमाचे बॅकग्राऊंड असलेला रोमँटिक आणि कॉमेडी सिनेमा दि. २२ जुलै २०२३ रोजी चित्रपट चावडीत दाखविण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने या सिनेमाचे प्रदर्शन शनिवार, दि. २२ जुलै २०२३ रोजी सायंकाळी सहा वाजता चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम कॅम्पस, औरंगाबाद येथे संपन्न झाला. सिनेरसिकांनी नेहमीप्रमाणे या चावडीला मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.

- **चित्रपट चावडी**

'Capernaum' हा आईवडील निष्काळजीपणे वागले त्यामुळे मला खडतर आयुष्य जगावे लागत आहे. त्यामुळे १ २ वर्षांचा मुलगा त्यांच्या खटला भरू पाहतो या आशयाचा सिनेमा सप्टेंबर महिन्याच्या चित्रपट चावडीत दाखविण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस्यांच्या संयुक्त विद्यमाने या सिनेमाचे प्रदर्शन शनिवार, दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी सहा वाजता चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम कॅम्पस, औरंगाबाद येथे संपन्न झाला. सिनेरसिकांनी नेहमीप्रमाणे या चावडीला मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.

- **रिंगण २०२३ चा संत परिसा भागवत विशेषांकाचे प्रकाशन**

यशवंतराव चव्हाण सेंटर - जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुंबई येथून प्रकाशित होणा 'या सचिन परब संपादित 'रिंगण" या वार्षिकांकाचा प्रकाशन सोहळा सोमवार, दि. २४ जुलै २०२३ रोजी सायं. ५ वा. आइन्स्टाइन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम कॅम्पस, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आला. संत परिसा भागवत यांच्यावर यंदाचा विशेषांक आहे. महाराष्ट्रधर्माला ललामभूत ठरणाऱ्या महात्म्याच्या कर्तृत्वाचा समग्र वेध घेणारा यंदाचा विशेषांक आहे.

प्रसिद्ध कवी प्रा. दासू वैद्य यांच्या हस्ते अंकाचे प्रकाशन झाले. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. रिंगण अंकाचे संपादक सचिन परब व समीक्षक डॉ. कैलास अंभुरे यांची या प्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

'रिंगण' अंकाचे यंदाचे अकरावे वर्ष असून दरवर्षी संतपरंपरेतील एका संतावर हा विशेषांक आषाढी एकादशीच्या निमित्ताने प्रकाशित होणारा महाराष्ट्रातील एकमेव प्रयोग आहे. या अंकात केवळ संतांच्या अभंगांचे व विचारांचे निरूपण नसून, संतांनी मांडलेला विचार आजच्या काळातही कसा लागू आहे याबद्दलची मांडणी, तसेच मुक्त पत्रकारांनी या संतांच्या जन्म व कार्यस्थळांवर जाऊन तयार केलेले रिपोर्ताज आदी बाबींवर आधारित लेख प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

- **शिक्षण कट्टा**

दि. ३ ऑगस्ट २०२३ रोजी, 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान' या विषयावर नवीन शैक्षणिक धोरण -२०२० च्या संदर्भाने चर्चाचे आयोजन शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान' या विषयावर नवीन शैक्षणिक धोरण - २०२० च्या संदर्भाने या विषयावर शैक्षणिक कट्ट्याचे आयोजन करण्यात आले आहे. शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान ' या विषयावर नवीन शैक्षणिक धोरण-२०२० च्या संदर्भाने एम.जी.एम. विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे साहाय्यक प्राध्यापक आणि भारतीय संविधानाचे अभ्यासक प्रा. डॉ. ह.नि.सोनकांबळे यांनी मांडणी केली.

भारताचे सजग नागरिक घडविण्याचे काम शालेय शिक्षणातून होत असते. अभ्यासक्रमातील विविध विषयांतून संविधानिक मूल्ये शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये रुजवित असतात. ही रुजवणूक होत असताना नवीन शैक्षणिक धोरण-२०२० च्या संदर्भाने कोणकोणत्या घटकांकडे जागरूकपणे लक्ष दिले पाहिजे. या संदर्भातील चर्चा घडवून आणण्यासाठी या शिक्षण कट्ट्याचे आयोजन करण्यात आले होते. या कट्ट्यावर शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, पत्रकार, पालक यांनी मोठी गर्दी केली होती.

- **ना. धों.महानोर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'पक्षी दूर देशी गेलं' या काव्य आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन पद्मविभूषण खा.शरदचंद्रजी पवार यांची प्रमुख उपस्थिती.**

मराठी साहित्यातील महान कवी व गीतकार, पद्मश्री ना. धों. महानोर यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. महानोर यांच्या कविता आणि गीतांनी संपूर्ण मराठी मनांना मागील पाच दशके मंत्रमुग्ध केले. महानोर यांची जन्मभूमी व कर्मभूमी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा. त्यांच्या स्मृतींना आदरांजली देण्यासाठी 'पक्षी दूर देशी गेलं' या काव्य आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास देशाचे माजी कृषिमंत्री व महानोर यांचे जवळचे स्नेही पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात पद्मश्री ना.धों.महानोर यांच्या कविता व गीतांचे सादरीकरण करण्यात आले. प्रसिद्ध कवी दासू वैद्य, प्रकाश होळकर (लासलगाव), संजीवनी तडेगावकर (जालना) व शिव कदम यांनी महानोर यांच्या कवितांचे वाचन केले. तर प्रसिद्ध गायक राहुल खरे व मालविका दीक्षित (पुणे) यांनी महानोर यांनी रचलेल्या गीतांचे गायन केले. कार्यक्रमाचे निवेदन समाधान इंगळे यांनी केले.

- **हौशी छायाचित्रकारांचे दोन दिवसीय छायाचित्र प्रदर्शन**

दि. २० आणि २१ ऑगस्ट २०२३ रोजी छत्रपती सांभाजीनगर शहरातील हौशी छायाचित्रकारांनी काढलेल्या छायाचित्रांचे दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन दिग्दर्शक शिव कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुबोध जाधव, कलर्स ऑफ सांभाजीनगर चे पदाधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. ५० हौशी छायाचित्रकारांची काही निवडक छयाचित्रे या वेळी प्रदर्शनात मांडण्यात आली. रसिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.

- **चक्र या दीर्घांकाच्या नाट्य अभिवाचन कार्यक्रम**

यशवंतराव चव्हाण सेंटर - जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आणि एम जी एम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्‌स यांच्या संयुक्त विद्यमाने चक्र या दीर्घांकाचे नाट्य अभिवाचन कार्यक्रमाचे रविवार, दि. २४ सप्टेंबर २०२३ रोजी सायं. ६.३० वा. व्ही शांताराम प्रेक्षागृह, एम जी एम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्‌स, एमजीएम कॅम्पस, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेले होते.

विद्याधर पुंडलिकांनी लिहिलेल्या या दीर्घांकाचं वैशिष्ट्य म्हणजे मानवी संस्कृतीसमोर उभ्या असलेल्या प्रश्नांचा त्यांनी खोलवर घेतलेला वेध आणि अत्यंत समर्थ व्यक्तिरेखाटन. धर्मानुसार कर्म करण्यातच जीवनाची इतिकर्तव्यता मानणारा भीम, युद्धाचा अंतिम बळी असणारा, मानवी चिरवेदनेचे प्रतीक असणारा अश्वत्थामा आणि सुडाची भावना शांत झाल्यानंतर मातेच्या हृदयानं या भयानक संहाराकडे पाहणारी द्रौपदी या व्यक्तिरेखा कायम

स्मरणात राहतील अशाच होत्या. या दीर्घांकाचे अनुया दळवी यांनी अनुवाद केले असून अजित दळवी यांनी दिग्दर्शित केला आहे. तर माधुरी दातार, वसंत दातार, सुधीर मोघे आणि अनुया दळवी या अनुभवी कलाकारांनी हा दीर्घांक सादर केला.

- **यशवंतराव चव्हाण यांची ३९ वी पुण्यतिथी**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ३९ व्या पुण्यतिथिनिमित्त "२०२४ चा दुष्काळ : मराठवाड्याचा पाणीप्रश्न" या विषयावर मराठवाडा पाणीप्रश्न जन आंदोलन समितीचे नेते आ. राजेश टोपे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या काही वर्षांपासून मराठवाड्यातील माणूस पिचला असल्याने या विषयाच्या अनुषंगाने विस्ताराने मांडणी श्री राजेश टोपे यांनी केली. त्यांनी जायकवाडीच्या समन्यायी पाणी वाटपासाठी येथील जनतेने एकत्र येण्याची गरज असल्याची सांगितले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. अंकुशराव कदम यांची उपस्थिती होती.

- **नववा अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल**

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या आठव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे बुधवार, दि. ०३ ते रविवार, दि. ०७ जानेवारी २०२४ यादरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल, औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्‌घाटन प्रख्यात दिग्दर्शक आर. बाल्की यांनी केले.

नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र औरंगाबाद प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने झाला असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळाले होते. एनएफडीसी, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती होती. नाथ स्कूल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी (एनएसबीटी), अभ्युदय फाउंडेशन हे या महोत्सवाचे सहआयोजक होते. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे नॉलेज पार्टनर होते.

प्रसिद्ध पटकथा लेखक, कवी, गीतकार पद्मभूषण जावेद अख्तर यांचा, महोत्सव समितीतर्फे संयोजक अंकुशराव कदम आणि नंदकिशोर कागलीवाल यांच्या हस्ते पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. महोत्सवाच्या पाच दिवसात सुमारे पाच हजार सिनेरसिकांनी हजेरी लावली.

- **'अनवट शांताबाई' या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटर, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय व मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाउंडेशन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवयित्री व लेखिका दिवंगत शांताबाई शेळके यांचा लेखन प्रवास उलगडणाऱ्या 'अनवट शांताबाई' या विशेष सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दि. २७ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता आईन्स्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे सदरील कार्यक्रम संपन्न झाला.

शांता शेळके यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने या कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आलेली होती. शांताबाईंचे जगणे आणि त्यांची कविता यांचा अनुबंध शांताबाईंच्याच शब्दांतून मांडला गेला. शांताबाईंचे 'धुळपाटी व संस्मरणे' हे आत्मचरित्रपर लेखन आणि त्यांच्या कविता या कार्यक्रमात सादर केल्या गेल्या. कार्यक्रमाची संहितालेखन डॉ.वंदना बोकिल-कुलकर्णी यांनी केली होती. त्यांच्यासह अनुराधा जोशी, गौरी देशपांडे आणि दीपाली दातार यांनीदेखील सादरीकरण केले. त्यांना व्हायोलिनची साथ अनुप कुलथे यांनी दिली.

- **अभिसरण उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांसाठी 'मराठवाडा समजून घेताना' या विषयावर प्रा. प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यानाचे आयोजन**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दि. २७ जानेवारी ते दि. ६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान 'मराठवाडा ते कोकण" असे अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मारठवड्यातील सुमारे ३० मुले आणि २० मुलींनी सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्रातील युवकांनी आपापला भूभाग सोडून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात जाऊन तेथील माहितीच नव्हे तर तेथील भौगोलिक रचना, कृषिअभ्यास, पारंपरिक व्यवसाय, उद्योगधंदे, जीवनमान, खाद्य संस्कृति, आचार-विचार, मायबोली, व्यवहार या सर्व गोष्टींचे आदानप्रदान करण्याची जाणीव प्रक्रिया म्हणजे अभिसरण उपक्रम होय याच अनुषंगाने उपक्रमाच्या पहिल्या दिवशी सदर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते.

- **शिक्षण कट्ट्याचे आयोजन**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर च्यावतीने "कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि शालेय शिक्षण" या विषयावर गुरुवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता शिक्षणकट्टयाचे आयोजन आइन्स्टाईन सभागृह, एम.जी.एम. परिसर, छत्रपती संभाजीनगर. येथे करण्यात आले होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे. संगणक माणसासारखा विचार करू शकतील का..? यातूनच कृत्रिम बुद्धिमत्ता या शाखेचा उदय झाला. कृत्रिम बुद्धिमत्तेतील वेगवेगळ्या क्षमतांचा वापर समाजजीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रात आज सुरू झाला आहे. शालेय शिक्षणातही त्याचा प्रचार, प्रसार सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेची रूजवणूक होत असताना कोणकोणत्या घटकांकडे जागरूकपणे लक्ष दिले पाहिजे, त्याचे परिणाम शालेय शिक्षणावर कसे होतील? या संदर्भातील चर्चा शिक्षण कट्टयावर करण्यात आली. या शिक्षण कट्ट्याला मार्गदर्शन करण्यासाठी Artificial Intelligence या विषयावरील तज्ज्ञ ऋषिकेश डोणगावकर पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे हे होते.

- **'घटनेच्या चौकटीतून पक्षांतर बंदी कायद्याचं बदलतं रूप' या विषयावर ॲड.सिद्धार्थ शिंदे यांच्या व्याख्यानाचे आयोजन**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त मा.ॲड.सिद्धार्थ शिंदे (ज्येष्ठ विधिज्ञ, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली) यांचे 'घटनेच्या चौकटीतून पक्षांतर बंदी

कायद्याचं बदलतं रूप' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात व देशात अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने आमदारांचे पक्षांतर अनुभवास आलेले आहे. सर्वोच्च न्यायालयात संदर्भात अनेक खटले सध्या सुरू आहे. या सर्वांच्या केंद्रस्थानी असलेल्या पक्षांतर बंदी कायद्यात नेमकं काय मांडण्यात आलेले आहे व सध्याची कायदेशीर प्रक्रिया या संदर्भात अॅड. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. अंकुशराव कदम (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर,जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर) तर एम जी एम विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.विलास सपकाळ यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

- **'तुजी औकात काये ?" या नाट्य प्रयोगाचे आयोजन**

राज्यभर गाजत असलेल्या देवदासींच्या वंशात जन्मलेल्या वेदिकाची, तिच्या अस्तित्वासाठी तिने दिलेल्या लढ्यावर आधारित 'तुजी औकात काये ?' या नाट्य प्रयोगाचे यशवंतराव चव्हाण सेंटर - जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर, महात्मा गांधी मिशन व मराठवाडा आर्ट कल्चर ॲण्ड फिल्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २२ जून २०२४ रोजी सायं. ७ वाजता रूक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर येथे आयोजन करण्यात आले होते.

देवदासीसारख्या अनिष्ट, बुरसटलेल्या दोनशे वर्ष जुन्या कुप्रथे विरोधात एका वेगळ्या पद्धतीने यात मांडणी केली होती. प्रसिध्द लेखिका वेदिका कुमारस्वामी यांच्या गावनवरी या पुस्तकावर आधारित आहे. राज्यभरात या नाटकाचे अनेक प्रयोग सादर झालेले असून रसिकांच्या पसंतीस उतरलेला हा प्रयोग आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात पहिल्यांदाच हा प्रयोग आयोजित करण्यात आले होते.

नाट्यरसिकांनी या प्रयोगास मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या वेळी केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सल्लागार नंदकिशोर कागलीवाल, सचिन मुळे, नीलेश राऊत, डॉ.आनंद निकाळजे, दासू वैद्य, डॉ.रेखा शेळके, प्रेरणा दळवी, सुहास तेंडुलकर, नीना निकाळजे, शिव कदम, डॉ.कैलास अंभुरे, सुबोध जाधव, गणेश घुले, डॉ.संदीप शिसोदे, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे आदींची उपस्थिती होती.

## १०.४ जिल्हा केंद्र, अंबाजोगाई

- सामाजिक न्याय व आधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अंबाजोगाई, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बीड व महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, साहित्य व साधनांसाठी नोंदणी व तपासणी शिबीर अंबाजोगाई येथील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन कार्यालय येथे घेण्यात आले.

या शिबिर मध्ये मतिमंद, कर्णबधिर, अस्थिव्यंग, अंध अशा विविध व्यक्तींची नोंदणी व तपासणी करण्यात आल्या. अंबाजोगाई तालुक्यातील एकुण तपासणी साठी ५६० दिव्यांग आले होते. त्यापैकी ४०४ दिव्यांग व्यक्ती तपासणीसाठी पात्र ठरले. या शिबराचे उद्घाटन स्वा.रा.ती वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. मुकंद मोगरीकर सर यांच्या शुभहस्ते व वैद्यकीय अधिक्षक डॉ. राकेश जाधव सर, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक व यशवंतराव चव्हाण सेंटर बीड जिल्हा चे सचिव डॉ. नरेंद्र काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ नागेश अब्दागीरे यांच्या उपस्थितीत झाले.

● श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेमध्ये आयोजित तीन दिवसीय नाट्यमहोत्सवामध्ये ५ मार्च २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बीड यांच्या वतीने अमृत महाजन लिखित व दिग्दर्शित दोन अंकी नाटक 'मुळांच्या तळाशी' हे सादर करण्यात आले.

अमृत महाजन, नामदेव गुंडाळे, अभिजित जोंधळे, पूजा कुलकर्णी व संकेत तोरंबेकर या सर्व कलाकारांनी उत्कृष्ट अभिनय केला. मन आणि बुद्धी यांचा संवाद, मनाची अस्वस्थता, चंचलता, बुद्धीचे चातुर्य आणि हतबलता अतिशय समर्थपणे मांडली गेली.

● सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बीड, समाज कल्याण विभाग, बीड जिल्हा, दिव्यांग पुनर्वसन केंद्र, बीड व महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना एडिप योजने अंतर्गत कृत्रिम अवयव व साधनांचे मोफत वाटप जिल्हाधिकारी सौ. दिपा मुधोळ मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्या वेळी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई चे अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे सर, मानवलोक चे कार्यवाह अनिकेत लोहिया, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. यादव साहेब, उपविभागीय अधिकारी श्री. शरद झाडके, महात्मा गांधी सेवा संघाचे अध्यक्ष श्री. विजय कान्हेकर, द्यकीय अधिक्षक डॉ. राकेश जाधव, यशवंतराव चव्हाण सेंटर बीड चे सचिव तथा जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र बीड चे समन्वयक डॉ. नरेंद्र काळे, डॉ. सिध्देश्वर बिराजदार, डॉ. कचरे सर इ. उपस्थित होते.

### १०.५ जिल्हा केंद्र, नांदेड

● आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तथा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची ११० वी जयंती जिल्हा केंद्र नांदेड येथे साजरी करण्यात आली. या प्रसंगी बिलोलीचे माजी नगराध्यक्ष सुभाषराव पवार, केशवराव वडजे, मनोहर बसवंते, शिवाजीराव अंबुलगेकर, प्रा. डॉ. श्रीराम गव्हाणे, माधवराव माधसवाड, नरसिंग आठवले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र नांदेड यांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय भीमगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या गीतगायन स्पर्धेत राज्यभरातून १५६ गायकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ३०००/- रोख, द्वितीय पारितोषिक २०००/- रोख तर तृतीय पारितोषिक १०००/- रोख अशा स्वरूपात ठेवण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्राचे सचिव शिवाजी गावंडे, संचालक नरसिंग आठवले आणि अजय झरकर यांनी परिश्रम घेतले.

● यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नांदेड, अभंग पुस्तकालय आणि परिवर्तन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'परिवर्तन महोत्सव' आयोजित करण्यात आला. या प्रसंगी ज्ञानपीठ विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक वसंत आबाजी डहाके, रंगनाथ पठारे, कवयत्री सुमती लांडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. दत्ता भगत, लेखक शेषराव मोहिते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवात गाजलेले 'नली' नाटक व अमृता साहीर इमरोजची दोन नाटके सदर करण्यात आली. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी कवीचा सन्मान का करावा ? यावर आपल्या शैलीत मनोगत व्यक्त केले नांदेड परिसरातील रसिक व जाणती मंडळी या महोत्सवास उपस्थित होती.

शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नांदेड यांच्यावतीने 'शालेय शिक्षण आणि भारतीय संविधान' या विषयावर 'शिक्षण कट्टा' आयोजित करण्यात आला. या शिक्षण कट्ट्याला मार्गदर्शन करण्यासाठी प्रा. डॉ. अनंत राऊत हे उपस्थित होते. या वेळी डॉ. राऊत बोलताना म्हणाले की "संविधान संस्कृती रुजणे आणि संविधान महोत्सव निर्माण होणे, गरजेचे आहे"

या प्रसंगी व्यासपीठावर दत्ता तुमवाड, जिल्हा केंद्राच्या सदस्या ॲड. कल्पनाताई डोंगळीकर, माधव माधसवाड, मनोहर बसवंते, ओंकार पाटील, प्रा. नामदेव दळवी आणि शिवाजी गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

- यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नांदेड यांच्या वतीने 'रिंगण' संत परिसा भागवत विशेषांकाचे प्रकाशन खासदार हेमंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी हेमंत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्रातील संतांनी मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करुन देशासमोर आदर्श उभा केलेला आहे. त्यामुळे आपल्या भूमीस संतांची भूमी म्हटले जाते. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने रिंगणचे होऊ घातलेले प्रकाशन माझ्यासाठी मोठा बहुमान असल्याची भावना याप्रसंगी रिंगणचे संपादक सचिन परब यांनी व्यक्त केली. गेल्या पंधरा वर्षापासून राज्याला समृद्ध करणाऱ्या वेगवेगळ्या संताच्या कार्यावर प्रकाश टाकणारा रिंगण विशेषांक संत साहित्याचा 'संदर्भ ग्रंथ' म्हणून नावारूपाला आल्याखेरीज राहणार नाही, अशी भावना दत्ता बाळसराफ यांनी व्यक्त केली.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, राज्य समन्वयक निलेश राऊत, रिंगणचे संपादक सचिन परब, गोदावरी उद्योग समूहाच्या अध्यक्षा राजश्री पाटील, व्यंकटेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

- **युथ वेलबींग**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने युथ वेलबींग अंतर्गत 'युवा नेतृत्व विकास कार्यशाळा' याचे आयोजन दि. २१ जुलै रोजी जिल्हा केंद्र नांदेड येथे करण्यात आले. नांदेड येथील १५ महाविद्यालयातून ३० युवांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेत स्वत:ला समजून घेणे, स्वत:च्या क्षमतांची जाणीव, सर्वांगीण विचार आणि त्याचे महत्व, गटकार्य आणि समाज यांसारख्या विविध विषयांवर सत्रे आयोजित करण्यात आली. या प्रसंगी जिल्हा केंद्र नांदेडचे सचिव शिवाजी गावंडे, संदेश लाळगे, प्रा. संदीप देशमुख, जगन शेळके, शिवाजी अंबुलगेकर, निळोबा जाधव, माधव माधसावाड, संदीप देशमुख मनोहर बसवंते, ओमकार पाटील उपस्थित होते.

- जागतिक कीर्तीचे छायाचित्रकार, लेखक व दिग्दर्शक संदेश भंडारे यांच्या वारी व तमाशा या महाराष्ट्रातील दोन परंपराशी निगडित असलेल्या अनोख्या व सर्वत्र वाहवा मिळविलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नांदेड वतीने आयोजित करण्यात आले असून या वेळी साहित्यिक शिवा आंबुलगेकर यांनी छायाचित्रकार संदेश भंडारे यांच्याशी मुक्त संवाद साधला.

सर्जनशील छायाचित्रकार म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या संदेश भंडारे यांची वारी, तमाशा असाही एक महाराष्ट्र अशी प्रकाशचित्रे प्रसिद्ध आहेत. सोबतच आदिवासी जीवनावर आधारित 'म्हादू' या चित्रपटाचे लेखन वा दिग्दर्शनही भंडारे यांनी केले आहे.

## १०.६ जिल्हा केंद्र, ठाणे

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र ठाणे आणि मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण साहेबांनी वेणूताईंना लिहिलेल्या 'पत्रांचे अभिवाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. वसुधा सहस्रबुध्दे आणि मकरंद सावंत यांनी पत्रांचे अभिवाचन केले. या वेळी जवळपास १० ते १२ पत्रांचे अभिवाचन करण्यात आले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र ठाणे आणि वायरर्ड एक्स्प्रेशन, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने 'वादळवाट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री. गणराज व डॉ. अर्चना जैन या दांपत्याने 'पाणवठा' या संस्थेच्या माध्यमातून अपंग झालेले पक्षी, प्राणी, वन्यप्राणी, जलचर प्राणी यांच्यासाठी निवारा उभा केला आहे. या दांपत्याने त्यांची जीवनकहाणी या मुलाखतीच्या माध्यमातून उलगडून दाखवली.

  या प्रसंगी ठाणे जिल्हा केंद्राचे अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले, सचिव अमोल नाले, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनंत देशमुख, पक्षी व प्राणी प्रेमी तसेच रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थचे सदस्य व पत्रकार उपस्थित होते.

## १०.७ जिल्हा केंद्र, नवी मुंबई

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र नवी मुंबई यांच्या वतीने कृतज्ञता पुरस्कार आणि ज्येष्ठ नागरीकांसाठी शोध आनंदी जीवनाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जेष्ठ कलाकार श्रीप्रकाश सप्रे यांनी सप्रेम नमस्कार हा एकपात्री प्रयोग या वेळी केला.

- यशवंतराव चव्हाण सेंटरच्या महिला विभाग अंतर्गत 'महिलांचे हक्क व अधिकार' या विषयावर जनजागृतीपर सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर होत्या. या प्रसंगी आमदार शशिकांत शिंदे, ऋता आव्हाड, वैशाली शिंदे, मॉडर्न कॉलेजच्या प्रिन्सिपॉल शुभदा नायक, चंद्रकांत पाटील, चव्हाण सेंटरच्या तेजस्विनी अधिकारी, रुपाली वाघुंडे, यशस्विनी समन्वयक मनीषा देसाई उपस्थित होते.

- **कर्करोग नियंत्रण व प्रतिबंध परिचर्चा - घाटकोपर**

  यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन व प्रथम संस्था यांच्या विशेष सहकार्याने कर्करोग नियंत्रण व प्रतिबंध परिचर्चा घाटकोपर येथे आयोजित करण्यात आली. कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनच्या एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर नीता मोरे आणि. असिस्टंट डायरेक्टर मीनल परब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

  कर्करोग हा गंभीर आजार आहे आणि आजही जनमाणसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरूकता नाही. या

आजाराबद्दल अधिकाधिक जागरूकता निर्माण व्हावी, या. उद्देशाने या परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. ७५ पेक्षा अधिक पालक उपस्थित होते.

- **कर्करोग नियंत्रण व प्रतिबंध परिचर्चा वाशी**

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन व प्रथम संस्था यांच्या विशेष सहकार्याने कर्करोग नियंत्रण व प्रतिबंध परिचर्चा वाशी नाका येथे आयोजित करण्यात आली. कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनच्या एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर नीता मोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कर्करोग हा गंभीर आजार आहे आणि आजही जनमाणसात कर्करोगाबद्दल हवी तशी जागरूकता नाही. या आजाराबद्दल अधिकाधिक जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. ४० पेक्षा अधिक पालक उपस्थित होते.

- नवी मुंबई कार्यक्षेत्रातील अन्वय व्यसन मुक्ती केंद्र, सीबीडी बेलापूर, के. गो. लिमये वाचनालय, पनवेल आणि चाईल्ड रिॲक्ट फाऊंडेशन, नेरुळ या तीन संस्थाना अनुक्रमे व्यसन मुक्ती जागृती, वाचन संस्कृती व दिव्यांग सेवा यामधील कामासाठी कृतज्ञता पुरस्कार २०२४ केंद्रातर्फे प्रदान करण्यात आला. तसेच याशिवाय १० विविध व्यक्तींना सुलेखन, कला, माहिती तंत्रज्ञान वैद्यकीय सेवा, साहित्य, नाटयसेवा, ॲथलेटिक्स, पर्यावरण, क्रीडा व समाजसेवा यातील भरीव कामगिरीसाठी केंद्रातर्फे कृतज्ञता पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

हे पुरस्कार नवी मुंबई महानगर पालिका सहआयुक्त सौ. सुजाता ढोले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यानंतर राहुरी कृषी विद्यापिठाचे प्राध्यापक व नामवंत वक्ते श्री. जितेंद्र मेटकर यांचे 'पसायदान एक विश्व प्रार्थना' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

## १०.८ जिल्हा केंद्र, धाराशिव (उस्मानाबाद)

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र धाराशिवच्या 'मोफत सुपर स्पेशलिटी महाआरोग्य तपासणी शिबिर, भव्य रक्तदान शिबीर, डोळ्यांची तपासणी शिबिर' आयोजित केले. या शिबिरामध्ये कळंबकर व कळंब परिसरातील लोकांनी अतिशय उत्कृष्ट असा प्रतिसाद दिला आहे. ४२९ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. १२५ रुग्णांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करण्यात आली. हाडाचे १५० रुग्ण तपासण्यात आले, हृदयविकार व मधुमेहाचे १०० रुग्ण तपासण्यात आले.

सुपर स्पेशलिटीमध्ये डायलिसिस च्या १५ रुग्णांची तपासणी करुन त्यावर उपचार करण्यात आले. तसेच मेंदूच्या विकाराचे १७ पेशेंट व किडनी विकाराचे २२ पेशेंट तपासण्यात आले व त्यांना उपचार देण्यात आले त्याचबरोबर रक्तदान शिबिरमधे २२ लोकांनी रक्तदान केले.

- **राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य (व्याख्यान)**

सामाजिक न्यायदिनाचे औचित्य साधून २६ जून २०२३ रोजी व्याख्यानाचे आयोजन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इंग्रजी विषयाचे अभ्यासक व सामाजिक विचारवंत

प्रा. डॉ. गोविंद कोकणे यांचे वरील विषयावर व्याख्यान झाले. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, ५० टक्के आरक्षण, शिक्षणाला महत्व, या बाबींना महत्त्व दिले. तर स्त्रियावर अन्याय करणाऱ्यां जातीयवाद्यांना विरोध केला शाहू महाराजांनी जहाल-मावाळ अशा विचारधारेपेक्षा बहुजनांची विचारधारा योग्य मानली. प्रा. कोकणे शेवटी म्हणाले की, शाहू महाराज हे समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा विरूद्ध असंतोषाचे निर्मितीचे जनक होते. सत्यशोधक समाज किंवा 'मुकनायक' यांना मदत केली. असे विचार मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवनराव गोरे म्हणजे शाहू महाराज हे सामाजिक कार्याची प्रेरणा देणारे जनक होते. निजामाच्या कार्यपद्धतीचा विचार करता मराठवाड्यातील लोकांना शाहू महाराजांचे कार्य खूप महत्त्वाचे वाटते. तेच कार्य यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर करत असतानाचाही उल्लेख जीवनराव गोरे साहेबांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश दापके यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सोमनाथ लांडगे यांनी केले आभार प्रा. जमाले यांनी मानले. कार्यक्रमास समाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील लोक हजर होते.

- **शैक्षणिक चर्चा सत्र**

**विषय :- राष्ट्रिय शैक्षणिक धोरण २०२० : भविष्यकाळालीन शिक्षणाची दिशा - डॉ. महेश कळलावे.**

या विषयावर प्रमुख वक्ते व शिक्षण तत्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव याचेबीज भाषण झाले. त्यांनी नवे शैक्षणिक धोरण बदलत्या काळाची गरज पूर्ण करणारे असून शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक स्तरावर अत्यंत कार्यक्षमतेने त्यांची अमंलबाजावणी होणे गरजेचे /९आहे. असे सांगून त्यातील अनेक तांत्रिक मुद्दयावर चर्चा केली.

हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठिान व बिल गेट्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने झाला. पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. ए. एम. रिझवी यांनी दिला. प्रास्ताविक प्राचार्य रमेश दापके यांनी केली या चर्चासत्रात डॉ.ए.एम. देशमुख (अध्यक्ष, मायकोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडिया) प्राचार्य डॉ. जे.एस. देशमुख, डॉ.डी.आर. घोलकर इ. यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवनरावजी गोरे यांनी ही नव्या शैक्षणिक धोरणातील गुणात्मक बाबींची अत्यंत प्रभावीपणे अमंलबाजवणी झाली पाहिजे. तर पुढच्या स्पर्धेच्या काळात भारतीय युवक यशस्वी होईल असे सांगितले. हे चर्चासत्र दोन सत्रात संपन्न झाले. श्री बालाजी तांबे यांनी अभार व्यक्त केले.

- **नवीन शैक्षणिक धोरण - २०२० तिसरे चर्चासत्र**

चव्हाण सेंटरचे अध्यक्ष जीवनराव गोरे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.प्रा.डॉ. अंकुशराव कदम (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - व्यवस्थापन परिषद सदस्य ) प्रा.डॉ. प्रशांत दिक्षित प्र. संचालक विद्यापीठ उप-परिसर, धाराशिव) डॉ. ए.एम रिझवी (प्राचार्य-बील गेट्स कॉलेज) प्रा. डॉ. जीवन पवार (आर.पी. कॉलेज, धाराशिव) प्राचार्य जे.एस. देशमुख यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील उपयुक्त गोष्टींचा ऊहापोह केला व बदलत्या काळाची आव्हाने पेलण्याची क्षमता या धोरणात असून प्रभावी अमलबजावणीतून ते शक्य होईल असे सांगितले. प्रास्ताविक चव्हाण सेंटरचे सचिव डॉ. रमेश दापके यांनी केले. शिक्षणप्रेमींनी या चर्चासत्रात भाग घेतला.

- **'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर युवक - युवती समोर व्याख्यान**

यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर व सह्याद्री नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने दैनिक लोकसत्ता व दैनिक संचार हे जिल्हा प्रतिनिधी समाजिक व पुरोगामी विचारवंत श्री रविंद्र केसकर यांचे 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण परिणामकारक व्याख्यान झाले. विषयाची मुद्देसूद मांडणी, संवादात्मक विश्लेषण, साहित्य व काव्याच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन ऐकणा-यांच्या मनावर बिंबण्याचे काम अत्यंत प्रभावीपणे झाले. हा कार्यक्रम जागृती व स्फूर्ती देणारा ठरला याबाबत प्रतिनिधिक स्वरूपाच्या प्रतिक्रिया मिळाल्या.

- विषयाची उपयुक्तता व श्रोत्यांची परिपक्वता दिसून आली. - एक शिक्षिका
- व्याख्यानातून वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या जाणिवा मनात घर करून बसल्या - एक संगणक विद्यार्थी
- अंतर्दृष्टी देणारा, अंतर्मुख करणारा विचार मिळाला. - एक संशोधक
- मला खूप पटला माझ्या दृष्टिकोनाला वैज्ञानिक पार्श्वभूमी मिळाली. - एक संगणक अभ्यासक.

पुराव्याशिवाय, सत्याशिवाय कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहचू नये असा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट झाला.- एक नर्सिंगची विद्यार्थिनी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश दापके यांनी केले अध्यक्ष चिकित्सक अभ्यासक मु.अ. एम. डी. देशमुख होते. प्राचार्य जे.एस. देशमुख, डॉ. तब्सूम सय्यद, सौ. सुरेखा जगदाळे व मोठ्या प्रमाणावर युवक-युवती उपस्थित होत्या.

- **कुटुंबसौख्यात महिलांचे योगदान**

चव्हाण सेंटरच्या बैठकीत काही सदस्यांनी अशा विषयावर परिसंवाद व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार यशवंतराव चव्हाण सेंटर व श्रीमती सुशिला देवी सांळुखे शिक्षण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने हा कार्यकम घेण्यात आला. कार्यकमाचे अध्यक्ष जीवनराव गोरे हे होते. प्रामुख्याने प्राचार्य डॉ. सुलभा देशमुख व प्रा.डॉ. प्रकाश कांबळे यांचे विचार मोलाचे वाटते. कुंटुबाच्या सौख्यातच जीवनाचा आनंद दडलेला असून व्यक्ती व कुटुंबाची प्रगती ही या कौटुंबिक सौख्यातूनच साधली जाऊ शकते. मानसिक आरोग्यासाठी व सकारात्मक दृष्टिकोनासाठी कुटुंबसौख्य मोलाचे असल्याचे अनेक सहभागींनी स्पष्ट केले.

- **यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त कार्यक्रम**

यशवंतराव चव्हाण सेंटर व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (केंद धाराशिव) यांच्या संयुक्त विद्यमानाने रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विषय होता 'महाराष्ट्राच्या जडण-घडणीत यशवंतराव चव्हाणांचे योगदान' वक्ते- प्रा. डॉ. बालाजी गुंड हे होते. कृषी, उद्योगाबरोबरच मराठवाड्याला विद्यापीठ यशवंतरावामुळे मिळाले. उस्मानाबाद जिल्हयात मराठवाडयातील सर्वात मोठा तेरणा सहाकरी साखर कारखानाही यशवंतराव चव्हाणामुळे मिळाला व दुष्काळी भागाचा कायापालट होण्यास मदत झाली. यशवंतरावांमुळे महाराष्ट्राच्या विकासाच्या दिशा स्पष्ट झाल्याचे प्रा. गुंड यांनी सांगितले. प्राचार्य देशमुख, प्राचार्य रमेश दापके, सुरेखा जगदाळे शिक्षक प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणत उपस्थित होते. मा. जीवनराव गोरे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

- **गरजूंना धान्य वाटप**

यशवंतराव चव्हाण यांच्याजयंती निमित्त धाराशिव केंद्राच्या सदस्याच्या वतीने गोरगरिब गरजू व्यक्तींना धान्य वाटप करण्यात आले. शम्स उर्दु स्कूल मध्ये हा कार्यकम झाला.

- **विद्यार्थ्यांना खाऊ वाटप**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केद्र धाराशिव चे अध्यक्ष मा. जीवनराव गोरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. शम्स उर्दु स्कूल मध्ये हा कर्यक्रम झाला.

- **वक्तृत्व स्पर्धा**

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या शैक्षणिक योगदानावर शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे अयोजन करण्यात आले होते. व यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

- **काव्यवाचन स्पर्धा**

साहित्य व काव्यप्रेमींना संधी देण्यासाठी डायट कॉलेज धाराशिव येथे सर्वांसाठी खुली काव्यवाचन स्पर्धा अयोजित करण्यात आली होती. कविंनी उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यशस्वी कवींना प्रमाणपत्र देउन गौरवण्यात आले. या कर्यक्रमासाठी बालाजी तांबे, डॉ. तब्सुम सय्यद, सुरेखा जगदाळे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जीवनराव गोरे हे होते.

- **आदर्श आई आणि आदर्श शिक्षक पुरस्कार**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ज्या महिलांनी आपल्या कौटूबिक प्रगतित मोलाचे काम केले प्रामुख्याने गुणवंत व नितिमान मूले घडवली सामाजिक कार्यातही योगदान दिले आशा मतांचा सत्कार चव्हाण सेंटरच्या वतीने करण्यात आला. ज्या शिक्षीकांनी आपले शैक्षणिक कार्य गुणवत्तापूर्व पार पाडले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीत ज्यांचे योगदान उल्लेखनीय आहे अशा शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम शम्स्उर्दू शाळेत घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी चव्हाण सेंटरचे धाराशिव केंद्राचे अध्यक्ष जीवनराव गोरे हे होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी काझी रेश्मा परविन, डॉ. तब्यूम सय्यद व सुरेखा जगदाळे यांनी कष्ट घेतले.

- **विवाहेच्छुक युवक-युवती व त्यांचे पालक यांचे चर्चासत्र**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र उस्मानाबाद च्या वतीने सद्य: स्थितीला अत्यंत महत्त्वाच्या विषयावर संबंधितांचे चर्चासत्र घेण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त चला!! लग्नाबद्दल चर्चा करूयात... एकमेकांबद्दल काय निकष असावेत, अपेक्षा असाव्यात. याबाबत युवक युवतीं व पालक यांच्यात चर्चासत्र झाले. प्रमुख वक्ते डॉ. स्मिता शहापूरकर व सौ सुरेखा जाधव ह्या होत्या. कार्यकमाचे अध्यक्ष जीवनराव गोरे हे होते. काळानुसार समाजात रूढी, परंपरा, चालीरिती, यामध्ये बदल घडत आहेत. भारतीय समाजात लग्न परंपरा आणि जोडीदाराचे सहजीवन, सहअस्तित्व याबाबत अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. बदलत्या इच्छा अकांक्षा यांचा समन्वय कसा असावा याविषयी जुन्या व नव्या पिढीमध्ये वैचारिक मतभेद चालू असतो. या सर्व परिस्थितीवर वक्त्यांनी विवेचन केले. अत्यंत सामंजस्याने लग्न इच्छुक युवक युवतीनी अपेक्षा व्यक्त केल्या. शेतकरी व

कर्तबगार नवरा व्यसनी अधिकाऱ्यापेक्षा बरा तर पालाकांनी लग्नानंतरच्या सहजीवनात सामंजस्याची गरज स्पष्ट केली. या वेळी प्राचार्य रमेश दापके यांनीही विचार मांडले. अध्यक्षीय समारोपात गोरे साहेबांनी विवाहासाठी दोघांनीही पालकांनीही खूप विचारपूर्वक निर्णय घ्यावा व एकमेंकाच्या समन्वयाने संसार केल्यास ते आनंददायी जीवन ठरते असे सांगितले.

- **सुप्रियाताई सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान**

रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शासकीय रुग्णालयात झाला. चव्हाण सेंटरचे सदस्य व इतरांनी रक्तदान केले.

- **चव्हाण सेंटरच्या वतीने वृक्षारोपण**

धाराशिव मधील शम्स उर्दू हायस्कूल परिसरात वृक्ष लागवडीचा कार्यकम घेऊन पर्यावरणात वृक्षाचे महत्त्व विद्यार्थी-शिक्षक- पालक- व नागरिकांसमोर सांगितले चव्हाण सेंटरचे अध्यक्ष जीवनाराव गोरे म्हणाले वृक्षारोपण ही जशी काळाची गरज निर्माण झाली आहे तशी ती समाज व राष्ट्राचीही गरज आहे. वृक्षामुळे माणसाला नैसर्गिक ऑक्सिजन मिळतो. वृक्ष ही शहराची फुफ्फसं आहेत समाजहिताचा हा विचार शिक्षणातून युवकापुढे गेला पाहिजे. असे विचार मांडले.

लायक शेख, मसुद शेख, मैनुद्दीन पठाण, गणेश खोचरे, बालाजी तांबे, मु. अ. रेश्मा काझी, डॉ. तबस्सुन सय्यद उपस्थित होते.

- **स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास**

महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. सतिश कदम यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी प्रा.डॉ. कदम म्हणाले 'अनेकांच्या बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी इतिहास घडविला त्यांचीच स्मारके उभी राहिली. जगावं तर असं की इतिहासाने माझ्यासाठी पान राखावे इतिहासातून भविष्याचा वेध घेता येतो. पाकव्याप्त काश्मिर जर भारतात सामाविष्ट झाले असते तर भारतातून थेट लंडनला रस्त्याने प्रवास करता आला असता. मराठवाड्यावर निजामाने तलवार, प्रशासन तख्त यांच्या जोरावर राज्य केले.

अध्यक्षीय भाषणात चव्हाण सेंटरचे अध्यक्ष जीवनराव गोरे म्हणाले इतिहास घडविणाऱ्यांचे स्मरण व्हावे. त्याचा आदर मनात असावा. गौरव करता यावा म्हणून अशा विषयावर तज्ज्ञाचे व्याख्यान ठेवले. आजची परिस्थिती बदलेली असली तरी सामान्य माणसांचे हित जोपासण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रभक्तांनी भाग घेतला हे आजच्या पिढीने विसरू नये. स्वातंत्र्य चळवळ ही मानवमुक्तीची वैचारिक चळवळ होती.

या वेळी चव्हाण सेंटरचे सदस्य प्राचार्य डॉ. रमेश दापके यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'जीवन साधना पुरस्कार' दिल्या बद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य जयसिंगराव देशमुख यांनी सुत्रसंचालन डॉ. वैभव आगळे यांनी तर आभार बालाजी तांबे यांनी मानले. कार्यकमास विद्यार्थी, प्राध्यापक, व चव्हाण सेंटरचे सदस्य उपस्थित होते.

- **स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार**

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक भास्करराव नायगावकर यांचा सत्कार स्वातंत्र्यपूर्व काळातील 'राष्ट्रीय शाळा' हिप्परगा (रवा) ता. तुळजापूर येथे करण्यात आला. या शाळेत राष्ट्रीयत्वाचे धडे विद्यार्थी व युवकांना दिले जात होते. देशाचे पंतप्रधान कै. पी.व्ही. नरसिंहराव, कै. आ. चंद्रशेखर बाजपाई, कै. आ. देविसिंग चौहाण इ. विद्यार्थी होते. या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांनी काम केले. या सत्कार समारंभास उस्मानाबाद केंद्राचे अध्यक्ष जीवनराव गोरे प्राचार्य देशमुख प्रा.डी. एस.एम. देशमुख, वामनराव जाधव, भोईटे, मैंदाड, सचिन तावडे ग्रामस्थ उपस्थित होते.

- **अमर हबीब यांचे शेतकरी प्रश्नांवर विचार मंथन**

यशंवतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, उस्मानाबाद व शिक्षणमहर्षि मोहेकर कॉलेज कळंब यांच्या वतीने कृषी प्रश्नांचे व कृषी कायद्याचे अभ्यासक अमर हबीब (अम्बाजोगाई) यांचे व्याख्यान कळंब येथे आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते. प्राचार्य मोहेकर डॉ, तब्सुम सय्यद, बालाजी तांबे, सुरेखा जगदाळे इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी जीवनराव गोरे यांनी भूषविले.

- **स्वातंत्र्यांच्या पूर्वसंध्येला रॅली व यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारित डॉक्युमेंन्ट्री**

चव्हाण सेंटरच्या धोरणानुसार स्वातंत्र्याच्या पूर्व संध्येला युवकांची रॅली काढून सायंकाळी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर लघुपट दाखवण्यात आला. विद्यार्थी शिक्षक व चव्हाण सेंटरचे सदस्य या कार्यक्रमास हजर होते. उस्मानाबाद केद्रांचे अध्यक्ष जीवनराव गोरे, प्राचार्य जे.एस. देशमुख, डॉ. रमेश दापके हजर होते.

- **समान नागरी कायदा : वस्तूस्थिती, विपर्यास आणि उपयुक्तता**

सद्या राजकीय व समाजिक क्षेत्रात चर्चेत असलेला समान नागरी कायदा (नियोजित) यावर विधी अभ्यासक, राजकारणी व शिक्षण क्षेत्रातील जिज्ञासू लोकांची या विषयावर ऐकण्याची इच्छा होती. म्हणून दोन्ही बाजू मांडतील असे दोन नामवंत अभ्यासक चव्हाण सेंटरच्या वतीने निमंत्रित केले होते.

१. डॉ. बशारद अहमद (मुस्लीम धर्म अभ्यासक)

२. ॲड. देविदास वडगावकर (ज्येष्ठ विधीज्ञ व समाज चिंतक)

दोन्ही वक्त्यांनी असे मत व्यक्त कले की, बहुतेक सर्व समाजासाठी कायद्याच्या समान तरतूदी असलेल्या आहेत विविध समाजातील रूढी, परंपरा, लग्न समारंभ, आदीवासी समाजातील चालीरिती, प्रथा यात फारसा फरक पडेल असे वाटत नाही असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश दापके यांनी केले.

अध्यक्ष - श्री जीवनराव गोरे ह होते. कार्यक्रमास प्राचार्य शिंदे, प्राचार्य जे.एस. देशमुख, विधीशाखेचे विद्यार्थी-शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अयोजन बापूजी सांळुखे विधी महाविद्यालयात करण्यात आले होते.

- **पाणी परिषद**

चव्हाण सेंटरच्या वतीने 'ग्राम विकास व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन' या विषयावर विचारमंथन करण्यासाठी पाणी परिषदाचे आयोजन मु. खेड ता.जि. धाराशिव येथे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे डॉ. नितीन पाटील. जल व भूमी व्यवस्थापन विभाग प्रमुख (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) उपस्थित होते. ते म्हणाले की, जमिनीवर माती तयार होण्यासाठी शेकडो वर्षे लागतात. ती वाहून जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. पाणलोट क्षेत्राचे सूक्ष्मपणे व्यवस्थापन केले पाहिजे जमीन, जल, जनावरे, जंगले, व जनसंख्या यांना काळजीपूर्वक जपले पाहिजे. नैसर्गिक साधन संपत्तीसाठी लोकसहभाग हा महत्त्वाचा घटक आहे. नैसर्गिक साधन संपत्तीसाठी लोकसहभाग हा महत्वचा घटक आहे. रासायानिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत पण खराव होत आहे. अतिखोल पाण्याच्या उपसा व वापरामुळे क्षाराचे प्रमाण वाढत आहे. अध्यक्षीय भाषणात जीवनराव गोरे म्हणाले पाण्याची उपलब्धता, मातीची प्रत इ. बाबी पाहून आपली पीक पद्धती ठरली पाहिजी. कोरडवाहू शेतीतील संशोधन झाले पाहिजे. गावातील अभ्यासू, प्रयोगशिल शेतकऱ्यांनी ग्रामविकासासाठी इतरांना मार्गदर्शन करावे. सरपंच सुनिल गरड म्हणाले आपण पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर केला पाहिजे झाडे व पाणी मुलाप्रमाणे जपले पाहिजे. कार्यक्रमास बालाजी तांबे, सुरेखा जगदाळे, अदित्य गोरे, लोमटे व बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

- **यशवंतराव चव्हाण जयंती समारंभ**

सेंटर व बील गेट्स कॉलेजच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे धनंजय उद्धवराव पाटील होते. त्यांनी चव्हाण साहेबांचे ग्रामीण विकासाचे सहाकार व शिक्षण प्रसाराचे कार्य मराठवाड्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. माझे वडिल कै. उद्धवराव पाटील व कै. यशवंतराव चव्हाण राजकारणात वेगवेगळ्या पक्षात असले तरी खाजगीत ते एकमेकांचे अत्यंत जवळचे स्नेही व हितचिंतक होते. ते एक तत्वनिष्ठ राजकारणी होते. एकमेकांचा द्वेष, मत्सर, केला नाही एकमेकांच्या विचाराचा आदर ठेवला. विरोधकांना सर्वपातळीवर उध्वस्त करण्याचे काम आजच्या राजकारणांसारखे चव्हाण साहेबांनी कधीही केले नाही. यशवंतराव चव्हाण सेंटर आज खरोखर त्यांचे विचार जिंवत ठेवण्याचे काम करत आहे. ह विविध कार्यातून दिसून येते असे सांगितले. प्राचार्य डॉ. ओ.एम. रझवी, प्राचार्य रमेश दापके, प्रा. जमाले इ. नी मनोगत व्यक्त केले.

- **हैद्राबाद मुक्तीसंग्राम : सामाजिक न्यायाचा इतिहास**

- विवेक सौताडेकर

यशवंतराव चव्हाण सेंटर व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमारगा यांच्या वतीने हैद्राबाद मुक्ती लढ्याचा जाज्वल्य इतिहास या विषयावर सुप्रसिद्ध लेखक श्री विवेक सौताडेकर (लातूर) यांचे अभ्यास पूर्ण व्याख्यान झाले. १७ सप्टें हा हैद्राबाद मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. हा लढा धार्मिक नव्हता तर सामाजिक न्यायासाठी व देशाच्या स्वातंत्र्यासाठी होता. सर्वसामान्य जनता विरुद्ध निष्ठुर धर्मांध राजा असा हा संग्राम होता. या लढ्यातील अनेक घटना प्रसंग व विविध संघटनांचे कार्य वक्त्याने सांगितले. प्रास्ताविक डॉ. दापके स्वागत डॉ. अस्वले. प्राचार्य जाधव यांनी केले अध्यक्ष जीवनराव गोरे हे होते. डॉ. स्मिता शहापूरकर, सुरेखा जगदाळे, जे.एस. देशमुख, तांबे व परिसरातील इतिहास प्रेमी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हजर होते.

- **मराठी भाषा गौरवदिन**

प्रसिद्ध कवी, साहित्य अभ्यासक जागृत पत्रकार श्री रविंद्र केसरकर यांनी ज्ञानपीठ प्राप्त कवि कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी (२७ फेब्रुवारी) मराठी भाषेचा इतिहास व व्याप्ती सांगून महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्ष जीवनराव गोरे यांनीही भाषेचे महत्त्व विषद केले प्राचार्य रमेश दापके प्राचार्य जयसिंगराव देशमुख, प्रा. हंगरगेकर, प्रा. गायकवाद, जगदाळे अनेक मान्यवर व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या विवेकानंद सभागृहात हा कार्यक्रम झाला.

- **मा.खा. शदर पवार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम - 'आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी राजकारणी : शरद पवार'**

या विषयावर १२ डिसेंबर रोजी प्रा. अनिल नवात्रे (सांगोला) यांचे व्याख्यान अयोजित करण्यात आले होते. चव्हाण सेंटर व बील गेट्स महाविद्यालयाच्या वतीने हा कार्यकम झाला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अरशद रिझवी यांनी तर अध्यक्ष म्हणून जीवनराव गोरे हे होते. प्रा. नवात्रे यांना शरद पवार यांच्या सामाजिक, पुरोगामी, वैज्ञानिक दृष्टिकोन विविध प्रसंग व कार्यातील उदाहरणे देउन स्पष्ट केले. शरद पवारांच्या राजकारणाचा विकासात्मक दृष्टिकोन महाराष्ट्राला नक्कीच पुढे घउन जात आहे. शरद पवार हे विविध विषयात व क्षेत्रात रुची घेणारे धोरणात राष्ट्रीयत्व जपणारे एक राष्ट्रीय नेते आहेत असे मत त्यांनी मांडले. जीवनराव गोरे यांनी शरद पवार साहेबांच्या सामाजिक व राजकीय जीवनावर विचार मांडले. कार्यक्रमास जे. एस. देशमुख, डॉ. तब्सूम सय्यद, पी. एन. दापके, सुरेखा जगदाळे प्रा. हंगरकर, डॉ. सविता पाटील, प्राचार्य बिराजदार, टेकाळे मॅडम यांच्यासह मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी उपस्थित होते.

## १०.९ केंद्र, कराड

- **खासदार श्री. अमोल कोल्हे यांची विरंगुळा भेट-दिनांक २५ एप्रिल २०२३**

यशवंतराव चव्हाण सेंटर विभागीय केंद्र कराड येथे खासदार श्री. अमोल कोल्हे यांनी सकाळी ९:३० वाजता भेट दिली व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

- **सौ. वेणूताई चव्हाण यांची ४०वी पुण्यतिथी-१ जून २०२३**

सौ. वेणूताई चव्हाण याांच्या ४०व्या पुण्यतिथीनिमित्त शास्त्रीय सांगीत गायिका सौ दीपिका भिडे-भागवत याांचे शास्त्रीय संगीत व गायन या कार्यक्रमाचे सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड येथेआयोजन करण्यात आले होते.स्व.यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण याांच्या प्रतिमेस मा.आ.बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आल्यानंतर कार्यक्रमास सायंकाळी ६ वाजता सुरुवात करण्यात आली या वेळी संस्थेचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे श्री. राजेश पाटील वाठारकर श्री. सारंग पाटील तसेच प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

- **७६ वा स्वातंत्र्यदिन-१५ ऑगस्ट २०२३**

यशवंतराव चव्हाण सेंटर विभागीय केंद्र कराड येथे १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ८ वाजता ७६ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त विभागीय केंद्राचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या वेळी

विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सर्व कर्मचारी व अभ्यासिकेतील विद्यार्थीही उपस्थित होते.

- **यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी- २५ नोव्हेंबर २०२३**

स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही संस्थांमधील यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस सकाळी ९ वाजता खासदार श्री. श्रीनिवासजी पाटील व यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर केंद्र कराडचे अध्यक्ष मा.ना.श्री. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या वेळी संस्थेचे सदस्य श्री. विक्रमसिंह पाटणकर, श्री. नंदकुमार बटाणे, श्री. राजेश पाटील वाठारकर, श्री. सारंग पाटील श्री. सुनील पवार व इतर मान्यवर तसेच दोन्ही संस्थांमधील कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

- **प्रजासत्ताक दिन- २६ जानेवारी २०२४**

यशवंतराव चव्हाण सेंटर विभागीय केंद्र कराड येथे २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ८ वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त विभागीय केंद्रचे ध्वजारोहण डॉ. घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सर्व कर्मचारीवर्ग व अभ्यामसकेतील विद्यार्थीही उपस्थित होते.

- **सौ. वेणूताई चव्हाण यांची ९८ वी जयांती- २ फेब्रुवारी २०२४**

सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही संस्थांमधील यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस सकाळी १० वाजता संस्थांचे सिस्य श्री. नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले या वेळी दोन्ही संस्थांचे सदस्य श्री. राजेश पाटील वाठारकर, कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

- **१७ फेब्रुवारी २०२४- IAS याशनी नागराजन यांची विरंगुळा भेट**

IAS अधिकारी श्रीमती याशनी नागराजन यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता विरंगुळा येथे सदिच्छा भेट दिली या वेळी त्यांच्यासोबत शिक्षण अधिकारी सौ. मुलाणी विस्तार अधिकारी श्री. मुजावर PWD अधिकारी श्री. सागर बाळके व इतर मान्यवर उपस्थित होते.

**१०.१० जिल्हा केंद्र, जळगांव**

- **मोफत मधुमेह तपासणी शिबीर**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जळगाव आणि बागवान विकास फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ मे २०२३ रोजी "मोफत मधुमेह तपासणी शिबिरा"चे आयोजन जोशीपेठ बागवान मोहल्ला येथे करण्यात आले होते. एकूण ११७ व्यक्तींनी या शिबिराचा फायदा घेतला.

- **मोफत नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण**

मा. श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त दि. ११ जून २०२३ रोजी नागलवाडी येथे 'मोफत नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण' या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

एकूण ११९ लोकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४० लोकांना मोतीबिंदू आणि २५ लोकांना उच्च मधुमेह असल्याचे निदान झाले. मा. डॉ. रेणुका चव्हाण यांच्या सहकार्याने एकूण ५ लोकांच्या डाळ्याचे ऑपरेशन करण्यात आले.

- **प्राथमिक शाळांमध्ये मोफत पुस्तकांचे वाटप**

यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र जळगाव यांच्यामार्फत दि. १५ जून २०२३ रोजी संत मुक्ताबाई प्राथमिक शाळेमध्ये तसेच दि. ३० जून २०२३ रोजी शकुंतला गोपीनाथ राणे प्राथमिक शाळेमध्ये मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. एकूण १०० विद्यार्थ्यांनी याचा फायदा घेतला. केंद्राचे सचिव मा. डॉ. राहुल मयूर यांच्या हस्ते पुस्तकाचे वाटप करण्यात आले.

- **"आर्थिक साक्षरता" या विषयावर व्याख्यान**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जळगाव च्यावतीने दि. ९ जुलै २०२३ रोजी "आर्थिक साक्षरता" या विषयावर महिलांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मा. पल्लवी मयूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. व्याख्यानासाठी एकूण ९० महिलांनी उपस्थिती लावली.

- **मोफत नेत्र तपासणी**

यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र जळगाव आणि डॉ. रेणुका चव्हाण हॉस्पिटल यांच्यावतीने दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी गांधी जयंती निमित्त 'मोफत नेत्र तपासणी' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १०४ लोकांनी शिबिराचा लाभ घेतला.

## १०.११ जिल्हा केंद्र, लातूर

- संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे माजी उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३९व्या पुण्यतिथीनिमित्ताने लातूर महानगरपालिकेच्या आवारात असलेल्या स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, चव्हाण सेंटरचे खजिनदार विवेक सौताडेकर, सदस्य जेष्ठ समाजवादी नेते अॅड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, जिल्हा समन्वयक प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्याध्यापिका सायुज्यता खंदारे, अरविंद कांबळे, गंगाधर डिगोळे आणि राहुल लोंढे आदी उपस्थित होते.

## १०.१२ जिल्हा केंद्र, सोलापूर

- **महिला दिन - महिलादिनाचे औचित्य साधून ११ मार्च २०२३ रोजी** मु. पो. कुर्डूवाडी ता. माढा येथे महिलांसाठी आयुर्वेदिक सौंदर्य प्रसाधने बनवण्याचा एक दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. एकूण ९२ महिलांनी यामध्ये सहभाग घेतला होता. सोलापूर जिल्हा केंद्र, आयुर्वेद महिला व्यासपीठ, दै. सकाळचे तनिष्का महिला व्यासपीठ यांच्या सयुंक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले होते. सहभाग घेणाऱ्या सर्व महिला या ग्रामीण भागातील होत्या. आयुर्वेद महिला व्यासपीठाच्या डॉ. रोहिणी कुलकर्णी आणि जिल्हा केंद्राच्या डॉ. निशिगंधा माळी व तनिष्क महिला व्यासपीठाच्या प्रतिनिधी यांनी हा उपक्रम यशस्वी केला.

● **युवा अभिसरण - आपल्या सेंटरच्या युवा विभागाकडून या उपक्रमाचे आयोजन ११ मे १८ मे २०२४** या कालावधीत संपन्न झाले. अभिसरण या उपक्रमाअंतर्गत विदर्भातील ९ युवा सोलापूर जिल्ह्याच्या अभ्यासासाठी आले होते. पश्चिम महाराष्ट्र यांना समजावा हा यामागील हेतू होता. यासाठी भौगोलिक, शैक्षणिक, सामाजिक, शेती, उद्योग, संतपरंपरेची संस्कृती यासह अभिनव उपक्रमांची माहिती या वेळी यांना करून देण्यात आली. करमाळा तालुक्यातील समृद्ध शेती, विविध पिकांचे उत्पाद्न, उजनी धरणाचे महत्व, ग्रामीण भागीतील सायन्ससेंटर कसे असते, याचा अभ्यास यांना करता आला. पंढरपूरमध्ये विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन त्याचे माहात्म्य, कैकाडी महाराजांचा मठ, सूर्यनारायण मंदिर यासह संत परंपरा याबाबत अभ्यास करता आला. शेतीचीही माहिती मिळाली. पालवी या सामाजिक संस्थेची भेट घेता आली. त्यानंतर तालुका मंगळवेढा येथे संत दामाजी मंदिर, माचनूर येथील सिद्धरामेश्वराचे प्राचीन मंदिर, त्याची शिल्पकला, भीमा नदीतून बोटीने प्रवास, दामाजी महाविद्यालयास भेट, प्राचीन वस्तुसंग्रहालय पाहून अभ्यास करता आला. सोलापुर जिल्ह्यातील सांगोला हा दुष्काळी तालुका परंतु त्यावर मात करत फळ बागांची शेती, दोन दोन कोटी लीटरचे शेततळे, शेळी आणि मेंढपाळ व्यवसाय, ब्रिटिशकालीन धरण, महिला सहकारी सुतगिरणी त्यानंतर सोलापूर शहरामधील प्राचीन सिद्धेश्वर मंदिर, सिद्धरामेश्वारांची संजीवन समाधी, टॉवेल-चादर, हातमाग उद्योग, विडी वळणाऱ्या महिलांची संवाद, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तबला वादक पंडित आनंद बदामीकर, शिल्पकार भगवान रामपुरे, सहकार क्षेत्रातील नेते धर्मराज काडादी यांच्याशी विविध विषयांवर मार्गदर्शन घेता आले. प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी सोलापूरच्या हुतात्म्यांचा इतिहास, भाषा संस्कृती, खाद्य संस्कृती, जिल्ह्याच्या विकासात कोणकोणत्या क्षेत्रात कुणाकुणाचे असलेले योगदान याबाबत माहिती दिली. ह्या अभिसरणात करमाळ्याचे बिडीओ श्री मनोज राऊत, सरपंच शरद भोसले, प्रगतशील शेतकरी सुहास गलांडे, बाळासाहेब बोडखे, गजेंद्र पोळ, पंढरपूरचे प्रा. दत्तात्रय मस्के, प्रा. यशपाल खेडकर, किशोरमहाराज जाधव, मंगळवेढ्याचे श्री. राहुल शहा, प्रा. दत्ता सरगर, सांगोल्याचे योगेश खटकाळे, सोलापूरचे श्री दत्ता गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळाले व परिचय झाला.

● **शिक्षण** - कु. पूजा सपकाळ मु. पो. कर्देहळ्ळी, ता. दक्षिण सोलापूर या ग्रामीण भागातील गरजवंत विद्यार्थिनीस शैक्षणिक मदत धनादेशाद्वारे करण्यात आली.

● **श्रवणयंत्र वाटप** - दिव्यांग, आरोग्य व ज्येष्ठ नागरिक विभागाच्या वतीने सोलापूरातील ७५ मुलांना मोफत श्रवणयंत्र देण्याचा उपक्रम ७ नोव्हेंबर २०२३ रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात जेष्ठ पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते सिग्नीया कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पवार, दत्ता गायकवाड, राजशेखर शिवदारे, नॅबचे अध्यक्ष प्रकाश यलगुवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी सिग्नीया कंपनीचे श्री चक्रवर्ती, श्री नवीन कुमार, आयाज शेख, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दीप्ती नाखले, या विभागाचे संयोजक श्री विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, अभिजित राउत, दीपिका शेरखाने, मनीषा खिलारे यांच्या परिश्रमाने हा उपक्रम पार पडला.

● **पुण्यतिथी - यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त २५ नोव्हेंबर २०२३ रोजी** सात रस्ता येथील चव्हाण साहेबांच्या पुतळ्यास पुष्पचक्र वाहून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा केंद्राचे कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

- **दिव्यांग विवाह सोहळा** - नॅब शाखा सोलापूर आणि यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राच्या वतीने अंतरधर्मीय दिव्यांग विवाह सोहळा १४ फेब्रुवारी २०२४ रोजी इंदिरा गांधी सभागृहात संपन्न झाला. चव्हाण सेन्टरच्या जिल्हा केंद्राच्या वतीने नववधूवरांना गृहोउपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या. या प्रसंगी आमदार प्रणिती शिंदे, जिल्हा केंद्राचे कार्यकारिणी सदस्य रजनीश जोशी, नॅबचे शशीभूषण यलगुवार, राजन परदेशी आदी मान्यवर तसेच वधूवरांचे नातेवाईक आणि दिव्यांग बांधव उपस्थित होते.

- **जयंती** - यशवंतराव चव्हाण साहेबांची १११ वी जयंती जिल्हा केंद्र सोलापूर आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांच्या सयुंक्त विद्यमाने बार्शी येथे १२ मार्च २०२४ रोजी प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्या वाख्यानाने संपन्न झाली. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून कर्मवीर प्रज्ञाशोध परीक्षा २०२४ अंतर्गत 'महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण 'या विषयावर निबंध स्पर्धा, रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याचे पारितोषिक वितरण देखील त्याच दिवशी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. डॉ. बी. वाय. यादव यांच्या अध्यक्षतेखाली खाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास जयकुमार शितोळे, बी. एन. जगदाळे, पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, शिवाजी शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, बार्शी नगरपालिकेचे शिक्षण प्रसारक अधिकारी अनिल बनसोडे, शिवाजी महाविद्यालय बार्शीचे प्रा. डॉ. ए. बी. शेख, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. चंद्रकांत चव्हाण, जिल्हा केंद्राचे सचिव दिनेश शिंदे आदी उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थी व विद्यार्थीनींनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे शिल्पकार या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

### १०.१३ जिल्हा केंद्र, अहमदनगर

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र अहमदनगर व मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

  या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते माजी प्राचार्य खासेराव शितोळे हे होते. तसेच या कार्यक्रमासाठी यशवतंराव चव्हाण सेंटर जिल्हा केद्र अ.नगर भाऊसाहेब सावंत, बाळासाहेब आरगडे, संजीव तनपुरे, जयंत कुलकर्णी, आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर, अहमदनगर येथील शिक्षक वर्ग उपस्थित होता.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र अहमदनगर व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्या वतीने 'ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. यावेळी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे सचिव भाऊसाहेब सावंत, मारुतराव घुले पाटील, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची कामगार संचालक सुखदेव फुलारी, माजी प्राचार्य स्वरूपचंद गायकवाड, आण्णासाहेब खाटीक, बाळासाहेब आरगडे तसेच तालुक्यातील सर्व ग्रंथालयाचे ग्रंथपाल व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **वाचन संस्कृती जोपासण्यासाठी उपक्रम**

दृक-श्राव्य इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे आक्रमण सर्वांच्याच वाचन क्षमतेवर विपरीत परिणाम करीत आहे. परंतु वाचना शिवाय विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता, चिकित्सक वृत्ती, तुलनात्मक अभ्यास क्षमता, वक्तृत्व, संवाद, लेखन इत्यादी सारखे कौशल्य वृद्धिंगत होण्यात अडथळे निर्माण होतात आणि म्हणून या सर्व शैक्षणिक समस्या विचारात घेऊन शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनाची गोडी लागावी यासाठी योगेश कुदळे शिक्षण विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या मार्गदर्शनातून व न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा (वि) परिवाराच्या प्रमुख व्ही.जी.पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाने २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाच्या आरंभीपासून वाचन उपक्रम राबवण्यात येत आहे. हा प्रयत्न खूपच परिणामकारक आणि विद्यार्थीप्रिय ठरला आहे. या उपक्रमांतर्गत वैयक्तिक पातळीवर जवळपास २०० विद्यार्थ्यांपर्यंत यशस्वीपणे पोहोचलो आहोत.

शाळेच्या इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी या उपक्रमांतर्गत छोटी छोटी पुस्तके देण्यात येतात. पुस्तके निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात येते. गरीब-कष्टकरी कुटुंबातील आमचे अनेक विद्यार्थी उत्साहाने पुस्तके घरी नेऊन त्यांच्या वेळेनुसार वाचन पूर्ण करतात.

प्रत्येक सोमवार, बुधवार आणि शनिवार या दिवशी पुस्तकांचे वाचन पूर्ण करून हे विद्यार्थी परिपाठाच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांसमोर वाचलेल्या पुस्तकाचा सारांश सांगतात. शिवाय जेव्हा जेव्हा काही कारणाने सर्व विद्यार्थी एकत्र येतात आणि ५:१० मिनिटांचा वेळ मिळतो तेव्हा या उपक्रमशील विद्यार्थ्यांमध्ये व्यासपीठावर येण्याची निकोप स्पर्धा सुरू होते. यामुळे वाचनही होते आणि सभाधीटपणा देखील वाढण्यास मदत होते.

## १०.१४ जिल्हा केंद्र, परभणी

- सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणी, आरोग्य दिव्यांग व जेष्ठ नागरिक विभाग, जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तीना एडिप योजनेअंतर्गत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनाचे मोफत वाटप कॅम्प दिनांक २३/०७/२०२३ मंगळवार रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, दिव्यांग विभाग, जुनी जिल्हा परिषद, जिंतुर रोड, परभणी येथे संपन्न झाला.

या झालेल्या कॅम्पसाठी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषदचे सय्यद हुसैन, वै.सा.का., सुरज कदम, सुमंत वाघ, अशोक कान्हेकर आणि विलास वाकडीकर आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उदघाटन, कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनाचे मोफत वाटप पूर्व तपासणी शिबिरातून निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास आलेल्या दिव्यांग व्यक्तीच्या आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची तपासणी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी येथील कर्मचाऱ्यांनी केली

त्यात दिव्यांगाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, आधारकार्ड, फोटो, उत्पनाचे प्रमाणपत्र व तो दिव्यांग कोणत्या दिव्यांग प्रकारात मोडतो हे तपासून फॉर्म भरून घेतले. जिल्हयातील दिव्यांग व्यक्तीचे कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचो मोफत वाटप कॅम्प संपन्न झाला.

हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी येथील अंकिता कान्हेकर, श्रावण वैरागड, शेख कलिम, राणी लोखंडे यांनी प्रयत्न केले.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणीच्या वतीने संत परिसा भागवत विशेषांक “रिंगण” हा प्रत्येक आषाढी एकादशीला प्रसिध्द होणारा संतपरंपरेचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणारा वार्षिक अंक आहे. हया अंकाची सुरूवात २०१२ पासून झालेली आहे. या अंकात दरवर्षी एका संताचे कर्तृत्व आणि विचारांची समग्र मांडणी होते. या वर्षी संत परिसा भागवत विशेषांक “रिंगण” या वार्षिक अंकाचा प्रकाशन सोहळा व सवांद ज्येष्ठ साहित्यिक मा. इंद्रजित भालेराव यांचे शुभ हस्ते दिनांक २३/०७/२०२३ रोज रविवार सकाळी १०.०० वाजता यशस्विनी सभागृह, ९, राखण, योगक्षेम कॉलनी, विसावा कॉर्नर, जिंतुर रोड, परभणी येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक मा. इंद्रजित भालेराव यांच्यासह यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईचे कार्यक्रम संयोजक मा. दत्ता बाळसराफ, रिंगणचे संपादक मा. सचिन परब, यशवंतराव चव्हाण सेंटर, परभणीच्या सदस्या मनीषा केंद्रे, वनिता चव्हाण, लेखिका शीतल व किरण सोनटक्के, सचिव विजय कान्हेकर, नितिन लोहट यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांना पुस्तके भेट देऊन सेंटरचे सदस्य संजय मुंढे, सुमंत वाघ, मधुकर नायक आदिनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिंगण-संत परिसा भागवत विशेषांक (२०२३) चे प्रकाशन करण्यात आले.

प्रारंभी प्रास्ताविक करताना मा. दत्ता बाळसराफ यांनी, संतांचे पारंपरिक व आधुनिक विचार आता नव्याने रिंगणच्या माध्यमातून दर्जेदारपणे वाचकांच्या समोर मांडण्यात येत आहेत असे नमूद केले.

रिंगणचे संपादक मा. सचिन परब यांनी आपली भूमिका विशद करतांना विस्ताराने मते मांडली. ते म्हणाले २०१२ पासुन आषाढीला संत कृर्तव्त आणि नावीन्यता याचा मेळ घालून रिंगणचे अंक प्रसिध्द होत आहेत. सामाजिक आणि संस्कृतिक जीवन आजही संतांच्या विचारांनी उन्नत होत आहे. सर्वच संतांनी सेवाभाव स्विकारला होता, आपण समाजामध्ये या गोष्टी अधोरेखित करण्यासाठी हि विचारांची चळवळ सुरू केलेली आहे. उपेक्षित संतांना सजग समाजाच्या समोर आणून संतांच्या विचारांचा आणि कार्याचा परीस “रिंगण” ने आजही नव्याने समाजाला दिला आहे. भूमिका-ललित्य संशोधनाने “रिंगण” हा वार्षिक अंक प्रकाशित होतोय असे भाष्य कवी इंद्रजित भालेराव यांनी केले.

जेष्ठ साहित्यिक मा. इंद्रजित भालेराव म्हणाले या अंकात संदर्भाच्या खुणा, कागद, अक्षराचे वळण, छपाई इतिहास आणि त्या काळच्या संतांच्या वैशिष्ट्यंचा अभ्यास करून भूमिका घेऊन कलात्मकता आणि गंभीरपणे निर्मितीची श्रीमंती साकारली आहे. लेखकांचा शोध घेऊन आणि कांही हमखास लेखकांनी लेखण केलेला हा विशेषांक आहे. भास्कर हंडे या अंतरराष्ट्रीय चित्रकाराने रिंगणची मुख्य पृष्ठे अप्रतिम काढलेली आहेत. अशी वैशिष्ट्यंपुर्ण समीक्षा केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण चव्हाण यांनी केले उपस्थितांचे आभार बालासाहेब जाधव यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र परभणीचे सदस्य, वारकरी संप्रदायची निमंत्रित मंडळी, महिला, साहित्यिक, वाचक, पत्रकार व छायाचित्रकार असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास वाकडीकर, श्रावण वैरागड, शेख कलीम, योगेश जकाते आणि संतोष निर्मळ यांनी परिश्रम घेतले.

- **भूमिका - लालित्य संशोधनाने 'रिंगण' प्रकाशित होतेय**

**कवी इंद्रजित भालेराव यांचे प्रतिपादन**

देशोन्नती वृत्तसंकलन....

परभणी उपेक्षित संतांना सजग समाजाच्या समोर आणून; संतांच्या विचारांचा आणि कार्याचा परिस 'रिंगण'ने आजही नव्याने समाजाला दिला आहे. भूमिका- लालित्य - संशोधनान 'रिंगण' प्रकाशित होतोय, असे भाष्य कवी इंद्रजित भालेराव यांनी केले,

यशवंतराव चव्हाण सेंटर, यांच्या वतीने आयोजित रिंगण-संत परिसा भागवत विशेषांक प्रकाशन प्रसंगी अध्यक्षस्थानी भालेराव, दत्ता बाळसराफ, सचिन परब, मनीषा केंद्रे, वनिता चव्हाण, लेखिका शीतल व कीरण सोनटक्के, सचिव विजय कान्हेकर, नितीन लोहट यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांना पुस्तके भेट देऊन सेंटरचे सदस्य संजय मुंढे, सुमंत बाघ, मधुकर नायक आदींनी स्वागत केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते 'रिंगण-संत परिसा भागवत विशेषांकचे' विमोचन करण्यात आले. प्रास्ताविक करताना बाळसराफ यांनी, 'संतांचे आधीचे आणि नंतरचे विचार आता नव्याने या रिंगणच्या विशेषांकांनी दर्जेदारपणे वाचकांच्या समोर येत आहेत', असे नमूद केले.

परब यांनी आपली भूमिका विशद करताना विस्ताराने मते मांडली. ते म्हणाले, २०१२ पासून आषाढीला संत कर्तृत्व आणि नावीन्यता याचा मेळ घालून रिंगणचे. अंक प्रसिद्ध होत आहेत, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन आजही संतांच्या विचारांनी उन्नत होत आहे. कवी भालेराव म्हणाले. या अंकात संदर्भाच्या खुणा, कागद, अक्षरांचे वळण, छपाई, इतिहास आणि त्या काळच्या संतांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून, भूमिका घेऊन, कलात्मकता आणि गंभीरपणे 'निर्मितीची श्रीमंती' साकारली आहे. लेखकांचा शोध घेऊन आणि काही हमखास लेखकांनी लेखन केलेला हा विशेष अंक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण चव्हाळ यांनी केले. आभार बालासाहेब जाधव यांनी व्यक्त केले.

- **रिंगणने दिला संत विचारांसह कार्याचा वसा**

कवी इंद्रजित भालेराव यांचे प्रतिपादन; विशेषांकाचे प्रकाशन

परभणी, पुढारी वृत्तसेवा: उपेक्षित संतांना सजग समाजाच्या समोर आणून संतांच्या विचारांचा आणि कार्याचा परिस'रिंगण'ने आजही नव्याने समाजाला वसा दिला आहे. भूमिका-लालित्य-संशोधनाने 'रिंगण' प्रकाशित होतोय, असे भाष्य कवी इंद्रजित भालेराव बांनी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या येथील यशस्विनी हॉलमध्ये रिंगण संत परिसा भागवत विशेषांकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यशवंतराव चव्हाण सेंटरचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, रिंगणचे संपादक सचिन

परब, सेंटर सदस्या मनीषा केंद्रे, वनिता चव्हाण, लेखिका शीतल व किरण सोनटक्के, सचिव विजय कान्हेकर, नितीन लोडट उपस्थित होते. मान्यवरांना पुस्तके भेट देत सेंटर सदस्य संजय मुंढे, सुमंत वाघ, मधुकर नायक आदींनी स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'रिंगण-संत परिसा भागवत विशेषांकाचे प्रकाशन झाले. प्रास्ताविकात बाळसराफ यांनी संतांचे आधीचे आणि नंतरचे विचार आता नव्याने या रिंगणच्या विशेषांकांनी दर्जेदार वाचकांच्या समोर येत आहेत, असे नमूद केले. संपादक परब यांनी भूमिका विशद करताना विस्ताराने मते मांडत २०१२ पासून आषाढीला संत कर्तृत्व आणि नाविन्यतेचा मेळ घालून रिंगणचे अंक प्रसिद्ध होत आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन आजही संतांच्या विचारांनी उन्नत होत आहे. सर्वच संतांनी सेवाभाव स्वीकारला होता. आपण समाजात या गोष्टी अधोरेखित करण्यासाठी ही विचारांची चळवळ सुरू केली. सूत्रसंचालन अरुण चव्हाळ तर आभार बालासाहेब जाधव यांनी मानले.

- **जिल्हा केंद्र परभणी कार्यकारिणी मंडळाची बैठक**

दिनांक ०३ सप्टेबर, २०२३ रोजी "स्वागत", दत्तनगर, जाधव गॅस एजन्सीजवळ, जिंतुर रोड, परभणी येथे मा. कांतारावजी देशमुख (कृषिभुषण) यांचे अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणी कार्यकारिणी मंडळाची बैठक संपन्न झाली.

श्री. सुमंत वाघ यांनी प्रथम बैठकीस उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत केले मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

केद्रांचे सचिव श्री. विजय कान्हेकर यांनी मागील कार्याचा आढावा सादर करतांना मा. यशवंतराव चव्हाणाचे विचार पुढे न्यावे जसे साहित्य, क्रिडा, कला, संस्कृती आणि समाज कारण या सर्व कामाची व्याप्ती वाढावी कामे करते वेळेस सर्व जात, धर्म पंथ, स्त्री यांना सर्वाना घेऊन कामे करावीत. नवीन युवा टीम तयार करावी, पुढील बैठकीच्या वेळेस अकांऊट स्टेटस पाहण्यात यावे असे त्यांनी बैठकीदरम्यान सांगितले. त्या वेळी सदरील बैठकीचा कालावधी दर तीन महिन्यांनी करावा असे सुचवले. व पुढील तीन महिन्यातील कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे असे ठरले. बैठकीदरम्यान ५ ध्येये व उद्दिष्टे सांगीतली शिक्षण, आरोग्य, कला व सांस्कृतीक विभाग, सामाजिक कार्य, क्रीडा आणि जागर हा जाणिवाचा तुमच्या माझ्या लेकीचा (लेक वाचवा लेक वाढवा) ईत्यादी बाबत सविस्तर चर्चा केली.

श्री. विनोद डावरे यांनी वैद्यकीय महाविद्यालयास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नेत्रदान, देहदान करावे आपले अवयव दान करावे, बेवारस प्रेतांचे क्रियाकर्म आदीवर बैठकीदरम्यान रीतसर चर्चा केली.

श्री. सुभाष ढगे यांनी ग्रामीन भागातील विद्यार्थ्यांसाठी वाचन, लेखण, श्रवण व संभाषण कौशल्य असे संवेदनशिल आणि बालविवाह रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावेत. यासाठी ग्रामीण भागात वाचनालये उघडावेत त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, व्यक्तिमत्त्व व विकास या प्रयोगातून साध्य होईल. याचबरोबर त्यांनी विद्यार्थी व पालक, विद्यार्थी व शिक्षक, विद्यार्थी व राजकारण, विद्यार्थी व इतीहास, असे मेळावे किंवा कार्यशाळा ग्रामीण व शहरी भागात घ्याव्यात असे बैठकीदरम्यान सांगीतले.

श्री. संजय मुंढे यांनी खेळाचे प्रमाण कमी झाल्यामुळे मुलांमध्ये उदासीनता वाढली आहे. त्याकरिता शारीरिक शिक्षणाचे महत्त्व वाढवणे, मुलांना पहिलीपासून स्पोर्ट नर्सरीचे शिक्षण देणे याबाबत बैठकी दरम्यान चर्चा केली.

तसेच आंतरराष्ट्रीय दर्जा असलेले क्रिडांगण तयार व्हावेत, स्पोर्ट कॉन्फरन्स, स्टेट लेवल स्पोर्ट व्हावेत असे सुचविले यासाठी मंगल पांडे व ईतर सर्वांची मदत घेऊन कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी घेतली.

या वेळी केद्रांचे अध्यक्ष मा. कांतारावजी देशमुख यांनी बैठकीदरम्यान शेतक-यांचे प्रशिक्षण, कार्यशाळा, लेबर मॅनेजमेन्ट याबाबत चर्चा केली. या कार्यक्रमासाठी सहयोगी संस्था म्हणून वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी यांना सोबत घेऊन शेतकरी मेळावे घ्यावेत त त्या मेळाव्यादरम्यान शेतक-यांना पारंपरिक शेती सोडून जे विकतंय ते पिकवणे, फळबाग लावावी, नारळ आदी पिके आपल्या शेतात करावी जेणे करुन आपल्या उत्पन्नात वाढ होईल याबाबत चर्चा करून हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुदान मिळणे गरजेचे आहे. असे कळवले श्री. विजय कान्हेकर यांनी मुख्य केद्रांकडून निधी उपलब्ध होत नसला तरी आपण आपला विनंती अर्ज मुख्यालयास कार्याध्यक्षांना पाठवू असे सांगितले. त्याचबरोबर काही निधी आपल्या स्तरावर जिल्हा केद्रांने पैशाच्या रुपात किंवा भौतिक सुविधांच्या स्वरुपात उपलब्ध करावा अशी विनंती केली.

श्री. सूरज कदम यांनी बैठकी दरम्यान सर्व कार्यक्रम झाल्यानंतर याचे प्रकाशन व प्रसिद्धी करण्याचे काम करणार असल्याचे सांगितले.

या वेळी केंद्रांचे अध्यक्ष मा. कांतरावजी देशमुख यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले. व कार्यक्रम जोमाने करण्याचे अवाहन केले. कार्यक्रमाचे स्वागत श्री. सुमंत वाघ यांनी केले तर सूत्रसंचालन केद्रांचे सचिव श्री. विजय कान्हेकर यांनी केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली.

- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची ३९ वी पुण्यतिथी दिनांक २७/११/२०२३ शनिवार रोजी सकाळी ०९.०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्राचे अध्यक्ष मा. कांतारावजी देशमुख (कृषिभुषण), यांचे निवासस्थानी दत्तनगर, जाधव गॅस एजन्सी जवळ, जिंतुर रोड, परभणी येथे त्यांच्या हस्ते साजरी करण्यात आली त्या वेळेस अध्यक्ष मा. कांतरावजी देशमुख (कृषिभुषण), श्री. विलास पानखडे, श्री. सुभाष ढगे, श्री. संजय मुंढे, श्री. सत्यवान देशमुख अणि श्री. विलास वाकडीकर यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणी कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र, परभणी आणि महात्मा गांधी सेवा संघ संचलीत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींना एडिप योजने अंतर्गत कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनाचे मोफत वाटप शिबिर दिनांक १८/१२/२०२३ मंगळवार रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, दिव्यांग विभाग, जुनी जिल्हा परिषद, जिंतूर रोड, परभणी येथे संपन्न झाला.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणुन मा. गिता गुटटे (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), श्री. प्रल्हाद लांडे (वै.सा.का.), जिल्हा परिषद, परभणी, सुरज कदम, जिल्हा प्रतिनिधी, दैनिक देशोन्नती, श्री. देवलींग देवडे (प्रहार अपंग क्रांती संस्था, परभणी), प्रकाश पेडगावकर, ज्ञानेश्वर जाधव, टेक्नीशियन, छत्रपती संभाजी नगर आणि विलास वाकडीकर आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमास आलेल्या दिव्यांग व्यक्तीच्या आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची तपासणी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी येथील कर्मचाऱ्यांनी केली त्यात दिव्यांगाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, आधारकार्ड, फोटो, उत्पनाचे प्रमाण पत्र व तो दिव्यांग कोणत्या दिव्यांग प्रकारात येतो हे तपासुन फॉर्म भरून घेतले. जिल्हयातील दिव्यांग व्यक्तीचे कृत्रीम अवयव व सहाय्यभुत साधनांचे प्रमुख अतिथी मा. गिता गुटटे (जिल्हा समाज कल्याण अधिकारी) यांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, परभणी येथील श्रावण वैरागड, राणी लोखंडे यांनी प्रयत्न केले.

**१०.१५ जिल्हा केंद्र, अमरावती**

अमरावती विभागाच्या कार्यकारणीचे अध्यक्ष, मा. हर्षवर्धन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण सेंटरच्या अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन खालीलप्रमाणे घेण्यात आले.

- दि. १६/०९/२०२३ रोजी गृहशास्त्र विभाग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख वैदकीय महाविद्यालय येथे शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये अस्थिमृदुता शिबिराचे आयोजन या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. आर एम भिसे उपस्थित होते तर तिथे म्हणून प्रमुख मार्गदर्शन म्हणून PDMC चे अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर विक्रांत देशमुख हे उपस्थित होते त्यांनी स्वतःच्या पीपीटी मधून अस्थिमृदुता या विषयावर प्रेझेंटेशन दिले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक प्रश्नांची देखील त्यांनी उत्तरे दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्य महाविद्यालयामध्ये अशा विविध उपक्रमांचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभागातर्फे नेहमीच होत असते असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आर. एम. भिसे यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रिया कांबळे यांनी केले गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुजाता सबाने यांनी आरोग्याची काळजी कशी घेतली पाहिजे व पोषण सप्ताहनिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन कसे केले हे आपल्या भाषणांमधून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीता गिरी यांनी केले.

- दि. २०/१०/२०२३ या रोजी डॉ. पंजाबराव देशमुख वैदकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

- दि. २५/११/२०२३ रोजी श्री शिवाजी व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे यशवंतराव चव्हाण स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात आले मा. हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण कार्य आणि कर्तृत्व या विषयावर डॉ. रमेश अंधारे यांनी विचार व्यक्त केले. तसेच वरुड येथे महात्मा फुले कला व वाणिज्य महाविद्यालय यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. जी. एन. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. चत्रभुज कदम यांनी यशवंतराव चव्हाणांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला.

- दि. १३/०१/२०२४ रोजी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. वर्षा चिखले कार्यकारिणी सदस्य, यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती विभाग यांनी भूषविले प्रमुख व्याख्याते म्हणून प्रमुख वक्ते प्रा. संदीप जोशी प्रभारी प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय कुन्हा काकोडा जिल्हा जळगाव उपस्थित होते. 'स्वामी विवेकानंद: युवकांचे प्रेरणास्थान' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसह यशवंतराव चव्हाण सेंटरची कार्यकारिणी, प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.
- दि. १२/३/२०२४ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सेंटर अमरावती व यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन केले. मा. प्रदीप देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मा. डॉ. रामेश्वर भिसे प्राचार्य तथा सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती विभाग यांनी 'यशवंतराव चव्हाण: एक देदीप्यमान व्यक्तिमत्त्व' या विषयावर विचार प्रकट केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक तसेच कार्यकारणीचे सदस्य उपस्थित होते.

वरील सर्व कार्यक्रम कार्यकारिणीच्या उपस्थितीत संपन्न झालेत.

## १०.१६ जिल्हा केंद्र, बुलढाणा

- **सामाजिक एकता व देशाची अखंडता टिकविणे युवकांची जबाबदारी**

**-नरेश शेळके**

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी असंख्य ज्ञात अज्ञात युवकांनी स्वतंत्र संक्रमणात उड्या घेतल्या,स्वातंत्र्य योध्यांनी लाट्या काठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगला, छातीवर गोळ्या घेतल्या, फासावर गेले हुतात्मे पकडले तेव्हा आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. आज आपण स्वातंत्र्याचे फळे चाखत असताना स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाची जाण ठेवून आपल्या देशाला घातक असलेल्या प्रवृत्तीपासून सजय राहावं. आजच्या युवकाचे कार्य देशहिताचे असावे, सामाजिक एकता व अखंडता टिकविणे ही युवकांची जबाबदारी आहे असे मत नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला बुलढाण्यामध्ये आयोजित युवा स्वतंत्र ज्योत रॅलीमध्ये केले

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढल्या जाते. आजच्या युवकांना स्वातंत्र्यवीरांनी केलेल्या त्यागाची जाण व्हावी या हेतूने खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून काढली जाते. बुलढाणा शहरांमध्ये देखील यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था अन्त्रि तेली यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या सोळा वर्षापासून युवा स्वतंत्र ज्योत रॅली काढली जाते. यावर्षी देखील १४ ऑगस्ट वार बुधवार रोजी रात्री आठ वाजता जय्स्तंभ चौक बुलढाणा येथून सदर रॅली काढण्यात आली .रॅलीची सुरुवात बुलढाणा शहराचे ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांच्या शुभहस्ते ज्योत प्रज्वलित करून करण्यात आली. रॅली ही शहराच्या मुख्य मार्गाने देशभक्तिपर नारे देत हुतात्मा गोरे स्मारक येथे आली. हुतात्मा गोरे स्मारकावरती पुष्पचक्र समर्पित करून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्मे पत्करलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंजली गाडे यांनी केले, तर यावेळी ज्येष्ठ समाजसेविका शाहीना ताई पठाण, प्राचार्य अण्णासाहेब म्हळणे, पीएम जाधव, डॉ. गायत्री सावजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन प्रा.दीपक आमले यांनी केले या वेळी डी. डी. वायाळ माजी गटशिक्षणाधिकारी, डॉ.विजयाताई काकडे, माजी सभापती लक्ष्मी शेळके, ह भ प शंकर महाराज ,अनिल बावस्कर, बाळासाहेब एसकर, सत्तर कुरेशी, रामेश्वर मानमोडे, गोपालराव देशमुख, प्रकाश काळवाघे, अनिल कोळसे, प्रा. सचिन खरे नाझीमाताई खान, गजानन भीमशंकर, मनोज चंदन, सुरेंद्र जवरे, संतोष पवार, विनोद गवई, संतोष बोर्डे, सुजित देशमुख, रवींद्र शेळके, सतीश शेळके, शारदा उबरहंडे, शिवराज शेळके, यांच्यासह मोठ्या संख्येने युवक व नागरिक उपस्थित होते

- **शिवराय हे जागतिक स्तरावरील युगपुरुष**

**-चेतन कोळी**

"शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील राज्याभिषेकाची घटना ही इतिहासाचा प्रवाह बदलण्यास कारणीभूत ठरली. महाराजांच्या मृत्यूनंतरही कित्येक वर्षे मुघलांच्या सत्तेला भिडण्याचे आणि दिल्लीचे तख्त राखण्याचे असामान्य शौर्य व धैर्य मराठे दाखवू शकले याची प्रेरणाबीजे राज्याभिषेकाच्या घटनेत आहेत. राज्याभिषेकाने केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक क्षेत्रांतही उत्क्रांती घडली. शिवराय हे केवळ राष्ट्रपुरुष नव्हते तर ते जागतिक स्तरावरील युगपुरुष होते" असे मत चेतन कोळी यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा केंद्र, शिवराज शिक्षण संस्था अन्त्री तेली व सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या "शिवजागर" या उपक्रमात ते राष्ट्रवादी भवन बुलढाणा येथे दिनांक ८ जून २०२४ रोजी बोलताना केली.

शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने बुलढाण्यात शिवजागर सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार धीरज लिंगाडे , अध्यक्ष म्हणून एडवोकेट विजय सावळे होते. तर मुख्य वक्ते अनिल पवार, शिवराज्याभिषेक ग्रंथाचे संकल्प व चेतन कोळी, लेखक संपादक व प्रकाशक होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये आयोजक तथा सचिव यशवंतराव चव्हाण सेंटर, नरेश शेळके यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राच्या कार्यावर प्रकाश टाकत सांगितले की शिवरायांचे कार्य फक्त अफजल खानाचा कोथळा काढणे, शाहिस्तेखानाची बोटे कापणे अशा रंजक कथांपुरते मर्यादित नसून त्यांनी जगातील पहिले अलौकिक रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांच्या कार्याचे विविध पैलू अभ्यासपूर्ण समजून घेणे गरजेचे आहे. या वेळी अनिल पवार यांनी आपल्या व्याख्यानामध्ये शिवराज्याभिषेक, भारताच्या इतिहासातील असामान्य घटना या ग्रंथाच्या निर्मितीबाबत माहिती सांगितली व शिवराज्याभिषेक शासकीय स्तरावर संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करण्यासाठी केलेल्या केलेल्या पाठपुराव्याबाबत वर्णन केले. या वेळी आमदार धीरज लिंगाडे व विजय सावळे यांची समायोजित भाषणे झाली.

या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागाच्या प्रमुख डॉ.गायत्री सावजी यांनी शिवरायांच्या कार्याबाबतचा देखावा निर्माण केला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवपूजनानंतर शाहीर सज्जनसिंग व विक्रांत राजपूत या पितापुत्रांनी महाराष्ट्र गीत व शिववंदना सादर करून उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. रामकृष्ण मस्के, रणजीत सिंगराजपूत, डॉ.अण्णासाहेब म्हळसणे, ज्ञानेश्वर वायाळ, डॉ.विजयाताई काकडे, शंकर महाराज, डॉ.ज्योती खेडकर, डॉ.गायत्री सावजी, उर्मिला बावस्कर, विजय गवारगुरू, प्रा. अंजली गाढे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजितसिंह राजपूत व उर्मिला बावस्कर यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. गजानन जाधव, विजयसिंग राजपूत, माधवराव हुडेकर, देविदास जाधव, लक्ष्मी शेळके, अनिता शेळके, अनिल बावस्कर, तुळशीराम काळे, प्रतिभा भुतेकर प्रा. संगीता काळाने, रफिक कुरेशी, विजया कोळसे, यांच्यासह मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते.

- **मराठीचा गौरव करताना मराठी युवकांच्या गुणवत्तेवरही भर द्यावा**

**-राधेश्याम चांडक**

मराठी भाषा ही भारतातील जुन्या भाषांपैकी एक आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, नामदेव महाराजांपासून तर पु. ल देशपांडे, कुसुमाग्रज, शिवाजी सावंत, खांडेकर, प्र .के. अत्रेपर्यंत यांनी मराठी भाषेचा गौरव वाढवण्याचे काम केले. आजच्या युगातील मराठी युवक हा जगासमोर स्पर्धेत टिकला पाहिजे. त्यांच्यातील कौशल्य वाढले पाहिजेत यासाठी, जागतिक मराठी दिवस साजरा करताना मराठी युवकांच्या गुणवत्तेवर भर द्यावा असे मत राधेश्यामजी चांडक संस्थापक अध्यक्ष बुलढाणा अर्बन यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा व शिलेदार मराठीचे संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. २७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी भवन बुलढाणा येथे झालेल्या 'जागर मराठीचा' या कार्यक्रमाप्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून बोलताना केले.

जागतिक मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "जागर मराठीचा" हा भरगच्च कार्यक्रम बुलढाणा येथे संपन्न झाला. सुरुवातीला आलेल्या मान्यवरांच्या हातून प्रतिमापूजन तथा दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाहीर विक्रांत राजपूत यांनी आपल्या बहारदार आवाजातून गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या वेळी आलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचे मुख्य आयोजक नरेश शेळके सचिव, यशवंतराव चव्हाण सेंटर, बुलढाणा यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की जागतिक मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी मिळून राष्ट्रसंतांना अपेक्षित आदर्श व प्रगल्भ युवा पिढी घडवण्यासाठी कार्य करावे. मराठीचे शिलेदार संस्था, नागपूर यांचे अध्यक्ष राहुल पाटील यांनी संस्थेच्या कार्याची व कार्यक्रमाच्या आयोजनाची विस्तृत माहिती दिली. दुसरे सत्र ख्यातनाम कवी व साहित्यिक अजीम नवाज राही यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या वेळी अजीम नवाज राही यांनी आपल्या भाषणात सांगितले की कविता ही माणसाच्या तुटलेल्या आतड्यातून यावी, कवितेतून माणसाचं अंतर्मन प्रतिबिंबित व्हावं. साहित्यिक व कादंबरीकार रमेश इंगळे उत्रादकर, प्राध्यापिका डॉ. संगीता पवार यांचीही समायोजित भाषणे झाले.

या प्रसंगी राज्यभरातून आलेल्या १८शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार तथा ४ व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. १४ कवींच्या कवितासंग्रहाचे देखील प्रकाशन या वेळी करण्यात आली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन सविता ठाकरे यांनी केले. याप्रसंगी लक्ष्मी शेळके, अण्णासाहेब मळणे ,रणजीतसिंग राजपूत, डी. डी. वायाळ, शंकर महाराज, डॉ. विजयाताई काकडे, रामकृष्ण मस्के, विजय

गवारगुरु, प्रशांत ठाकरे, उर्मिला बावस्कर, डॉ.गायत्री सावजी, ज्योती पाटील, डॉ. ज्योती खेडेकर, गजानन दिवसंकर, विजयाताई कोळसे, रफिक कुरेशी,कल्पना भिवसनकर, वैशाली एंड्रावकर, मनोहर पवार यांच्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात शिक्षक, कवी साहित्यिक, उपस्थित होते.

- **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP२०२०) हे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात लागू होत आहे त्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्रज्ञावंत शिक्षकांची, पर्यवेक्षीय यंत्रणेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची व सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी एक दिवसीय कार्यशाळा यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा, शिक्षण विभाग जिल्हा परिषद बुलढाणा व शिवराज शिक्षण संस्था अंत्री तेली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रवादी वेल्फेट ट्रस्टची इमारत बुलढाणा येथे संपन्न झाली. कार्यशाळेचे अध्यक्ष आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे ,माजी मंत्री तथा अध्यक्ष यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, बुलढाणा तर उदघाटक म्हणून आमदार धीरज लिंगाडे आमदार पदवीधर मतदार संघ हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये बाळासाहेब खरात शिक्षणाधिकारी प्राथमिक जि. प. बुलढाणा , सिद्धेश्वर काळुसे शिक्षणाधिकारी माध्यमिक जि .प. बुलढाणा व नरेश शेळके सचिव यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा हे होते .

उद्‌घाटनपर सत्रात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. शाहीर विक्रांत राजपुती यांनी आपल्या बहारदार आवाजात गरजा महाराष्ट्र माझा या गीताचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये नरेश शेळके यांनी सांगितले की, माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेबांनी आपले राष्ट्र महाशक्ती होण्याचे स्वप्न बघितले ते आपल्या देशात असलेल्या युवाशक्तीच्या भरोशावर, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी झाल्यास हे राष्ट्र महाशक्ती झाल्याशिवाय राहणार नाही आणि सक्षम व कर्तृत्ववान आदर्श युवक घडवण्याचे सामर्थ्य हे शिक्षकांच्या हातात आहे. हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे आपण सर्वांनी राबवल्यास अब्दुल कलाम साहेबांचे स्वप्न पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही असे मत व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण सेंटरचा कामाचा आढावा देखील मांडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की यशवंतराव चव्हाण साहेबांनी प्रगल्भ आणि प्रगत महाराष्ट्राचा पाया तर शरद पवारनी कळस रचला. यशवंतराव चव्हाण सेंटरची स्थापना शरद पवारांनी केली व ही संस्था शिक्षण, आरोग्य, महिला, युवा व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कार्य करणारी राज्यातील अग्रगण्य संस्था आहे. मला अभिमान आहे की मी यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा जिल्हा केंद्राचा ,अध्यक्ष आहे. या होणाऱ्या कार्यशाळेच्या माध्यमातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बारकावे समजून घेत हे धोरण जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबवत असताना आपले विद्यार्थी गुणवंत व आदर्श कसे घडतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या वेळी आमदार धीरज लिंगाडे, सिद्धेश्वर काळुसे, बाळासाहेब थोरात यांनी देखील समायोजित भाषणे केली.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रा मध्ये रमेश ठाकूर, शिक्षणतज्ज्ञ तथा शिक्षण विस्तार अधिकारी जि. प .छ. संभाजीनगर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०-२०) संधी आणि आव्हाने या विषयावर दीड तास आपले मार्गदर्शन केले.

मध्यानंद भोजनानंतर शाळेच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. या सत्रामध्ये डॉ. केदार ठोसर, ए. पी .एम .कॉलेज चिखली यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणातील बदल या विषयावर आपले विस्तृत मनोगत व्यक्त करताना NEP२०२० या धोरणाबाबचे बारकावे समजून सांगितले. चर्चासत्र या सत्रात दोन्हीही प्रमुख वक्त्यांनी आलेल्या प्रशिक्षणार्थींचे शंकेचे निरसन केले. भोजन व्यवस्थेसाठी आदिती अर्बन कॉ.आ.सो. ने विशेष सहकार्य केले.राष्ट्रगीत व आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली. या प्रसंगी उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, उमेश जैन, अतुल देशपांडे ,मंगेश बोरसे यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटर बुलढाणा जिल्हा केंद्राचे संचालक तथा माजी गटशिक्षणाधिकारी डी. डी. वायाळ, प्राचार्य म्हळसने सर, विजय गवारगुरु, रामकृष्ण मस्के, डॉ. नीलिमा देशमुख,ज्योती पाटील, डॉ. गायत्री सावजी, रफिक कुरेशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन चव्हाण सेंटरच्या शिक्षण विभागाच्या समन्वयक उर्मिला बावस्कर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संत गाडगेबाबा क. म.वी. साखळी बु. राजर्षी शाहू क.म.वी. देऊळघाट तथा महाराणा प्रताप क.म.वि. केळवत यांच्या सर्व प्राध्यापक तथा कर्मचारी वृंदांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेत जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## १०.१७ जिल्हा केंद्र, हिंगोली

- **हिंगोली जिल्हा केंद्राची बैठक उत्साहात पार पडली**

केंद्र शासनाच्या एडीप योजनेंतर्गत 'मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर' यशवंतराव चव्हाण सेंटर, अलिमको, महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथे दि. २४ व २५ मार्च २०२३ रोजी 'मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटपासाठी नोंदणी व पूर्व तपासणीसाठी शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५०० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

## १०.१८ जिल्हा केंद्र, जालना

- **महिलांचे मानसिक आरोग्य कार्यशाळा**

यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालना मार्फत महिलांचे मानसिक आरोग्य यावर एक दिवसीय उद्बोधक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळा दि. २२ जुलै २०२३ रोजी अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे उद्घाटक, मा. सौ. मनीषाताई टोपे तसेच अध्यक्षस्थानी मा. विजय कान्हेकर उपस्थित होते. मा. श्रीमती गीता विष्णू कोल्हे यांनी 'संतुलित आहाराचे महत्त्व आणि योग प्राणायामद्वारे उत्तम मानसिक आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले. तर मा. डॉ. दर्शन टेपले यांनी 'मासिक पाळी व रजोनिवृत्ती दरम्यान स्त्रियांनी घ्यावयाची आवश्यक काळजी' या विषयावर, मा. प्रा. डॉ. सुजाता देवरे यांनी 'स्त्रियांची मानसिकता व आजचे वर्तमान' या विषयावर आणि मा. डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी 'स्त्रीत्व, धाडस आणि सुरक्षितता' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी महिला विभागाच्या मार्गदर्शक मा. तेजस्विनी अधिकारी, आरोग्य विभाग प्रमुख दीपिका शेरखाने, दिगंबर आचार्य आणि रुपाली वाघुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन अनिता पवार यांनी केले.

- **शिक्षण कट्टा**

  **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षकांची भूमिका**

  यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालना तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षकांची भूमिका या विषयावर चर्चासत्राचे दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचे उद्घाटन मा. मनीषा ताई टोपे यांच्या शुभहस्ते झाले. पतसंस्थेच्या चेअरमन माननीय साधनाताई गिरे व ज्ञानज्योत शिक्षण संस्थेच्या सचिव मंजुषा ठाकूर मॅडम उपस्थित होत्या. जिल्हा केंद्राच्या सन्माननीय सदस्य प्रतिभाताई श्रीपत मॅडम या वेळी उपस्थित होत्या. चर्चासत्रासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून सन्माननीय प्रा. संजय येवते सर यांची उपस्थिती होती. यासोबतच चर्चासत्रासाठी गटशिक्षणाधिकारी माननीय रवी जोशी सर भारत वानखेडे सर व डायटचे दराडे सर, मा. मंगेश जैवल सर यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये निलेश नंदकुमार जोशी, श्रीधर कुलकर्णी, सचिन खिल्लारे, मा. सविता ताई बरांडवाल, मा. नीमजे सर यांनी आपले उपक्रम सर्वांसमोर मांडले व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातले घटक आपण कसे अवलंबत आहोत हे दाखवून दिले. आजच्या चर्चा आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शैक्षणिक भारूड या वेळेस सन्माननीय ज्ञानेश्वर झगडे गुरुजी व त्यांच्या मंडळी मार्फत सादर करण्यात आले.

- **युवा नेतृत्व विकास ऐक दिवसीय कार्यशाळा**

  'आजचा युवक हा उद्याच्या उज्वल भारताचे भविष्य'.....युवक नेतृत्व विकास कार्यशाळेचे जालना केंद्र तर्फे यशस्वी आयोजन करण्यात आले.

- आजच्या युवांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक, भौगोलिक, पर्यावरणात्मक आणि वैचारिक सजगता अभ्यासपूर्ण बांधिलकी निर्माण व्हावी, त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित होऊन एक चांगला नागरिक घडावा यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
- युवकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने युवकांचे मानसशास्त्र, सकारात्मक विचार, स्ट्रेस मॅनेजमेंट, युवकांची सामाजिक जबाबदारी अशा विविध विषयांला अनुसरून दि. ३०/०९/२०२३ शनिवार रोजी सकाळी १० ते ०५ या वेळेत आयोजन करण्यात आले होते.

- **७७ व्या भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रश्नमंजुषा**

  ७७ व्या भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त शिक्षण विकास मंचतर्फे दि. २० ऑगस्ट २०२३ रोजी प्रश्नमंजुषाचे आयोजन करण्यात आले होते. मा. समाधान बोरुडे, जि. प. प्रा. शाळा पेवा ता. मंठा जि. जालना राज्यातून प्रथम क्रमांकाने निवडून आले.

- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षकांची भूमिका**

  यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षकांची भूमिका या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मा. नीलेश नंदकुमार जोशी राज्य पुरस्कार प्राप्त तसेच शिक्षण कट्टा, जालनाचे सदस्य यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचे सादरीकरण केले.

### १०.१९ देवराष्ट्र (जन्म घर)

दि.१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत जन्मघर स्मारकास एकूण १५२६ पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत. तसेच विविध ठिकाणच्या ८ जिल्हा परिषदेच्या शाळेच्या ९११ विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या आहेत.

- दि.१८ ऑगस्ट २०२३ रोजी विठामाता चव्हाण यांची पुण्यतिथी जन्मघर स्मारकामध्ये साजरी करण्यात आली.या वेळी देवराष्ट्रे गावातील पोपटराव महिंद (व्हा. चेअरमन ,सोनहिरा सह.साखर कारखाना)यांचे हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

- दि.२५ नोहेंबर २३ रोजी मा.यशवंतराव चव्हाण साहेबांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली, या वेळी मा.आ अरुण (अण्णा) लाड यांचे हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले तसेच चव्हाण साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर मुंबई. केंद्र - देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण हायस्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील मुलांच्या साठी एक व्याख्यान आयोजित केले होते. बालक, पालक, शिक्षक या विषयावरती सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

- दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी जागतिक विज्ञान दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर मुंबई, केंद्र – देवराष्ट्रे व युवान contrutions यांचे संयुक्त विद्यमाने देवराष्ट्रे येथील ह्यास्कुल मध्ये चित्रकला स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमावेळी देवराष्ट्रे ह्यास्कूलमधील विध्यार्थ्यानी चागला सहभाग नोदविला होता. विध्यार्थ्यांना चव्हाण सेंटर मार्फत यशवंत चिंतनिका हे पुस्तक देण्यात आले होते, तसेच युवान contortions मार्फत प्रत्येक विध्यार्थ्याला एक मान चिन्ह (ट्रॉफी )देण्यात आली आहे.

- दि.१२ मार्च २०२४ रोजी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमावेळी आदर्श राजकीय नेता, रसिक साहित्यक, विज्ञानवादी, विचारवंत, अष्टपैलू असे यशवंतराव चव्हाण साहेब तसेच महाराष्ट्रचे पहिले मुख्यमंत्री म्हणून दोन वर्षाच्या कालावधीत विविध योजना व धोरणाच्या माध्यमातून केलेल्या भक्कम पायाभरणीवर आज ही महाराष्ट्र ताठ मानेने उभा आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहत यशवंतरावाच्या सुसंकृतपणा काही मोजकी लोक सोडली तर आजच्या राजकारणात दिसत नाहीत, अशी खंत साहित्यिक दगडू लोमटे (अंबाजोगाई )यांनी यशवंत कवी संमेलांच्या अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केली.

  मा.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या १११ व्या जयंतानिमित्त यशवंतराव चव्हाण चव्हाण सेंटर, मुंबई. केंद – देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विध्यामाने जन्मघर स्मारकात आयोजित १० व्या यशवंत कवी संमेलनात लोमटे बोलत होते.

  मा.अरुण (आण्णा) लाड यांचे हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमापूजनाने संमेलनाचे उद्घाटन झाले. या वेळी बोलताना लाड यांनी चव्हाण साहेबांच्या या जन्मभूमीतून चांगले साहित्यिक घडले पाहिजेत अशी आशा व्यक्त केली.

  या कार्यक्रमावेळी कवी प्रभाकर साळेगावकर (माजलगाव), राजेसाहेब कदम(अहमदपूर), कडेगाव चे उपविभागीय अधिकारी - रणजीत भोसले, तहसीलदार - अजित शेलार, कार्यकारी अधिकारा - राजन डवरी, गटविकास अधिकारी - प्रशांत राऊत, विस्तार अधिकारी - सुनील लोहार, देवराष्ट्रेच्या सरपंच श्रीमती निर्मला बोडरे, तसेच गावातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

### १०.२० जिल्हा केंद्र, कोल्हापूर

- यशवंतराव चव्हाण सेंटर, महिला विभागाच्या माध्यमातून कोल्हापूर येथे ८ डिसेंबर २०२३ रोजी महिलांचे हक्क व अधिकार जनजागृतिपर सत्र आयोजित करण्यात आले. स्त्रियांचे विवाह, घटस्फोट, पोटगी/ खावटी,

POCSO, पॉश, सिविक राईट्स, जमिनीवरील हक्क, वारसा हक्क इत्यादी विषयांची सविस्तर माहिती या सत्रात देण्यात आली. या सत्रास प्रमुख वक्त्या म्हणून ॲड. वारणा नामदेव सोनवणे - पोळ, ॲड. लता नामदेव तळप होत्या.

या प्रसंगी कोल्हापूर राष्ट्रवादी जिल्हा अध्यक्ष सौ. अश्विनताई माने, चव्हाण सेंटरच्या तेजस्विनी अधिकारी, रूपाली वाघुंडे, यशस्विनी सामाजिक अभियान समन्वयक वर्षा भोसले, सैतवडे, भिठलवाडी सरपंच सौ. शांता सोनू कोळपे उपस्थित होत्या. या सत्रास तालुक्यातील शंभरपेक्षा जास्त महिलांचा सहभाग होता

## १०.२१ जिल्हा केंद्र, रत्नागिरी

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र रत्नागिरी यांच्या वतीने मुंबई, गोवा महामार्गावरील परशुराम घाट ते आरवली दरम्यानच्या ३७ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या रस्त्याच्या बाजूला झाडे लावण्याची संकल्पना मांडण्यात आली. शहरातील इतर सामाजिक संस्थेच्या सहकार्याने झाडे लावण्याचा उपक्रम राबवण्यात आला. आमदार शेखर निकम, पोलीस अधीक्षक कुलकर्णी, प्रांत अधिकारी आकाश निगडे तसेच तहसीलदार लोकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला.

- यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र - रत्नागिरी यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत 'ज्येष्ठ नागरिक कायदा २००७' या विषयावर ॲड. प्रमोद ढोकळे यांनी तर 'आनंदी जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर माधवबाग सीएसआर हेड डॉ. मिलिंद सरदार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी सुमती जांभेकर, फेस्कॉमचे सदस्य उस्मान बांगे, माजी तहसीलदार मारुती अंब्रे, चव्हाण सेंटरच्या ज्येष्ठ नागरिक दिव्यांग विभागाच्या प्रमुख दिपिका शेरखाने, जिल्हा केंद्र रत्नागिरीचे सचिव अभिजित खानविलकर, सह्याद्री शिक्षण संस्थेचे महाडिक सर उपस्थित होते.

शहरातील शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिक या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. कार्यशाळेतील मुख्य मार्गदर्शनानंतर चर्चासत्र व प्रश्नोत्तरे झाली. उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनीदेखील आपापले अनुभव मांडले. या वेळी वय वर्ष ८२ असलेल्या डॉक्टर साठे यांचा स्विमिंगमध्ये यशस्वी सहभाग नोंदवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा खिल्लारे यांनी केले.

- **जिल्हास्तरीय नेतृत्व विकास शिबिर**

यशवंतराव चव्हाण सेंटर आणि मुंबई विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय नेतृत्व विकास शिबिर आयोजित करण्यात आले. लांजा येथील कै. रमा नारायण शेट्ये ट्रस्ट येथे दिनांक २९ नोव्हेंबर रोजी हे शिबिर घेण्यात आले. युवा नेतृत्व विकास व गटात काम कसे करावे ? आणि वक्तृत्व कला व सादरीकरण या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेला संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यातील ३७ महाविद्यालयातील नेतृत्व करणारे ८० युवा उपस्थित होते. या कार्यशाळेस यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, रत्नागिरीचे सचिव अभिजित खानविलकर सर आणि युवा विभाग प्रमुख संतोष मेकाले यांनी मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते युवांना प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई

**यशवंतराव चव्हाण सेंटरच्या प्रकाशनांची यादी खालीलप्रमाणे** :

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णाकांठ/यशवंतराव चव्हाण | ३००/- |
| २. | ऋणानुबंध-यशवंतराव चव्हाण | २५०/- |
| ३. | कृष्णातीरे यशवंतराव चव्हाण की आत्मकथा | ३००/- |
| ४. | कृष्णकाठ/यशवंतराव चव्हाण | ३९५/- |
| ५. | भूमिका / यशवंतराव चव्हाण | २४०/- |
| ६. | यशवंतराव चव्हाण यांची विधिमंडळातील निवडक भाषणे खंड | २५०/- |
| ७. | माझ्या विद्यार्थी मित्रानों. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे | ३९५/- |
| ८. | सहयाद्रीचे वारे/यशवंतराव चव्हाण | २२५/- |
| ९. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन परिसंवाद /शिंदे अण्णासाहेब | २००/- |
| १०. | यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तीमत्व | १००/- |
| ११. | मार्गदर्शिका ज्येष्ठ नागरिकासाठी (मराठी) | १३५/- |
| १२. | यशवंतराव चव्हाण/महानोर ना.धो यांचे मूळ विचार. | १०/- |
| १३. | यशवंतराव चव्हाण जीवनप्रवाह फोटो अल्बम / प्रधान राम | ६५०/- |
| १४. | यशवंतराव चव्हाण यांची विधीमंडळातील निवडक भाषणे (खंड इंग्रजी) Selected Speeches in the State Legislature/Khobrekar,V.G. | ३००/- |
| १५. | Y.B.Chavan A.Pictoral Biography/Pradjan R.D. | ८५०/- |
| १६. | Handbook for senior citizens (English) | १३५/- |
| १७. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००/- |

**DVD**

| | | |
|---|---|---|
| १८. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग १ | १००/- |
| १९. | एक साठवण यशवंतराव चव्हाण सिडिज इंग्रजी भाग २ | १००/- |
| २०. | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ओडिओ DVD | ४००/- |
| २१. | प्रवासी पक्षी विडीओ DVD | ५००/- |
| २२. | पु.ल. क्रॉनिकल व्हिडिओ DVD | ६००/- |
| २३. | मी एस.एम. विडीओ DVD | ३००/- |
| २४. | यशवंतराव विडीओ DVD | ५००/- |
| २५. | यशवंतराव चव्हाण यांची निवडक भाषणे ओडिओ DVD | १००/- |
| २६. | भूमिका ऑडिओ DVD | १००/- |
| २७. | सहयाद्रीचे वारे या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २८. | कृष्णाकांठ या आत्मचरित्राच्या पुस्तकाच्या ओडिओ DVD | १००/- |
| २९. | माझ्या विद्यार्थी मित्रानों.. स्व. यशवंतराव चव्हाण यांची दीक्षान्त समारंभातील भाषणे ओडिओ DVD | १००/- |

**अध्यापन विभाग**

| | |
|---|---|
| ३०. शैक्षणिक गुणवत्ता आव्हान आणि आवाहन डॉ. वसंत काळपांडे | २००/- |
| ३१. हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०/- |
| ३२. उपक्रम वेचक-वेधक डॉ. वसंत काळपांडे | १००/- |
| ३३. स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना सुप्रिया सुळे | २०/- |
| ३४. 'संवादिनी' सुप्रिया सुळे | २०/- |
| ३५. 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००/- |
| ३६. शिक्षणवृत्ती डॉ. कुमुद बन्सल | २००/- |
| ३७. शिक्षणकट्टा बसंती रॉय | २००/- |
| ३८. वाटचाल ई-शिक्षणाची बसंती रॉय | २००/- |
| ३९. हवामान बदलास आमचे उत्तर | १००/- |
| ४०. Whats App चर्चा-शिक्षण विकासाच्या संपादक माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००/- |
| ४१. सेमी इंग्रजी का आणि कसे ? | २००/- |
| ४२. शालेय प्रशासन आणि मानवी संबंध / डॉ. वसंत काळपांडे | २९९/- |
| ४३. देशोदेशीचे शालेय शिक्षण | ४९९/- |
| ४४. नवीन शैक्षणिक धोरण: प्रश्न मनातले | - |
| ४५. नवोपक्रमांची नवलनगरी / SPIF फेलो | ३५०/- |
| ४६. धोरण कुठवर आलं ग बाई | ३५०/- |

# Y. B. Chavan Centre
## A Computer Institute

- MS-CIT
- TALLY
- Advanced Certification in Software Engineering (All Graduates)
- Advanced Excel
- Graphic Designing
- Typing - English / Marathi
- PG DAC
- PreCAT
- Hardware & Networking
- Basic Programming Courses
- Mobile Operating Course for Senior Citizens

YASHWANTRAO CHAVAN CENTRE
Serving with Trust and Excellence

AIT
ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY

**Admission OPEN**

Concession Available



**MS-CIT**
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

**Academy of Information Technology (YCC)**

5th Floor, Y. B. Chavan Centre, Gen. J. Bhosale Marg,
Near Sachivalaya Gymkhana, Opp. Ameeta Bldg;
Nariman Point, Mumbai - 400021.

9769256343 / 8452085815 / 022-22817975

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

## Auditor's Report of YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI for the year ended 31st March, 2024

[Annexure to Report under Section 33(2) and Rule 19 of The Bombay Public Trust Act, 1950]

**Opinion**

We have audited the financial statements of, **YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, Mumbai** which comprise the Balance Sheet as at March 31, 2024, and the Income and Expenditure Account for the year then ended, a summary of significant accounting policies and other explanatory information. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give the information required by the relevant sections and rules of the Bombay Public Trust Act, 1950 in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

i. In the case of the Balance Sheet, of the State of Affairs of the Trust as at **31st March, 2024** and

ii. In the case of the Income and Expenditure Account, of the **Surplus** for the year ended on that date.

**Basis for Opinion**

We conducted our audit in accordance with Standards on Auditing (SAs). Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report.

We are independent of the entity in accordance with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements, and we have fulfilled our other responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Responsibilities of Management of Trust and Those Charged with Governance for the Financial Statements**

Trust Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with accounting standards generally accepted in India necessary to enable the preparation of financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

In preparing the financial statements, management is responsible for assessing the entity's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless management either intends to liquidate the entity or to cease operations, or has no realistic alternative but to do so.

Those charged with governance are responsible for overseeing the entity's financial reporting process.

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements**

